मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर आषाढ–भाद्रपद १९४०

जुलै–सप्टेंबर २०१८ / खंड ४२, अंक २



अटल विश्वास
संघ भावना
सामुहिक निर्णय
जळगाव जनता सहकारी बँक लि.
सहकारात् वर्धते धनम् !
JJSB
(शेड्युल्ड बँक)
मुख्य कार्यालय : 'सेवा' ११७/११९, नवी पेठ, जळगाव– ४२५००१.
(0257) 2223699
www.jjsbl.com
jjsbc_jal@sancharnet.in
सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१८ / खंड ४२ / अंक २

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

सल्लागार मंडळ
(२०१८-२१)
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

१. धनश्री महाजन: वित्तीय निराकरण आणि ठेव विमा (FRDI) विधेयक वादप्रश्न आणि ध्वनितार्थ ..................... १२१

२. विजय मा. कुंभार : इ-बँकिंग सेवांमधील ग्राहक समाधान मापनासाठी इ-बँकक्वॉल साधन ........................ १२५

३. मारोती वीरभद्र तेगमपुरे : नगदरहित अर्थव्यवहार : वास्तव समजून घेण्याची गरज... ........................ १३६

४. अविनाश कुलकर्णी : भारताची लोकसंख्या आणि विकासातील निवडक प्रवाह ..................... १४२

५. प्रशांत हरमकर : डॉ. बी.आर.आंबेडकरांचे जलधोरण .................... १४९

६. दीपक विठ्ठल भुसारे : कृषिप्रधान भारतातील शेतकरी आत्महत्या : एक शोकांतिका ................... १५९

७. पुष्पा सुभाष तायडे : महात्मा गांधींचे अर्थशास्त्र : एक अन्वयार्थ ............... १६७

८. चंद्रकांत रामचंद्र जाधव : मानव विकास निर्देशांक : कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा एक अभ्यास . १७६

९. मंजुषा मुसमाडे : पुस्तक परिचय अ वर्ल्ड ऑफ थ्री झीरोज ............................... १८५

१०. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे नज, डेटाबँक .......................................... १९०

११. ज.फा.पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे मनी लाँड्रींग, वेस्टेज, मॅन्यूफॅक्चरिंग...................... १९३

१२. संतोष दास्ताने : प्रतिक्रिया................................ १९५

१३. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व अध्यक्षीय भाषणे .... १९७

१४. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध उपक्रम २०१७-१८ .... १९९

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०१७-१८


- **अध्यक्ष**

  **चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **बालाजी शिंदे (परभणी)**
  **जगन्नाथ पाटील (सातारा)**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**

- **सदस्य**

  **दिनकर मोरे (इस्लामपूर)**
  **वामन सावंत (रत्नागिरी)**
  **जीवन सोळुंके (नाशिक)**
  **महादेव पाटील (मिरज-सांगली)**
  **संतोष कदम (सोलापूर)**
  **सुभाष पाटील (पुणे)**
  **विनोद गावंडे (अमरावती)**
  **अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
  **मारोती तेगमपुरे (अंबड)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**

- **स्विकृत सदस्य**

  **सुरेश पाटील (जळगाव)**
  **अरूण पिसे (धुळे)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **शरयू पोतनुरवार (चंद्रपूर)**


### कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)


मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


### अर्थसंवाद वर्गणी :

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु.२०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


### अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# वित्तीय निराकरण आणि ठेव विमा (FRDI) विधेयक वादप्रश्न आणि ध्वनितार्थ

**धनश्री महाजन** †
प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२००८ च्या जागतिक वित्तीय संकटामुळे वित्तीय नियंत्रण सुधारण्यासाठी नव्या नव्या कल्पना समोर आल्या. जागतिकीकरणाच्या काळात वित्तीय संकट एखाद्या देशापुरते मर्यादित न राहता दुसऱ्या देशांमध्ये वेगाने पसरते, हे पूर्व आशियायी चलन संकटाच्या वेळी १९९७ मध्ये आणि नंतर २००८ च्या अमेरिकन वित्तीय संकटामुळे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर विविध देशांत वित्तीय नियंत्रणासाठी सुसंवादी धोरणे असावीत, या उद्देशाने जागतिक पातळीवरच्या चार संस्थांनी ही जबाबदारी स्वीकारली. त्या संस्था G-20, नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय हिशेबपूर्ती बँक (Bank for International Settlements) आणि वित्तीय स्थैर्य मंडळ (Financial Stability Board) या आहेत.

भारत G-20 चा सदस्य देश आहे. G-20 ने आपल्या सदस्य देशांसाठी वित्तीय सुधारणांचा कार्यक्रम तयार केला आहे. भारत या सुधारणा अमलात आणण्यासाठी कटिबद्ध आहे (Gupta, 2014). या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी, २०१६ मध्ये आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात वित्तमंत्री अरुण जेटली यांनी वित्तीय शिस्तीसाठी एक नवी चौकट तयार केली जाईल, असे सूतोवाच केले होते. यासाठी लगेचच मार्च, २०१६ मध्ये अजय त्यागी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल २५ सप्टेंबर, २०१६ मध्ये भारत सरकारला सादर केला. त्यात त्यागी समितीने वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयक मांडण्याची शिफारस केली होती. त्यानंतर २५ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर या १९ दिवसांच्या काळात प्रस्तावित विधेयकावर सार्वजनिक भाष्य मागविण्यात आले. त्यानंतर जून, २०१७ मध्ये मंत्रिमंडळात ते पारित करण्यात आले. ऑगस्ट, २०१७ मध्ये पावसाळी अधिवेशन संपण्याच्या एक दिवस आधी हे विधेयक संसदेत साद३र करण्यात आले आणि त्यावर संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली.

### वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयक कशासाठी?

बँका आणि विमा कंपन्यांच्या दिवाळखोरीचे निराकरण करणे, वित्तीय निराकरण महामंडळाची स्थापना करून त्याला बँका, बँकेतर वित्त संस्था आणि विमा कंपन्यांच्या विलोपन, विलीनीकरण, एकत्रीकरण, संपादनाचे अधिकार देणे, रिझर्व बँक अंतर्गत असलेल्या ठेव विमा आणि पत हमी महामंडळ (DICGC) बंद करणे, या उद्देशाने वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयक संयुक्त संसदीय समितीसमोर ठेवण्यात आले आहे.

† आजीव सभासद क्र. : ८४४, भ्रमणध्वनी : ९८८११३१०९३, ई-मेल : djmahajan7@gmail.com

## वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयकाची वैशिष्ट्ये

हे विधेयक पारित झाल्यावर वित्तीय निराकरण महामंडळ स्थापन होईल. या महामंडळाला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या; तसेच विमा कंपन्यांच्या विसर्जन, विलीनीकरण, एकत्रीकरण आणि संपादनाचे अधिकार प्राप्त होतील. ठेवीदार आणि बँकांमधले संबंध या विधेयकामुळे आमूलाग्र बदलतील.

ठेव विमा आणि पत हमी कायदा १९६२ नुसार सर्व व्यापारी आणि सहकारी बँकांमधील प्रत्येक ठेवीदाराच्या १ लाख रुपयांच्या ठेवींचा विमा उतरवला जातो. यासाठी बँका विम्याचे अधिमूल्य ठेव विमा आणि पत हमी महामंडळाला देतात. भारतात सार्वजनिक क्षेत्रातील २१ बँका देशातला ८२% बँकिंग व्यवसाय सांभाळतात आणि दरवर्षी अदमासे ३००० कोटी रुपये विम्याचे अधिमूल्य (Insurance Premium) या स्वरूपात ठेव विमा आणि पत हमी महामंडळाला देतात.

एखादी बँक दिवाळखोरीत निघाल्यास एक लाखापेक्षा जास्त रकमेच्या ज्यांच्या ठेवी त्या बँकेत आहेत, असे ठेवीदार आपला पैसा गमावू शकतात. भारतात १९६१पासून असे कधी झाले नाही. भारतात जेव्हा कधी छोट्या बँका अडचणीत आल्या, तेव्हा रिझर्व्ह बँकेने ठेव आहरणावर मर्यादा घालून अशा कमकुवत बँकेचे एखाद्या मोठ्या सशक्त बँकेत विलीनीकरण करून ठेवीदारांना सुरक्षित ठेवले आहे.

## वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयकातील (बेल-इन)

वित्तीय निराकरण आणि ठेव विमा विधेयकामुळे बँका, विमा कंपन्या आणि ठेवीदारांचे परस्पर संबंध बदलतील. FRDI विधेयकाच्या ५२व्या विभागात केलेल्या तरतुदीनुसार, ठेवीदारांचा पैसा अडचणीतल्या बँकांच्या पुनर्भांडवलाकरता वापरण्याचा अधिकार वित्तीय निराकरण महामंडळाला असेल. या तरतुदीला बेल-इन (Bail - in) असे म्हटले आहे.

बेल इन हे स्वित्झर्लंडच्या वित्तीय स्थैर्य मंडळाच्या प्रमाणकाचे अनुकरण होय. बेल आउटमध्ये शासन करदात्यांचा पैसा वापरते, तर या प्रस्तावित बेल इनमध्ये ठेवीदारांचा पैसा वापरणार आहेत. यात ज्या ठेवींचा विमा काढलेला आहे, त्या ठेवी वापरल्या जाणार नाहीत. एखादी बँक अयशस्वी झाली, तर ठेवीदारांना काही प्रमाणात त्याचे नुकसान सोसावे लागू शकते. थोडक्यात, आपण ठेव म्हणून ठेवलेला पैसा कसा वापरायचा, याचा निर्णय वित्तीय निराकरण महामंडळ गरज भासल्यास एका प्रकारच्या रोख्यांचे रूपांतर दुसऱ्या प्रकारच्या रोख्यांमध्ये करू शकेल (उदा. ठेवीचे रूपांतर समभागांमध्ये केले जाऊ शकेल).

## भारतातील बँकिंग क्षेत्र

मानवी शरीरात हृदय जेवढे महत्त्वाचे आहे तेवढे भारताच्या वित्तीय क्षेत्रात बँकांचे स्थान महत्त्वाचे आहे. व्यापारी बँकांचे १९ जुलै, १९६९ रोजी राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरच्या काळात या बँकांनी मध्यमवर्गीयांचा विश्वास संपादन केला. आजही भारतातला मध्यमवर्ग बँकांवर विश्वास ठेवून आहे. भारतात एकूणात ७०% बँका सरकारी मालकीच्या आहेत.

१९९०च्या दशकात बँकिंग क्षेत्रावर भारतात मोठे निर्बंध होते. मात्र, १९९१मध्ये रिझर्व्ह बँकेने व्याजदराचे उदारीकरण, रोख राखीव गुणोत्तर आणि वैधानिक रोखता गुणोत्तरात कपात करून बँकांना अधिक स्वातंत्र्य देण्याचे धोरण निश्चित केले. आंतरबँक नाणेबाजार विकसित केला. नवीन बँका नाणेबाजारात आल्या. खासगी बँकांची संख्या वाढली. कार्यक्षमता आणि नफाक्षमता याबाबत स्पर्धा वाढली (Gupta, 2014).

भारतीय बँकिंग व्यवस्थेत जोपर्यंत सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका सरकारच्या नियंत्रणात आहेत, तोपर्यंत व्यवस्था कोसळण्यासारखी समस्या उद्भवू शकत नाही. त्यामुळे या विधेयकाची खरोखरच गरज आहे

का? हा विचार करण्याचा मुद्दा आहे.

**सहकारी बँका आणि शासनाची भूमिका**

देशातल्या २३ जिल्हा पत सहकारी बँकांना वाचवण्यासाठी ५ नोव्हेंबर, २०१४ मध्ये सरकारने २३७५ कोटी रुपये दिले. यातल्या अनेक बँकांकडे परवानेसुद्धा नव्हते. खरेतर या बँका रिझर्व्ह बँकेच्या परवाना नियमांनुसार बंद करायला हव्या होत्या. पण, असे झाले नाही. या २३ मधील १६ बँका उत्तर प्रदेशात, ३ जम्मू-काश्मीरमध्ये, ३ महाराष्ट्रात आणि १ पश्चिम बंगालमध्ये होती (Basu, 2017).

सतत दिवाळखोरीकडे जाणाऱ्या आणि राजकारण्यांच्या हातातले बाहुले असलेल्या सहकारी बँकांना मात्र प्रस्तावित वित्तीय निराकरण महामंडळाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेले नाही, हे विशेष होय.

**रिझर्व्ह बँकेचे अधिकार**

बँकांची वित्तीय स्थिती तपासून त्यावर उपाय सुचविण्याचे अधिकार सर्वस्वी रिझर्व्ह बँकेकडे आहेत. सध्या अस्तित्वात असलेले ठेव विमा आणि पत हमी महामंडळ रिझर्व्ह बँकेच्या आधिपत्याखाली काम करते. मात्र, प्रस्तावित वित्तीय निराकरण महामंडळ रिझर्व्ह बँकेच्या अधिकारक्षेत्राबाहेर ठेवण्याचा सरकारचा मानस आहे. याचा परिणाम म्हणून रिझर्व्ह बँकेच्या अधिकारांवर; तसेच कार्यावर मोठ्या मर्यादा येऊ शकतील.

बँकांचा शेवटचा त्राता हे कार्य रिझर्व्ह बँकेकडे असल्यामुळे एखाद्या कमकुवत बँकेचे दुसऱ्या मोठ्या बँकेत विलीनीकरण करण्यासाठी नैतिक समजावणीचे गुणात्मक नियंत्रणाचे साधन रिझर्व्ह बँकेला वापरता येते. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नररांनी केलेल्या नुसत्या आवाहनावर भारतात अशा प्रकारे दोन बँकांचे विलीनीकरण झाल्याची उदाहरणे आहेत.

परंतु, अशा प्रकारचा नैतिक समजावणीचा अधिकार प्रस्तावित वित्तीय निराकरण महामंडळाला असू शकणार नाही आणि त्यामुळे कमकुवत बँकांचे विसर्जन करण्याकडे महामंडळाचा कल राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**वित्तीय निराकरण महामंडळाचे अधिकार**

वित्तीय निराकरण महामंडळात रिझर्व्ह बँक, सेबी, विमा विकास व नियंत्रण प्राधिकरण यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी; तसेच शासननियुक्त तीन आणि स्वतंत्र दोन सदस्य राहतील. थोडक्यात, या महामंडळावर रिझर्व्ह बँकेऐवजी शासनाचा अंकुश असेल. बँकांमधील कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करणे, नुकसान भरपाईचे नियम बदलणे हे अधिकार नव्या महामंडळाकडे देण्याचे विधेयकात प्रस्तावित आहे. रिझर्व्ह बँकेला असलेला व्यापारी बँकांच्या वित्तीय स्थितीबाबत नियंत्रणाचा; तसेच त्यावर उपाय सुचविण्याचा अधिकार वित्तीय निराकरण महामंडळाकडे जाईल आणि त्यामुळे रिझर्व्ह बँकेची नियंत्रणात्मक भूमिका मर्यादित होऊन जाईल.

वित्तीय निराकरण महामंडळाने घेतलेल्या निर्णयांना कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

**बेल-इनचा सायप्रसमधील प्रयोग**

दिवाळखोरीतल्या बँकांना वाचवण्यासाठी बेल - इन चा पहिला प्रयोग युरोपियन युनियन मधल्या सायप्रसने २०१३ मध्ये केला. ग्रीसला कर्ज दिल्यामुळे सायप्रसमधल्या बँका दिवाळखोरीत निघाल्या होत्या. त्यामुळे सायप्रसला युरोपियन मध्यवर्ती बँक, नाणेनिधी आणि युरोपियन आयोगाकडून कर्ज हवे होते. मात्र ते देण्यासाठी युरोपियन युनियनने मोठ्या ठेवीदारांच्या ठेवी वापरून दिवाळखोरीतल्या बँकांना वाचवण्याची अट घातली. एक लाख युरोपेक्षा जास्त रकमेच्या ठेवींचे रूपांतर बँकांच्या समभागात करून भांडवलाची पुन्हा उभारणी करण्यात आली (Denis, २०१३).

**समारोप**

भारताच्या वित्तीय व्यवस्थेत सहकार हे सातत्याने कोसळणारे क्षेत्र आहे. मागील ३० वर्षांत एकट्या

महाराष्ट्रात १६५ सहकारी बँका बंद पडल्या आहेत. थोडक्यात, दरवर्षी ५ ते ६ बँका महाराष्ट्र राज्यात बंद पडल्या आहेत. भारतात दर महिन्याला एकतरी सहकारी बँक बंद पडते आहे. म्हणजे ठेव विमा आणि पत हमी महामंडळाकडे जे विमा अधिमूल्य जमा झाले त्यातला प्रत्येक पैसा आजपर्यंत सहकारी बँकांमधल्या खातेदारांना वाचवण्यासाठी खर्च झाला आहे. त्यामुळे आपल्या देशाला FRDI विधेयकाऐवजी सहकारी बँकांना स्वच्छ करणाऱ्या एखाद्या विधेयकाची खरी गरज आहे.

**संदर्भ**


1. Gupta Poonam (2014), "Financial Sector Reforms under G-20 and the Indian Banks", The G-20 Macroeconomic Agenda, Ed. Parthasarathi Shome Cambridge, pp. 57-90.
2. Basu Debashis (2017), "FRDI Bill Ignores the Elephant in the Room", Business Standard, Dec 24, 2017.
3. Denis Roland (2013), 'Bank of Cyprus Executes Depositor Bail - In ' "The Telegraph", April 28, 2013.
   http://pib.nic.in/PressReleaseIframepageaspx?PRID=I5149888
4. parliamentlibraryindia.nic.in/writere-addata / Library/ReferenceNotes/ FINANCIAL RESOLUTION AND DEPOSIT INSURANCE BILL 2017.

५. कुरूलकर र. पु. (१९७९), बँकिंगची तत्त्वे आणि बँकिंग पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, pp. ५३२-५३३.


◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ३०० ते ५०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## भावपूर्ण श्रध्दांजली

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूरचे अध्यक्ष व भारताचे माजी अर्थराज्यमंत्री
मा. शांताराम पोटदुखे यांना मराठी अर्थशास्त्र परिषद परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली

**- आर. बी. भांडवलकर,**
**कार्यवाह खजिनदार**

# इ-बँकिंग सेवांमधील ग्राहक समाधान मापनासाठी इ-बँकक्वॉल साधन

**विजय मा. कुंभार** †
विभागप्रमुख,बँकमॅनेजमेंट विभाग,
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा.

**गोषवारा**

विकसित देशातील बँकिंग व्यवसायाप्रमाणेच भारतीय बँकाही आपल्या ग्राहकांना विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाधारित बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा सेवा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय व्यापारी बँका कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करीत आहेत; परंतु या गुंतवणुकीमुळे व नवीन बँकिंग सेवासुविधांमुळे प्रत्यक्ष ग्राहकाच्या समाधानपातळीमध्ये वाढ झालेली आहे की नाही, याचे मापन करणे आवश्यक आहे. तथापि, इ-बँकिंग सेवामधील ग्राहक समाधान मापनासाठी विशेषीकृत पद्धती उपलब्ध नसल्यामुळे प्रस्तुत लेखात इ-बँकक्वॉल (eBankQual) हे साधन (Instrument) विकसित केलेले असून, प्रस्तुत साधनाच्या विविध संख्याशास्त्रीय तपासण्या घेऊन त्याची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे.

## प्रस्तावना

१९व्या दशकात इ-बँकिंग सेवा म्हणजे भारतीय बँक ग्राहकांसाठी एक नवलाई व आश्चर्याची बाब होती. कारण इ-बँकिंग सेवा केवळ विदेशी बँका व काही भारतीय खाजगी व्यापारी बँकांमधूनच उपलब्ध झालेल्या होत्या. सन २००५पर्यंतचा कालवधी विचारात घेता, या सेवा महानगरे व काही मोठ्या शहरांपुरत्याच मर्यादित होत्या. परंतु, सन २०१८ पर्यंत इ-बँकिंग सेवा बहुतांश खेड्यांपर्यंतही पोहोचलेल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, सर्व खाजगी व विदेशी व्यापारी बँका पूर्ण संगणकीकृत असून, देशातील सार्वजनिक बँका, जुन्या खाजगी बँका, नव्या खाजगी बँका, विदेशी बँका व अनेक सहकारी बँकानीही आपल्या ग्राहकांसाठी इ-बँकिंग सेवा सुरू केलेल्या आहेत.

बँक व्यवसायातील संगणकीकरण व इन्टरनेटच्या जोडणीमुळे विविध प्रकारच्या ऑनलाइन सेवा उपलब्ध झाल्या असून, त्यामध्ये इन्टरनेट बँकिंग, मोबाइल ॲपस्, मोबाइल बँकिंग, फोन बँकिंग, एस. एम. एस. बँकिंग, मायकर व CTS समाशोधन, इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फर, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, पॉस टर्मीनल (Point of Sale Terminal -POS) इत्यादी सेवा उपलब्ध झालेल्या आहेत, यालाच एकत्रितपणे इ-बँकिंग सेवा, असे म्हटले जाते. इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फरसाठी सध्या रूपये २ लाखपर्यंतच्या व्यवहारासाठी राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण (National Electronic Fund Transfer- NEFT), तर रुपये १ लाखपेक्षा अधिकच्या व्यवहारांसाठी RTGS (Real Time Gross

†आजीव सभासद क्र. : १२८६, भ्रमणध्वनी : ९८६०१७६०५९, ई-मेल : vijay.kumbhar9@gmail.com

Settelment) सुविधा उपलब्ध आहेत. RTGS व NEFT द्वारे तत्काळ पैसे पाठविण्याची सेवा दिली जात आहे. इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (Electronic Cleaning Service - ECS)च्या द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एका खात्यातून दुसऱ्या खात्यात रक्कम जमा करण्याची सोयही देण्यात येत आहे. सध्या सर्वच बँका मोबाइल फोनद्वारेही पैसे ट्रान्स्फर करणे, खरेदी करणे, शिल्लक तपासणे, बिल भरणा करणे, मागणी नोंदवणे इत्यादी सेवा प्रदान करीत आहेत. या सर्व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या बँकांनी; तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केलेली आहे.

### १.१ संशोधनाचे महत्त्व

अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्रातील संशोधन कार्याचा आढावा घेता असे दिसून येते की, इ-बँकिंग सेवांची उपलब्धता, विकास व इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानपातळीचे वास्तववादी मापन करण्यासाठी फारसे संशोधन झालेले नाही. उलट, इतर सेवांच्या बाबतीत विविध संशोधन संस्था व वैयक्तिक संशोधकांनी मोठ्या प्रमाणात संशोधन केले आहे, अशा संशोधनांचा आधार घेऊन इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मापन करणे; तसेच त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी विशेषीकृत साधन विकसित करण्याची आवश्यकता असल्यामुळे हे संशोधनकार्य हाती घेण्यात आलेले होते. प्रस्तुत लेख हा लेखकाच्या मुख्य संशोधनकार्यावर अवलंबून असून, सदर साधन (Instrument) मराठीतून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### १.२ संशोधनाची उद्दिष्टे

१. सेवाक्षेत्रातील ग्राहक समाधानपातळी मापनाच्या वर्तमान पद्धतींचा आढावा घेऊन इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मोजण्यासाठी विशेषीकृत साधन विकसित करणे.

२. विकसित केलेल्या विशेषीकृत साधनाच्या संख्याशास्त्रीय तपासण्या घेऊन उपयुक्त निर्देशांकाच्या आधारे अंतिम साधन तयार करणे

### १.३ संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत शोधनिबंधात सादर केलेले साधन तयार करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीस्रोतांचा आधार घेण्यात आलेला असून, आवश्यक असणारी दुय्यम माहिती विविध प्रकारच्या नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिकेतून; तसेच विविध विद्यापीठांतून सादर झालेल्या शोधनिबंधांतून घेण्यात आलेली आहे. साधनांची तपासणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्राथमिक माहितीचे संकलन सातारा (महाराष्ट्र) शहरातील ६ बँकांच्या १९० ग्राहकांकडून प्रश्नावलीच्या साहाय्याने केलेले आहे. तसेच, आवश्यकतेप्रमाणे बँकेचे शाखा व्यवस्थापक, कर्मचारी, संगणकतज्ज्ञ इत्यादींशी चर्चा करून अंतिम निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत. साधनांची संख्याशास्त्रीय तपासणी करण्यासाठी क्रोनबँच अल्फा रिलायबिलिटी टेस्ट (Cronbanch's Alpha Reliability Test) बहुचल समाश्रयण (Múltiple Regresión) प्रधान घटक विश्लेषण पद्धती (Principle Component Analysis Method-PCA) व कैसर-मेयर-ओल्कीन निर्देशक (Kaiser-Meyer-Olkin Measure -K-M-O Measure) पद्धतींचा वापर केलेला असून, सर्व माहिती SPSS २०.० या सॉफ्टवेअरच्या साहाय्याने विश्लेषित केलेली आहे.

### वापरण्यात आलेल्या संकल्पना

या शोधनिबंधात विषयमांडणी करण्यासाठी पुढील संकल्पना वापरण्यात आलेल्या आहेत.

- **इ-बँकिंग (E-Banking)** : '' इ-बँकिंग

म्हणजे बँकिंग सेवा प्रदान करण्याची इलेक्ट्रॉनिक पद्धती होय की, जिच्या साहाय्याने बँक कार्यालयात न जाता वैयक्तिक संगणक, इन्टरनेट; तसेच प्रत्यक्ष बँक कार्यालयातून इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या साहाय्याने बँकिंग व्यवहार करण्याची सुविधा दिली जाते.''

- **इ-सेवा (E-Services)** : ''इ-सेवा म्हणजे अशा सेवा की, ज्या सेवा परंपरागत पद्धतीऐवजी इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या आधारे दिल्या व घेतल्या जातात.''

- **ग्राहकसमाधान (Customer Satisfaction)** : ''ग्राहकसमाधान ही एक व्यावसायिक संकल्पना असून, याद्वारे उत्पादक किंवा सेवा पुरवठादाराकडून पुरवलेल्या वस्तू किंवा सेवांमुळे ग्राहकाची अपेक्षापूर्तता झाली की नाही, याची तपासणी केली जाते. ग्राहकसमाधान ही मानसिक जाणीव व स्थिती असते.''

### १.४ पूर्व संशोधनाचा आढावा व गृहीतकांची निर्मिती

सेवाक्षेत्रातील ग्राहकांचे समाधान मापन करण्यासाठी जे-जे संशोधनकार्य झालेले आहे, त्यावरून असे दिसून येते की, सेवेचा दर्जा (Service Quality), ब्रँडपासूनचा लाभ (Brand Perception) आणि सेवेपासून प्राप्त झालेले मूल्य (Percived Value) हे तीन घटक महत्त्वाचे असतात. (पॅराशुअरमन व इतर १९८५, १९८८, २००५; Adam et al (२०१८), कोनीन व टेलर १९९४; झैतमल व इतर १९९६, २०००, २००२; अरोरा व मल्होत्रा, १९९७) Shahid et al., (२०१८). सेवेचा दर्जा हा ग्राहकांच्या समाधानपातळीस प्रभावित करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक असून, सेवेचा दर्जा तपासण्यासाठी विविध संशोधकांनी विविध निर्देशांकांची शिफारस केलेली आहे.

**कोष्टक क्र. १ : संशोधनाचा आढावा**

| संशोधक | साधनाचे नाव | शिफारस केलेले निर्देशक |
|---|---|---|
| पॅराशुअरमन व इतर, १९८८ | SERVQVAL | Reliability, Responsiveness, Assurance, Empathy and Tangibles |
| क्रोनिन व टेलर, १९९४ | SERVFERF | Reliability, Responsiveness, Assurance, Empathy and Tangibles |
| झैतमल व इतर (२०००, २००२) | SITEQUAL | Efficiency, Reliability Fulfillment, Privacy, Responsiveness, Compensation and Contact |
| पॅराशुअरमन व इतर (२००५) | E-S-Qual & E-RecS-Qual | Efficiency, Fulfillment, System availability, Privacy, Responsiveness, Compensation and Contact. |
| अवकिरन (१९९४, २००२) | BANKSERVE | Promptness, Neatness, Apology, Concern, Security, Advice, Polite, Help etc. |
| नाडीरी व इतर (२००९) | BANKZOT | Desired, Adequacy, Predicted and Perceived Service Quality |
| Nuridin (2018) | SERVQVAL | Service Quality, Product Quality, Customer Satisfaction and Customer Loyalty |

| | | |
|---|---|---|
| Shahid et al., (2018) | SST | Sself service technology; customer satisfaction; loyalty |
| Adam et al (2018), | SQ | Readiness, Privacy, Secrecy, Safety, Continuity etc. |

संदर्भ : विविध संशोधनांचा आढावा

पूर्वसंशोधनकार्यातून (कोष्टक क्र. १ वरून) असेही दिसून येते की, सेवेच्या दर्जाबरोबरच सेवा पुरवणाऱ्या संस्थेच्या ब्रॅण्ड नेममुळे (Brand Name) मिळणारे फायदेही महत्त्वाचे असतात. (चो व जोसेफ, २००९; मार्सेल, २००१; वुड्रफ व इतर १९८३ आणि वाफा व इतर, २००९); तसेच नार्वेजिअन कस्टमर सॅटिस्फॅक्शन बॅरोमीटर (Norwegian Customer Satisfaction Barometer - NCSB) मध्येही ब्रॅण्ड परसेप्शन (Brand Perception) हा घटक अत्यंत महत्त्वाचा मानलेला आहे. तथापि, सेवेचा दर्जा आणि ब्रॅन्ड परसेप्शनबरोबरच सेवेपासून प्राप्त होणारे सकल मूल्य (Perceived Value) हा देखील महत्त्वाचा घटक असून, सेवेपासून प्राप्त झालेले मूल्य म्हणजे ग्राहकाने सेवा प्राप्त करून घेण्यासाठी खर्च केलेला वेळ, श्रम व पैसा यांच्या तुलनेत सेवेमुळे झालेल्या सकल लाभाचे प्रमाण होय (क्रोनिन व टेलर १९९४). श्री. साठ्ये १९९९ यांच्या मतानुसार, सेवेच्या दर्जामध्ये वाढ झाली असता, सेवेपासूनचे सकल लाभ मूल्यही वाढत असते, म्हणजेच सेवेचा दर्जा हाच ग्राहक समाधानातील मध्यवर्ती घटक असतो (बेरी व इतर १९९०; झैतमल व इतर १९९८; कुंभार, २०१० व २०११; स्वैप व बेलंगर, २००५ आणि अंडरसन व श्रीनिवासन २००३; Tsoukatos , २००७), Nuridin (२०१८), Adam et al (२०१८), Shahid et al., (२०१८).

**१.५ संशोधनातील परिकल्पना/ गृहीतके**

उपलब्ध संशोधनसाहित्य व तज्ज्ञांशी केलेल्या चर्चेवरून सदर अभ्यासासाठी पुढील परिकल्पना/गृहीतके (Hypothesis) मांडलेली आहेत.

१. सेवेचा दर्जा हा इ-बँकिंगमधील ग्राहकाच्या समाधानपातळीस प्रभावित करणारा घटक आहे.

२. ब्रॅन्ड नेममुळे मिळणारा लाभ हा इ-बँकिंगमधील ग्राहकाच्या समाधानपातळीस प्रभावित करणारा घटक आहे.

३. सेवेपासूनचे प्राप्त मूल्य हा इ-बँकिंगमधील ग्राहकाच्या समाधानपातळीस प्रभावित करणारा घटक आहे.

**१.६ ग्राहकाच्या समाधानमापनासाठी विशेषीकृत साधनाची आवश्यकता**

बँकिंग सेवा या इतर सेवाक्षेत्रातील सेवांप्रमाणेच असल्या, तरी सर्वसाधारण सेवा व बँकिंग सेवा यांमध्ये मूलभूत फरक आहे. बँकिंगविषयक सेवांमध्ये वित्तीय धोका, फसवणूक, अचूकता, वक्तशीर पोहोच इत्यादी बाबींना सर्वाधिक महत्त्व असते, तर सर्वसाधारण सेवांमध्ये सेवांचा दर्जा, सेवा देणाऱ्याचा विनम्रपणा, सेवेचे दर या घटकांना अधिक महत्त्व असते; म्हणून इतर सर्वसाधारण सेवांबाबतच्या ग्राहक समाधानाचे मापदंड इ-बँकिंग सेवांसाठी अपुरे वाटतात. तसेच, इ-बँकिंगसेवा या परंपरागत बँकिंग सेवांपेक्षाही भिन्न आहेत. इ-बँकिंग सेवांमध्ये ग्राहकसमाधान तपासण्यासाठी वरील मापदंडाबरोबरच सोयीस्करपणा, उपलब्धता, गती, सुरक्षितता, अचूकता इत्यादी मापदंडही आवश्यक वाटतात म्हणूनच इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मोजण्यासाठी विशेष पद्धतीची आवश्यकता आहे.


सध्या जगातील विविध संशोधक व विपणनविषयक संशोधन संस्था ग्राहकांच्या समाधानाचे मापन करण्यासाठी अमेरिकन कस्टमर सॅटिस्फॅक्शन इन्डेक्स (ACSI), स्वीडिश कस्टमर सॅटिस्फॅक्शन बॅरोमीटर (SCSB), युरोपियन कस्टमर सॅटिस्फॅक्शन इन्डेक्स (ECSI), सर्व्हिस क्वॉलिटी इन्डेक्स (SQI) व नॉर्वेजियन कस्टमर सॅटिस्फॅक्शन बॅरोमीटर (NCSB) इत्यादींचा अवलंब करीत असले, तरी इ-बँकिंग सेवाविषयक समाधानपातळीचे मापन करण्यासाठी वरील कोणतीही पद्धती खात्रीशीरपणे वापरता येत नाही.

### १.७ इ-बँकक्वॉल (eBankQual) साधन

पूर्वसंशोधनाचा आढावा घेऊन आणि बँकिंग तज्ज्ञांशी चर्चा करून इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांची समाधानपातळी मोजण्यासाठी इ-बँकक्वॉल (eBankQual) हे साधन विकसित केलेले असून, त्याचे स्वरूप पुढील आकृती क्रमांक १ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. वास्तविक पाहता सदर साधनाची मूलभूत संकल्पना जयवर्धन (Jayawardhane, २००६) यांनी सन २००६ मध्ये ग्रीसमध्ये पार पडलेल्या युरोपियन मार्केटिंग ॲकॅडमीच्या कॉन्फरन्समध्ये मांडलेली होती. परंतु सदर साधन हे अत्यंत प्राथमिक स्वरूपाचे असल्यामुळे सन २०११ पर्यंत कोणीही त्याचा पुनर्वापर केलेला दिसत नाही. म्हणूनच सदर शोधनिबंधात त्यामध्ये पुनर्रचना व सुधारणा करून उपयुक्त साधन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आकृती क्र. १ मध्ये १२ निर्देशक (यंत्रणेची उपलब्धता, इ-परिपूर्णता, अचूकता, कार्यक्षमता, सुरक्षितता/विश्वसनीयता, जबाबदारपणा, सुलभता, सोयीस्करपणा, मितव्ययता, समस्या निवारण, क्षतीपूर्ती व संपर्क व्यवस्था) हे सेवेच्या दर्जाचे निर्देशक म्हणून वापरले असून, ब्रॅन्डनेममुळे मिळणारा लाभ व सेवेपासून मिळणारे मूल्य ही अवलंबित चले म्हणून गृहीत धरण्यात आलेली आहेत. यावर सेवेच्या दर्जाचा प्रभाव असतो, असे गृहीत धरण्यात आलेले आहे.

आकृती क्र. १ : ई-बँकक्वॉल (eBankQual) साधन



**कोष्टक २-अ: बहुचल समाश्रयण विश्लेषण निष्कर्ष**

| Model 1 | R | R Square | Adj.R Square | Std. Error of Esti. |
|---|---|---|---|---|
| | .914a | .835 | .832 | .07946 |

a. स्वावलंबी चले: सेवेच्या दर्जा, ब्रॅन्डनेममुळे मिळणारा लाभ, सेवेपासून मिळणारे मूल्य

| | | Unstand. Coeffi. | | Stand. Coeffi. | t | Sig. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | B | Std. Error | Beta | | |
| 1 | (स्थिरांक) | .003 | .003 | | 1.045 | .297 |
| | सेवेच्या दर्जा | .855 | .001 | .828 | 812.10 | .000 |
| | ब्रॅन्डनेममुळे मिळणारा लाभ | .072 | .002 | .155 | 34.787 | .000 |
| | सेवेपासून मिळणारे मूल्य | .069 | .002 | .138 | 28.739 | .000 |

a. अवलंबित चल: Overall Satisfaction

**कोष्टक २-ब: बहुचल समाश्रयण विश्लेषण निष्कर्ष**

| Model | | Unstand. Coefficients | | Stand. Coefficients | t | Sig. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | B | Std. Error | Beta | | |
| 1 | **(स्थिरांक)** | -.०२४ | .०१२ | | -१.९७७ | .०५० |
| | यंत्रणेची उपलब्धता | .०६० | .००३ | .०९८ | २१.२४९ | .००० |
| | इ-परिपूर्णता | .०९० | .००४ | .१२९ | २३.८५६ | .००० |
| | अचूकता | .०५२ | .००३ | .०७१ | १८.७९७ | .००० |
| | कार्यक्षमता | .०८६ | .००४ | .११४ | २२.७२८ | .००० |
| | सुरक्षितता/विश्वसनीयता | .०७३ | .००३ | .१०० | २१.१७० | .००० |
| | जबाबदारपणा | .०६१ | .००२ | .१०८ | २५.७७३ | .००० |
| | सुलभता | .०७३ | .००२ | .१४८ | ४०.१७० | .००० |
| | सोयीस्करपणा | .०७३ | .००२ | .१५७ | ३५.३९९ | .००० |
| | मितव्ययता | .०७० | .००३ | .११४ | २४.३७२ | .००० |
| | समस्या निवारण | .०७९ | .००३ | .१२३ | २५.६३३ | .००० |
| | क्षतीपूर्ती | .०७४ | .००२ | .१७८ | ४७.५४३ | .००० |
| | संपर्क व्यवस्था | .०७२ | .००२ | .१५५ | ३७.२४० | .००० |
| | ब्रॅन्डनेममुळे मिळणारा लाभ | .०७२ | .००२ | .१५५ | ३४.७८७ | .००० |
| | सेवेपासून मिळणारे मूल्य | .०६९ | .००२ | .१३८ | २८.७३९ | .००० |

### १.८ इ-बँकक्वॉलची संख्याशास्त्रीय तपासणी (Statistical Tests of eBankQual)

प्रस्तुत संसाधनाची तपासणी करण्यासाठी जे निर्देशक वापरण्यात आलेले आहेत, ते योग्य (Reliable) आहेत की नाहीत हे तपासण्यासाठी क्रोनबॅच आल्फा रिलायबिलिटी (Cronbach's Alpha Reliability Test) टेस्ट घेण्यात आली; या टेस्टमध्ये सर्व निर्देशकांची अल्फा किंमत अपेक्षित अल्फा किंमत ०.७०० पेक्षा अधिक असल्यामुळे सर्व १४ निर्देशकांचा वापर करण्यात आलेला आहे.

### १.८.१ बहुचल समाश्रयण विश्लेषण (Multiple Regression Analysis)

इ-बँकिंग सेवेबाबतच्या समाधानपातळीवर परिणाम करणारे घटक कोणते आहेत; तसेच प्रस्तुत संशोधनकार्यात वापरण्यात आलेल्या १४ निर्देशकांपैकी कोणते निर्देशक अधिक प्रभावी आहेत, हे तपासण्यासाठी बहुचल समाश्रयण पद्धतीचा वापर करण्यात आला, त्याचे निष्कर्ष कोष्टक क्र. २-अ व २-ब मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

a. **स्वावलंबी चले:** सेवेच्या दर्जाचे सर्व १४ निर्देशक

कोष्टक क्र. २-अ व कोष्टक २-ब वरून असे दिसून येते की, सर्व निर्देशक अवलंबित चल ग्राहकाचे सकल समाधान (Overall satisfaction) चे चांगले भाकीतक (Good Predictor) आहेत; कारण समाश्रयणाचे महत्त्व मूल्य (Sig. Value).०५० पेक्षा कमी आहेत, त्यामुळे सदर संशोधनातील तीनही गृहीतके सत्य (Hypothesis Acceptable) असल्याचे दिसून येते.

### १.८.२ प्रधान घटक विश्लेषण (Principle Component Analysis - PCA)

इ-बँकिंगमध्ये ग्राहकांच्या समाधानावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांमधील सर्वाधिक महत्त्वाचे घटक ओळखण्यासाठी प्रधान घटक विश्लेषण (PCA) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तथापि, हे विश्लेषण करण्यासाठी संकलित केलेला डाटा उपयुक्त आहे की नाही, ते तपासण्यासाठी कैसर-मेयर-ओल्कीन (K-M-O) टेस्ट व बार्टलेट स्फेरिसिटी (Bartletts Sphericity) टेस्ट घेण्यात आली आहे. या दोन्ही टेस्ट नकारात्मक आल्यास PCA विश्लेषण करणे उपयुक्त ठरत नाही. (मार्शल व इतर,२००७; बारका व इतर,२००७)

**कोष्टक ३ : K-M-O d B. S. Test**

| | | |
|---|---|---|
| K-M-O Measure | | ०.८१९ |
| Bartletts Test of Sphericity | Approx chi-square | ११७०.८४१ |
| | Df | ९१ |
| | Sig. | ००० |

कोष्टक ३ वरून असे दिसून येते की, K-M-O टेस्टचे मूल्य ०.८१९ आलेले असून, ते अपेक्षित मूल्य ०.७०० पेक्षा अधिक असून, बार्टलेट टेस्ट ही सकारात्मक (Positive) आलेली आहे. (Chi-Square = ११७०.८४१, df = ९१, Sig.= ०००) त्यामुळे सदर डाटा विश्लेषणासाठी उपयुक्त असल्याचे दिसून येते.

**कोष्टक क्र. ४ : प्रधान घटक विश्लेषण (Three Factor Solution)**

| | Initial Eigenvalues | | | Rotation Sums of Squared Loadings | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total | % of Variance | Cumulative % | Total | % of Variance | Cumulative % |
| १ | ५.६४६ | ४०.३२८ | ४०.३२८ | ४.५३३ | ३२.३७९ | ३२.३७९ |
| २ | २.४०९ | १७.२०९ | ५७.५३७ | ३.४५१ | २४.६४७ | ५७.०२६ |
| ३ | १.३०१ | ९.२९४ | ६६.८३१ | १.३७३ | ९.८०५ | ६६.८३१ |
| ४ | .८७० | ६.२१७ | ७३.०४८ | | | |
| ५ | .६५३ | ४.६६३ | ७७.७११ | | | |
| ६ | .५९१ | ४.२२१ | ८१.९३२ | | | |
| ७ | .५११ | ३.६४९ | ८५.५८१ | | | |
| ८ | .४६१ | ३.२९१ | ८८.८७३ | | | |
| ९ | .४०६ | २.८९९ | ९१.७७२ | | | |
| १० | .३७० | २.६४१ | ९४.४१३ | | | |
| ११ | .२८७ | २.०४८ | ९६.४६१ | | | |
| १२ | .२२७ | १.६२१ | ९८.०८२ | | | |
| १३ | .१५५ | १.१०७ | ९९.१८९ | | | |
| १४ | .११३ | .८११ | १००.००० | | | |

**कोष्टक क्र. ५ : प्रधान घटक प्रभाव विश्लेषण**

| | घटक १ | घटक २ | घटक ३ |
|---|---|---|---|
| कार्यक्षमता | .८६८ | | |
| सुरक्षितता/विश्वसनीयता | .८५३ | | |
| मितव्ययता | .८२५ | | |
| समस्यानिवारण | .७७३ | | |
| जबाबदारपणा | .७३५ | | |
| इ-परिपूर्णता | .७३५ | | |
| अचूकता | .६२६ | | |
| सेवेपासून मिळणारे मूल्य | | .८२७ | |
| ब्रॅन्डनेममुळे मिळणारा लाभ | | .८०६ | |
| संपर्क व्यवस्था | | .६८३ | |
| सोयिस्करपणा | | .६८२ | |
| यंत्रणेची उपलब्धता | | .६३० | |
| सुलभता | | | .६०६ |
| क्षतीपूर्ती | | | .८०८ |
| Eigenvalues | ४.५३३ | ३.४५१ | १.३७३ |
| Variance | ३२.३७९ | २४.६४७ | ९.८०५ |
| Cumulative Variance | ३२.३७५ | ५७.०२६ | ६६.८३१ |

कोष्टक क्र.४ वरून असे दिसून येते की, PCA विश्लेषणाद्वारे तीन घटक सोल्युशन (Three Factor Solution) मिळालेले असून, घटक १ हा ३२.३७%, घटक-२ हा २४.६४% व घटक-३ हा ९.८०५% परिणामकारण (Explaining Variance to Overall Customer Satisfaction in e-banking Service) असून तिन्ही घटकांचा ग्राहकाच्या एकूण समाधानावरील प्रभाव ६६.८३% आहे. उर्वरित १३ घटकांच्या इगीनव्हॅल्यू (Eigenvalues) १ पेक्षा कमी असल्यामुळे ते घटक प्रतिमानामध्ये महत्त्वाचे नाहीत, असे दिसते. परंतु, कोष्टक क्र. ५ वरून असे दिसून येते की, प्रस्तावित सर्व १४ निर्देशक घटक-१, घटक-२ व घटक-३ मध्ये समाविष्ट झालेले आहेत.

कोष्टक क्र. ५ वरून असे दिसून येते की, कार्यक्षमता, सुरक्षितता, मितव्यवता, समस्यानिवारण, जबाबदारपणा, परिपूर्णता व अचूकता हे प्रथम श्रेणीचे घटक (Factor-1) असून, ते सर्व एकत्रितपणे ३२.३७% प्रभाव टाकतात, तर सेवेपासूनचे मूल्य, ब्रॅन्डपासूनचा लाभ, संपर्क यंत्रणा, सोयिस्करपणा व यंत्रणेची उपलब्धता हे द्वितीय श्रेणीचे घटक (Factor-2) असून, ते एकत्रितपणे २४.६४% प्रभाव टाकतात आणि सुलभता व क्षतीपूर्ती हे तृतीय श्रेणीचे घटक (Factor-3) असून, ते ग्राहकाच्या एकूण समाधानावर ९.८०% प्रभाव टाकतात, हे सिद्ध होते.

## सारांश

प्रस्तुत शोधनिबंधातील निष्कर्षांमधून असे दिसून येते की, इ-बँकिंग सेवेतील ग्राहकसमाधानाच्या मापनामध्ये सेवेचा दर्जा, ब्रॅन्डपासूनचा लाभ आणि सेवेपासून ग्राहकास प्राप्त होणारे मूल्य हे तीन महत्त्वाचे घटक असून, सेवेचा दर्जा हा विविध प्रकारच्या १२ घटकांचा एकत्रित प्रभाव असतो. तथापि, सर्व घटकांचा प्रभाव हा समान नसून, प्रत्येक घटकाचा एकूण ग्राहक समाधानावरील परिणाम हा वेगवेगळा असतो. प्रस्तुत शोधनिबंधातील विश्लेषणातून असे दिसून येते की, इ-बँकिंग सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या समाधानावर परिणाम करणाऱ्या घटकांचे मापन करण्यासाठी इतर eBankQual सर्वसामान्य साधनापेक्षा हे एक उपयुक्त व विशेषीकृत साधन म्हणून वापरता येणे शक्य आहे (कुंभार, २०१०; २०११). तथापि, eBankQual चे निष्कर्ष हे एका शहरातील सर्वेक्षणावर आधारित असल्यामुळे त्यांच्या पुनर्तपासणीची गरज आहे; तसेच eBankQual मध्ये अनवधानाने राहिलेल्या चुकांच्या सुधारणांचीही गरज आहे.

## संदर्भसूची


1. Arora and Malhotra (1997), Customer Satisfaction: A Comparative Analysis of Private and Public Sector Banks, Decision, Vol. 24 No. 1, Jan – Dec, 1997.
2. Avkiran, N. K.(2002) 'Credibility and Staff Conduct Make or Break Bank Customer Service Quality', Journal of Asia-Pacific Business, 3: 3, 73 — 91.
3. Avkiran, N. K., 1994. Developing an Instrument to Measure Customer Service Quality in Branch Banking. International Journal of Bank Marketing. 12(6), 10-18.
4. Cho Yoon, and Joseph Ha (2008), Users' Attitudes Toward Movie-Related Websites And E-Satisfaction, Journal Of Business Economics Research Volume 2, Number 3.
5. Cronin, J., Taylor, S.A. (1992), "Measuring service quality: a Reexamination and extension", Journal of Marketing, 56 (July), 55-68.
6. Cronin, Joseph J. Jr. en Steven A. Taylor (1994) "SERVPERF Versus SERVQUAL: Reconciling Performance-Based and Perceptions-Minus-Expectations Measurement of Service Quality", Journal of Marketing, volume 58, No 1, (January 1994), p125-131.

7. Jayawardhena, C., & Foley, P. (2000). Changes in the Internet banking sector – The case of internet banking in UK, Internet Research. Electronic Networking Applications and Policy, 10(1), 19-30.
8. Kumbhar Vijay M. (2009), Alternative Banking : A Modern Practice in India, Professional Banker, Vol. IX, Issue 9, December 2009, The ICFAI University Press.
9. Kumbhar Vijay M. (2010), Reliability and validity of 'eBankQual' Scale in ATM Service Settings: A Study, VINIMAYA, Vol. XXXI, No. 4, Published by National Institute of Bank Management, Pune, ISSN:0970-8456.
10. Kumbhar Vijay M. (2011), Factors Affecting on Customers' Satisfaction: "An Empirial Investigation of ATM Service", International Journal of Business Economics and Management Research, Volume 2, Issue 3 (March, 2011) ISSN:2229-4848.
11. Marcel Gommans, Krish S. Krishnan, & Katrin B. Scheffold (2001), From Brand Loyalty to E-Loyalty: A Conceptual Framework, Journal of Economic and Social Research 3(1) 2001, 43-58.
12. Nadiri, Halil, Kandampully, Jay and Hussain, Kashif(2009) 'Zone of tolerance for banks: a diagnostic model of service quality', The Service Industries Journal, 29: 11, 1547 — 1564.
13. Parasuraman A. Zeithaml Valarie A. and Malhotra Arvind (2005) E-S-QUAL: A Multiple-Item Scale for Assessing Electronic Service Quality, Journal of Service Research, Volume 7, No. X, Month 2005 1-21.
14. Parasuraman, A. Valarie A. Zeithaml, Leonard L. Berry (1985) A Conceptual Model of Service Quality and Its Implications for Future Research, The Journal of Marketing, Vol. 49, No. 4 (Autumn, 1985), pp. 41-50.
15. Parasuraman, A., Zeithaml, V. A., & Berry, L. L. (1988), "SERVQUAL: A Multiple-Item Scale For Measuring Consumer Perceptions Of Service Quality", Journal Of Retailing, Spring, Volume 64, Number 1, pp. 12-40.
16. Sathye, Milind (1999) "Adoption of Internet banking by Australian consumers: an empirical investigation", International Journal of Bank Marketing, Vol. 17 Iss: 7, pp.324 – 334.
17. Schaupp and Bélanger (2005) A Conjoint Analysis of Online Consumer Satisfaction, Journal of Electronic Commerce Research, VOL. 6, NO.2, 2005 PP 95-111.
18. Tsoukatos Evangelos K., (2007) Customer behaviour, service quality and the effects of culture: A quantitative analysis in Greek insurance, Thesis Submitted for the Degree of PhD 9th April 2007 to Lancaster University, Management School, Department of Management Science.
19. Wafa M'Sallem, Nabil Mzoughi and Olfa Bouhlel (2009), Customers' evaluations after a bank renaming: effects of brand name change on brand personality, brand attitudes and customers' satisfaction, Innovative Marketing, Volume 5, Issue 3, 2009 58.
20. Woodruff Robert B., Cadotte Ernest R., Jenkins Roger L., (1983) Modeling Consumer Satisfaction Processes Using Experience-Based Norms , Journal of Marketing Research, Vol. 20, No. 3 (Aug., 1983), pp. 296-304.
21. Zeithamal , Parasuraman, Malhotra (2002), "Service Quality Delivery through Web Sites: A Critical Review of Extant Knowledge," Journal of the Academy of Marketing Science, 30 (4), 362-75.
22. Zeithaml (2000) Service Quality, Profitability, and the Economic Worth of Customers: What We Know and What We Need to Learn, Journal of the Academy of Marketing Science. Volume 28, No. 1, pages 67-85.
23. Zeithaml, V., Berry, L. and Parasuraman, A. 1996, 'The behavioral consequences of

service quality', Journal of Marketing, vol. 60, no. 2, (April) pp. 31-46.

24. Nuridin, S. M. (2018). Effect of service quality and quality of products to customer loyalty with customer satisfaction as intervening variable in PT. nano coating Indonesia. International Journal of Business and Applied Social Science, 4(1), 19-31. http://nbn-resolving.de/urn: nbn:de: 0168-ssoar-55666-2.

25. Lin, J.-S. C., & Hsieh, P.-L. (2011). Assessing the self-service technology encounters: Development and validation of SSTQUAL Scale. Journal of Retailing, 87(2), 194–206. https://doi.org/10.1016/ j.jretai.2011.02.006.

26. Muhammad Shahid Iqbal1, Masood Ul Hassan and Ume Habibah (2018),Impact of self-service technology (SST) service quality on customer loyalty and behavioral intention: The mediating role of customer satisfaction, Cogent Business & Management (2018), 5: 1423770.

27. Adam Ahmed Musa Hamid1,Nabil Mohamed Abdo Alabsy, Mohanad Abbas Mukhtar (2018), The Impact of Electronic Banking Services on Customer Satisfaction The Impact of Electronic Banking Services on Customer Satisfaction, International Business Research; Vol. 11, No. 6; 2018.

◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## मतदानासाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात संपन्न होणाऱ्या साधारण सभेत कार्यकारी मंडळातील रिक्त होणाऱ्या विविध पदाकरिता (अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, विश्वस्त, कार्यकारी मंडळ सदस्य) मतदान घेतले जाते. याकरिता परिषदेच्या आजीव सदस्यांनी छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड (शासनाचे), पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे. ४२ व्या वार्षिक अधिवेशनापासून साधारण सभा समारोपीय कार्यक्रमानंतर अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजता घेण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने सर्वांच्या सोयीकरिता घेतला आहे, याची नोंद घ्यावी.

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे संपन्न होणाऱ्या ४२ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता आपणा सर्वांना आग्रहाचे निमंत्रण.

**आर.बी. भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार

## आभार

भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद, नवी दिल्ली,(ICSSR) यांचेकडून मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४२व्या अधिवेशनाकरीता (सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर) रू. १,७५,००० एवढा भरीव निधी मंजूर केल्याबद्दल परिषदेच्या वतीने जाहीर आभार.

**आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार

# नगदरहित अर्थव्यवहार : वास्तव समजून घेण्याची गरज...

**मारोती वीरभद्र तेगमपुरे** †
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
गोदावरी कला महाविद्यालय, अंबड, जि. जालना.

नगदरहित (Cashless) अर्थव्यवस्था किंवा अर्थव्यवहार ही संकल्पना अनेक अर्थाने वेगळी आहे. जगातील अनेक राष्ट्रांनी या मार्गाचा काही प्रमाणात निश्चितच अवलंब केला आहे; परंतु भारतीय परिप्रेक्षात याकडे पाहू गेल्यास ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी केंद्र सरकारकडून घेण्यात आलेल्या निश्चलनीकरणाच्या (Demonetization) निर्णयामुळे देशात बऱ्यावाईट परिणामांची चर्चा सुरू झाल्यानंतर किंवा असे म्हणता येईल की, देशात निश्चलनीकरणाचे धोरण स्वीकारण्यामागील उद्दिष्टांच्या सर्वंकष अपयशानंतर हाती आलेल्या माहितीनुसार, हे स्पष्ट होते की, निश्चलीकरणाचा निर्णय लोकशाही प्रक्रियेस बाजूला सारून घेण्यात आला आहे. केवळ राजकीय मंडळींनाच नव्हे, तर अर्थतज्ज्ञानांही विश्वासात घेतले गेले नाही. यावर जोरदार हल्ला चढविला गेल्यानंतर यास बगल देण्याच्या हेतूने व नगदी चलनाची भासत असलेली उणीव दूर करण्याच्या उद्देशाने नगदरहित अर्थव्यवहारांची देशात चर्चा सुरू करण्यात आली. एकूणच नगदरहित धोरणाची काहीशी बंधनकारक अंमलबजावणी करण्याचे ठरविल्यामुळे याविषयीची सकारात्मक व नकारात्मक चर्चा देशभर सुरू झाली. केवळ तीन महिन्यांत महाराष्ट्र राज्यात नगदरहित अर्थव्यवहार संपन्न करू, अशा स्वरूपाची कविकल्पित विधानेही करून राज्यकर्ती मंडळी आता शांत झाली आहेत. या पार्श्वभूमीवर नगदरहित अर्थव्यवहार धोरणाचा तटस्थपणे अभ्यास करणे आवश्यक आहे.

### नगदरहित अर्थव्यवहार म्हणजे काय ?

नगदरहित अर्थव्यवस्था म्हणजे अशी व्यवस्था की, ज्या ठिकाणी अधिकाधिक आर्थिक व्यवहार डिजिटल माध्यमांद्वारे पूर्ण केले जातात. ढोबळमानाने आपणांस असे म्हणता येईल की, प्रत्यक्ष व्यवहार करण्याच्या उद्देशाने चलनाचा वापर न करता व्यवहार करणे होय. प्रामुख्याने नगदरहित अर्थव्यवस्था इ वॉलेट, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, युपीआय, मायक्रो एटीएम, मोबाइल वॉलेट, पेटीएम, पे फोन, तेज ॲप, भीम ॲप, डिजिटल पेमेंट, मोबाइल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, आरटीजीएस, एनईएफटी, आधारकार्डच्या साहाय्याने धनादेश ही यादी आपणांस अशीच पुढेपुढे वाढवत नेता येईल. चलनाचा प्रत्यक्ष वापर न करता झालेले किंवा केलेले अर्थव्यवहार म्हणजेच नगदरहित व्यवहार होय. थोडक्यात, आपणांस असे म्हणता येईल की, अर्थव्यवहारासाठी रोख चलनाऐवजी विनिमयव्यवहार करण्याच्या उद्देशाने डिजिटल व्यवहार पद्धतीचा वापर

† आजीव सभासद क्र. :१२९५, भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७, ई-मेल : maruti3137@gmail.com

करून केलेला व्यवहार म्हणजे नगदरहित अर्थव्यवहार होय.

## समस्यासूत्र

अभ्यासविषयाच्या दृष्टीने समस्या सूत्र अतिशय महत्त्वाचे असते. केंद्र सरकारने निर्देशित केल्याप्रमाणे भारतीय बँकिंग व्यवस्था आपले अर्थव्यवहार नगदरहित तत्त्वाला जोडून करण्यावर भर देत आहे, हे समजल्यास किती प्रमाणात हा व्यवहार होत आहे, त्याचा संशोधनात्मक दृष्टीने अभ्यास होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

## अभ्यासविषयाच्या दृष्टीने तथ्यसंकलन

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम आधारसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके यांबरोबरच संकेतस्थळांचाही वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रत्यक्ष निरीक्षणाचाही उपयोग झाला आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे

१. नगदरहित अर्थव्यवहाराच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

२. प्रत्यक्ष निर्णय, वास्तव व्यवहार आणि दिशाभूल करणारा प्रचार यातील सहसबंध तपासणे.

## नगदरहित अर्थव्यवहाराचे फायदे

१. व्यवहारात गतिशीलता येते.

२. गुन्हेगारी प्रवृत्तीस आळा बसेल.

३. रोख पैसे जवळ बाळगण्यातील जोखीम कमी होते.

४. पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवहारांस चालना मिळते.

५. करचुकवेगिरीस लगाम लावता येतो.

६. भ्रष्टाचारावर नियंत्रण प्राप्त करता येते.

नगदरहित अर्थव्यवहाराचे उपरोक्त फायदे होत असले, तरी होणाऱ्या आणि झालेल्या काही गंभीर परिणामांचाही आपणांस विचार करावा लागेल, जेणेकरून या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना सामान्य नागरिकांना बसणाऱ्या फटक्यांची तीव्रता काही प्रमाणात का होईना कमी करता येईल.

## नगदरहित अर्थव्यवहारांचे परिणाम

**सायबर गुन्ह्यातील वाढ -** नगदरहित अर्थव्यवहार म्हणजे रोख वगळून व्यवहार होय, हे आपण यापूर्वीच पाहिले आहे. या पद्धतीच्या व्यवहारांमुळे सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. इंडियन एक्सप्रेसच्या (www.indian express.com) संकेतस्थळावर याविषयीची महत्त्वपूर्ण आकडेवारी दिली आहे. खातेदारांच्या खात्यावरील रक्कम परस्पर पळवल्याचे अनेक प्रकार पाहावयास मिळत आहेत, अशा प्रकारची तक्रार पोलिसांत दाखल करूनही त्यामधून दीर्घकाळ काहीही निष्पन्न होत नसल्याचेच स्पष्ट झाले असल्यामुळे संबंधित खातेदारास मोठ्या प्रमाणावरील मानसिक तणावाचा सामना करावा लागला आहे, लागत आहे. यामधून नव्याने वेगवेगळ्या स्वरूपाच्या समस्या उद्‌भवत असून, या समस्यांना अनेक कंगोरे प्राप्त झाले आहेत. या बाजूने भविष्यात विचार करून यावरील सकारात्मक उत्तरे शोधावी लागतील.

## संगणक; अर्थात इंटरनेट साक्षरतेचा अभाव

भारत हा खेडयांचा देश असून २०११ च्या जनगणनेनुसार, देशात ६ लाख ४० हजार ८६७ इतकी खेडी आहेत. या खेड्यांमधून देशातील एकूण लोकसंख्येच्या ६८.८४ टक्के इतकी लोकसंख्या वास्तव्य करते. ग्रामीण भागांत अजूनही आवश्यक सोयीसुविधा पोहोचलेल्या नाहीत, अनेक खेड्यांत

अजूनही पूर्णवेळ विजेची सोय नाही, संगणक आणि इंटरनेटच्या बाबतीत देशात ३५० दशलक्ष नेट वापरकर्ते आहेत. नेट वापराचे प्रमाण २७ टक्के इतकेच आहे, जे की अन्य राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे. केनिया, नायजेरियासारख्या राष्ट्रात ६७ टक्के नेट वापरकर्ते आहेत. भारतात स्मार्ट फोन वापराचे प्रमाण आजही १७ टक्के इतकेच आहे. त्यातील फक्त १५ टक्के भारतीय त्यावर इंटरनेटचा वापर करतात, याबरोबरच भारतात उपलब्ध होत असलेल्या इंटरनेटच्या गतीचाही विचार करावा लागेल आणि तो केल्यास असे लक्षात येते की, गतीच्या बाबतीत जगात भारत ११४ व्या क्रमांकावर आहे. भारताची गती २.८ एमबीपीएसइतकी कमी आहे, तर जपानसारख्या राष्ट्रात ही गती १७.४ एमबीपीएसएवढी अधिक आहे. भारतातील डेटा प्लान्स हे जगातील अतिशय स्वस्त डेटा प्लान्समध्ये येतात. भारतातील ९५० दशलक्ष लोक आजही इंटरनेटचा वापर करीत नाहीत. देशातील ७६ टक्के लोकांना इंटरनेटविषयी काहीही माहिती नाही. यावरून देशातील नागरिकांच्या एकूण आर्थिक परिस्थितीची कल्पना करता येऊ शकते आणि नगदरहित अर्थव्यवस्था राबवीत असताना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, लागणार आहे याविषयीचा अंदाज येऊ शकतो. ऑनलाइन व्यवहार करीत असताना इंटरनेटची आवश्यक गती प्राप्त न झाल्यामुळे अनेक खातेदारांचे पैसे खात्यातून कपात होऊनही व्यवहार पूर्ण झाला नसल्याचे पाहावयास मिळते. यामुळे खात्यावर रक्कम नाही आणि व्यवहारही पूर्ण नाही, अशी दुहेरी अडचण निर्माण झाल्याचे स्वानुभवातून सिद्ध झाले आहे. यावर आपण काय उपाययोजना करणार आहोत.

एप्रिल, २०१७ पासून भारताच्या मध्यवर्ती बँकेने डेबिट व क्रेडिट कार्ड वापरावर कॅश हॅन्डलिंग चार्ज, सेवा चार्ज व अधिभार लावण्याचे धोरण आखले आहे. यामुळे ग्राहकांवर अतिरिक्त बोजा पडत आहे. लोक असाही विचार करू लागले आहेत की, रोख व्यवहार करताना या भुर्दंडास सामोरे जावे लागत नव्हते; पण नगदरहित अर्थव्यवहार केल्यामुळे अनेक चार्जेसला सामोरे जावे लागत आहे.

नगदरहित अर्थव्यवहार ही प्रक्रिया पूर्णत्वास जाण्यासाठी किमान अपेक्षा अशी आहे की, हा व्यवहार करू इच्छिणाऱ्यांचे बँकेत खाते असणे अत्यावश्यक आहे. खात्यावर शिल्लक असणे ही दुसरी अट आहे. वित्तीय साक्षरतेचा देशात मोठ्या प्रमाणात अभाव असल्यामुळे या सर्वच गोष्टींचे ज्ञान सामान्य ग्राहकांना असेलच असे नाही, ते कसे आपणांस पुढीलप्रमाणे समजून घेता येईल.

सर्वांना इंटरनेटच्या सेवा पुरविण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या अनेक कंपन्या आज मितीस देशात कार्यरत आहेत. यामधील एक म्हणजे एअरटेल. या एअरटेल कंपनीने आपली पेमेंट बँक सुरू केली असून, या कंपनीच्या मोबाइलधारकांना त्यांनी आपले परस्पर सभासद करून घेतले आहे. यातील संख्येने अधिक आर्थिक दुर्बल घटकातील असल्यामुळे त्यांना घरगुती वापराच्या गॅससाठी दिले जाणारे अनुदान प्राप्त होत होते. हे अनुदान त्यांच्या व्यापारी बँकेतील खात्यावर जमा होत असते. मागील काही महिने ते अचानकपणे जमा होण्याचे थांबले, याविषयीची माहिती काढल्यावर समजले की, ती आता त्यांच्या एअरटेल पेमेंट खात्यामध्ये जमा होत आहे. व्यापारी बँकेतून पैसे काढणे, जमा करणे, एटीएमचा वापर करणे हे त्यांना माहीत होते. एअरटेल पेमेंट बँकेचे व्यवहार कसे करायचे, याचे त्यांना कोणतेही ज्ञान नसल्यामुळे बरीच ओरड सुरू झाली व कंपनीकडून त्यावर बरेच खुलासेही करण्यात आले. मुळात पूर्वसंमती न घेता, अशा पद्धतीने अनुदानाची रक्कम वळवणे, हा गुन्हा आहे. यावरून

आपणांस स्पष्टपणे असे मांडता येईल की, नगदरहित अर्थव्यवहाराच्या नावाखाली वित्तीय साक्षरतेचा अभाव असणाऱ्या सामान्य नागरिकांना कोणत्या दिव्व्यातून जावे लागणार आहे, याची पुरेशी कल्पना येऊ शकते. अशा स्वरूपाची आपणांस अनेक उदाहरणे सादर करता येतील. त्यामुळे आपणास वित्तीय साक्षरता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

नगदरहित अर्थव्यवहारास चालना देण्यासाठी, भ्रष्टाचारावर आपणास आळा घालता येईल, असा प्रचार सर्वत्र केला जात आहे; परंतु सर्वंकष पातळीवर विचार केल्यास असे दिसते की, भ्रष्टाचार हा भांडवली व्यवस्थेचे अपरिहार्य अंग आहे. एनडी टीव्हीचे संपादक रविश कुमार यांच्या मतानुसार, नगदरहित होण्यामुळे करचोरी बंद होत नाही. याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात की, अमेरिकेत दरवर्षी ३०-३२ लाख कोटी रुपयांची करचोरी होते, अमेरिकेत 'इंटरनल रेव्हेन्यू सर्व्हिस' आहे. एप्रिल, २०१७ मध्ये त्यांचा अहवाल आला आहे. या अहवालात २००८ ते १० या काळात दरवर्षी ४५८ अरब डॉलर इतकी करचोरी झाली आहे. म्हणजेच या आकड्यांचा भारतीय रुपयामध्ये हिशोब केल्यास ती रक्कम ३०-३२ लाख कोटी रुपये इतकी भरते. हा आकडा या अर्थाने महत्त्वाचा आहे की, भारतातील निश्चलनीकरणानंतर नगदरहित व्यवहाराचा अशा पद्धतीने प्रचार केला जात आहे की, जणू ते करचुकवेगिरी रोखण्यासाठीचे एकमेव उत्तर आहे. नगदरहित व्यवहार अगदी सर्रास चालणाऱ्या अमेरिकेत करचुकवेगिरी कुठे कमी झाली? करचुकवेगिरी तर सुरूच आहे. यापुढे जाऊन आपणांस Independent Commission for the Reform of International Corporate Taxation या संस्थेच्या २०१५ च्या अहवालात म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय कार्पोरेट करव्यवस्था निकामी झाली आहे. या अहवालात पुढे असेही म्हटले आहे की, बहुराष्ट्रीय कंपन्या इतक्या मोठ्या प्रमाणात करचोरी करतात की, त्याचा भार सरतेशेवटी सामान्य करदात्यांवर पडतो. कारण, सरकार नावाची संस्था या कंपन्यांचे काहीच करू शकत नाही, असाही एक निष्कर्ष रविश कुमार यांनी मांडला आहे.

या पार्श्वभूमीवर विचार केल्यास आपल्या देशातील आर्थिक विकासाचा दृष्टिकोन, प्रयोजन व नियंत्रण अशा स्वरूपाचे आहे की, भ्रष्टाचार हा एकूण अर्थव्यवस्थेत 'बायप्रॉडक्ट'सारखा तयार होतो. देशातील अर्थकारण पूर्णत: कार्पोरेट व त्यांच्या राजकीय हस्तकांच्या हातात एकवटले आहे. आर्थिक धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत कार्पोरेटचा हस्तक्षेप व लॉबिंग यांचे आता संस्थाकरण झाले आहे. थोडक्यात, आपणांस स्पष्टपणे म्हणता येईल की, भ्रष्टाचार हा रोग नसून, ते केवळ एक रोगाचे लक्षण आहे आणि बोकाळलेली भांडवलशाही हा रोग आहे. त्यामुळे जोपर्यंत भांडवलशाही आहे, तोपर्यंत भ्रष्टाचार आणि हडेलहप्पी प्रवृत्ती असणार आहे. नगदरहित अर्थव्यवहारामुळे यास खीळ बसेल किंवा बसली आहे, असे म्हणणे एकूणच तत्त्वाला धरून केलेले विश्लेषण होणार नाही; कारण पूर्वी व्यक्त केल्याप्रमाणे भ्रष्टाचार हा भांडवलशाही व्यवस्थेचे अंग आहे. आपण देशातील जाणकार मंडळी व्यवस्थात्मक स्वरूपावर कोणतेही भाष्य न ठेवता, केवळ वरवरची चर्चा करीत आहोत.

थोडक्यात, नगदरहित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीचे जांभूळआख्यान हे निश्चलनीकरणाच्या धोरणाच्या अपयशातून आलेली कल्पना (भारताच्या संदर्भात) असून, नगदरहित अर्थव्यवहाराचे प्रमाण सिंगापूरसारख्या ठिकाणी सर्वाधिक आहे, अमेरिकेत ४५ टक्के लोक नगदरहीत अर्थव्यवहाराचा वापर करतात. आपल्या शेजारील चीन, जे राष्ट्र आज भारतातीलच नव्हे तर एकूणच जगातील अनेक देशांच्या बाजारावर प्रभुत्व

गाजवत आहे. त्याठिकाणी हे प्रमाण केवळ १० टक्के एवढेच आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतात केवळ २ टक्के लोक नगदरहित अर्थव्यवहारांचा आधार घेतात. (Mastercard advisor's measuring progress toward a cashless socity) हे वास्तव चित्र आपणांस मान्य करावे लागेल. देशातील लहानातील लहान आणि मोठ्यातील मोठा व्यवहार आजही (अपवाद वगळून ) व्यापक पातळीवर रोकड चलनाच्या माध्यमातूनच होतो. या सर्व गोष्टींचा खोलात जाऊन विचार केल्यास असे दिसते की, निश्चलनीकरणाच्या व्यापक पातळीवरील अपयशानंतर सरकार पूर्णत: गोंधळले असून, नगदरहित अर्थव्यवहाराचा बडेजाव करू लागले आहे. ही तरफदारी करताना जणू रोखीने व्यवहार करणारे नागरिक गुन्हेगार आहेत, आतंकवादी आहेत, करचोर आहेत अशा पद्धतीची वातावरणनिर्मिती केली जात आहे.

या ठिकाणी मी अर्थतज्ज्ञ अभय टिळक यांच्या मताशी सहमती दर्शवितो. टिळक यांनी आपले हे मत नोटबंदी : अर्थक्रांती की आर्थिक घोडचूक? (ग्रंथाची प्रस्तावना, संपादन - राम जगताप) या ग्रंथात नोंदवले आहे. ते म्हणतात की, बँकिंगच्या संस्कृतीचा फैलाव भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जोमदारपणे सुरू झाला तो १९६९पासून, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर. या घटनेस अजून ५० वर्षेही पूर्ण झालेली नाहीत. एवढ्या कमी कालावधीमध्ये बँकिंगसंस्कृतीच्या (न भिनलेल्या) टप्प्यातून भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसाधारण भारतीय नागरिक एकदम 'डिजिटल इकॉनॉमी'च्या 'नगदरहित' युगात उड्डाण करतील, असे समजणे निश्चितच सुज्ञपणाचे लक्षण मानता येत नाही. एकूण वास्तविकता ही अशी असताना, 'डिजिटल', 'नगदरहित'चे नगारे का वाजविले जात आहेत? की 'डिजिटल इंडिया' च्या घोषणेचा पाठपुरावा करत आपल्या देशात केल्या जाणाऱ्या खाजगी गुंतवणुकीवर हमीचा परतावा संबंधित खाजगी भांडवलदाराच्या ओंजळीत जमा व्हावा, यासाठी 'डिजिटल इकॉनॉमी'चे ढोल बडवत, 'डिजिटल' तंत्रज्ञानासाठी देशांतर्गत बाजारपेठ रेटून निर्माण करण्याचा हा कावा आहे?

अर्थतज्ज्ञ अभय टिळक यांच्या उपरोक्त मताशी आपण सहमत असाल अथवा नसाल; परंतु याविषयी मुळातूनच विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण कार्ल मार्क्स म्हणतो, त्याप्रमाणे तुम्हाला पुढे जायचे असेल, तर 'शंका घेतलीच पाहिजे'. या विषयी गांभीर्याने विचार करून कृतिकार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे, तरच आपण मूळ आजार आणि त्यावरील योग्य उत्तर निवडण्यात यशस्वी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

या लेखाचा समारोप करण्यापूर्वी आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. वित्तीय सेवा सर्वदूर पोहोचवण्याच्या बाबतीत बोलायचे झाले, तर देशातील ६ लाख ४० हजार ८६७ गावांमध्ये मिळून दोन लाख बँक शाखा आहेत आणि जवळपास तितकीच एटीएमची संख्या आहे. त्यातील बऱ्याच शहरी भागांत आहेत. देशातील बहुतेक बँकांमध्ये आजही कालबाह्य ऑपरेटिंग सिस्टीम वापरात असल्याचे मत आनंद तेलतुंबडे यांनी व्यक्त केले आहे. देशात सहा कोटी डेबिट कार्ड आणि अडीच कोटी क्रेडिट कार्ड आहेत. देशातील १३४ कोटी जनतेला नगदरहित व्यवहाराच्या वाटेने घेऊन जाण्यासाठी इतकी पायाभरणी निश्चितच पुरेशी नाही. दुसरा मुद्दा असा की, आजही आपल्या देशातील अधिकाधिक व्यवहार रोखीनेच होतात, देशात ऑनलाईन खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण नगण्य आहे, यामधील बहुतांश लोक 'कॅश ऑन डिलिव्हरी' या पर्यायासोबत जातात. आजही

भारतातील जवळपास ९५ टक्के श्रमशक्ती ही असंघटित क्षेत्रात कार्यरत आहे आणि या क्षेत्रातील जवळपास सर्वच व्यवहार रोखीने चालतात, देशातील वास्तव चित्र स्पष्ट करण्यासाठी ही आकडेवारी पुरेशी आहे.

नगदरहित अर्थव्यवस्थेचा विचार चांगला असला तरी भारताच्या अनुषंगाने विचार करीत असताना, प्रथम आपला देश समजून घेतला पाहिजे. देशात अस्तित्वात असलेली भांडवली व्यवस्था, भारतातील नगदरहित अर्थव्यवस्थेच्या स्वप्नाचे उगमकेंद्र आणि नगदरहित अर्थव्यवहारविषयक निर्णय लागू करण्यामागील राज्यकर्त्यांचा हेतू (शुद्ध - अशुद्ध?) या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात, नव्हे ते उपस्थित केले पाहिजेत; कारण योग्य प्रश्नातच त्याची उत्तरेही दडलेली असतात. येणाऱ्या काळात अशा स्वरूपाचे प्रश्न घेऊन भविष्यात संशोधन होणे आवश्यक आहे. तरच नगदरहित अर्थव्यवहाराच्या अनेक बाजू आपल्या समोर येतील; त्या याव्यात हीच अपेक्षा.

**संदर्भ :**


१. चंद विनोद, नोटबंदीचा प्रवास : अपयशापासून अपयशापर्यंत, चित्रलेखा, १३ नोव्हेंबर, २०१७.

२. चंडालिया अमरनाथ, भ्रष्टाचार आणि भांडवलशाही, निर्मिती संवाद, कोल्हापूर, २०११.

३. चांदोरकर संजीव, फिनटेक - गरिबांचे मित्र की शत्रू?, परिवर्तनाचा वाटसरू, पुणे, १६ ते २८ फेब्रुवारी, २०१८.

४. खेडा रीतीका, नोटबंदी के दो सबक, युवा संवाद, नई दिल्ली, अक्तूबर, २०१७.

५. कुमार रविश, कॅशलेस होण्यामुळे करचोरी बंद होत नाही, नोटबंदी - अर्थक्रांती की आर्थिक घोडचूक? (संपादन-राम जगताप), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर, २०१७.

६. महाराष्ट्र टाइम्स, २४ डिसेंबर, २०१७.

७. माहेश्वरी अरुण, किसका सौभाग्य? युवा संवाद, नई दिल्ली, नवंबर, २०१७.

८. तेगमपुरे मारोती, नगदरहित अर्थव्यवहार, महाराष्ट्र टाइम्स, एप्रिल, २०१८.

९. तेलतुंबडे आनंद, भारताचा मारी आन्त्वानेत क्षण, युगांतर, मुंबई, २ ते ८ मार्च, २०१७.

१०. टिळक अभय, नोटबंदी : अर्थक्रांती की आर्थिक घोडचूक?, (प्रस्तावना, संपादन-राम जगताप) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर, २०१७.

११ तिवारी हरिहर, रोकडरहित भारतीय अर्थव्यवस्था: एक अभ्यास, अर्थमीमांसा, विदर्भ अर्थशास्त्र परिषद, अमरावती, जुलै - डिसेंबर, २०१७.

१२. www.cashlessindia.gov.in

१३. www.moneycrasher.com


◆

माझी सर्वाधिक प्राथमिकता म्हणजे महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या सोडविणे ज्यामुळे दीर्घकालीन गरिबी, अज्ञान आणि रोगराईवर फारच कमी कालावधीत मात करता येऊ शकेल.

**- मनमोहन सिंग**

# भारताची लोकसंख्या आणि विकासातील निवडक प्रवाह

**अविनाश कुलकर्णी** †
कृष्णा रेसिडेन्सी, सुस रोड,
पाषाण, पुणे - ४११ ०२१

**प्रस्तावना**

सन १९९१ नंतरच्या कालखंडात मिश्र अर्थव्यवस्थेला फाटा देत देशाच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया द्रूतगतीने एक एक टप्पे पार करू लागली. या टप्पा वाहतुकीत (Stage Carriage) सन २०१८ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने फ्रान्स या प्रगत राष्ट्राला मागे टाकत जगातील ६ व्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होण्याचा बहुमान प्राप्त केला. विकासाची गती आणि विकासाचे मापन याचे मोजमाप करणारी परिमाणे भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे सुखद चित्र साकारत आहेत. आर्थिक विकासाचा दर आणि भांडवली बाजाराचा निर्देशांक यांसारख्या परिमाणामध्ये भारतीय अर्थव्यवस्था महासत्ता होण्याकडे मार्गक्रमण करत असल्याचे मत मांडले जात आहे. परंतु सन २००५-०६ च्या सर्वेक्षणानुसार, भारताचा दारिद्र्य निर्देशांक (Multidimensional Poverty Index - MPI) ०.२८२ इतका आहे. देशातील ५५.३% टक्के लोकसंख्या अशाप्रकारच्या दारिद्र्यात जीवन जगत आहे. त्यामुळे आर्थिक विकास मोजण्यासाठी विकासदरासारखी मान्यताप्राप्त परिमाणे असली तरी देशातील आर्थिक विकासाच्या लाभाचे वितरण, विकासाच्या संधींचे वितरण, मर्यादित साधनसंपत्तीचे वितरण या सर्व घटकांचा तथा परिमाणांचा वापर विकासाच्या मोजमापामध्ये होणे आवश्यक आहे.

शोधनिबंधाचे उद्दिष्ट्य, आवश्यकता व महत्त्व, भारताच्या आर्थिक विकासाचा दर आणि अर्थव्यवस्थेची एकूण उलाढाल हे विकासाचे शिखर गाठताना दिसत असले तरी त्यापेक्षा अधिक जलदगतीने वाढलेली देशाची लोकसंख्या आणि आर्थिक विकासाच्या लाभाचे वितरण अर्थात शिक्षणाच्या संधी, आरोग्यविषयक सुविधा, लैंगिक समानता इ. मानव विकासाच्या विविध परिमाणांचा अभ्यास करणे, विवेचन व विश्लेषण करणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

देशात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्याने उत्पादक लोकसंख्येला शिक्षणाच्या संबंधाने रोजगाराची उपलब्धता असलेली दिसून येत नाही. त्यामुळे ग्रामीण-शहरी स्थलांतर, नागरीकरण, बेरोजगारी यांसारख्या समस्या निर्माण झाल्याने आंदोलनाच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. त्यामुळे लोकसंख्याविषयक धोरण आणि त्याची कठोर अंमलबजावणी या दृष्टिकोनातून हा शोधनिबंध आवश्यक व महत्त्वपूर्ण असल्याचे लक्षात येते.

†आजीव सभासद क्र. : १५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

## संशोधन समस्या/समस्या सुत्रण

भारतामधे शिक्षणाच्या विशेषत: उच्च शिक्षणाच्या सोयी-सुविधांमधे वाढ होत असली तरी त्या प्रमाणात तत्संबंधित क्षेत्रात रोजगाराच्या संधीत वाढ होत नाही त्यामुळे अधिकाधिक उत्पादक लोकसंख्या असूनही लोकसंख्या लाभांशाचा ऱ्हास होत आहे.

## व्याप्ती व मर्यादा

या शोधनिबंधात भारताच्या आर्थिक विकासाचे मोजमाप याविषयीचे विवेचन न करता भारतातील लोकसंख्या वितरण, लैंगिक समानता व विकास, उच्च शिक्षणाच्या सोयी-सुविधा, रोजगाराची समस्या इ. विकासातील निवडक प्रवाहांचा विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात आढावा घेतला आहे, ही या शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा आहे.

## पद्धती

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करताना घटक विश्लेषण (Content Analysis) या पद्धतीचा वापर केला आहे. त्यासाठी तथ्य संकलन व माहिती संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधन साम्रगीचा आधार घेतला आहे. तसेच, उच्च शिक्षणाच्या संधी आणि प्राप्त शिक्षणानुसार रोजगाराच्या संधींची उपलब्धता या संदर्भातील विश्लेषणासाठी व्यष्टी अध्ययन (Case Study Method) पद्धतीचा आधार घेतला आहे.

## सैद्धांतिक व संकल्पनात्मक पार्श्वभूमी


हा शोधनिबंध मांडण्यासाठी लोकसंख्येची रचना अथवा वितरण, लिंग व वयोगटानुसार लोकसंख्या रचनेचा त्रिमितीस्तंभ (Age-Sex Pyramid), मानव विकास निर्देशांक, लैंगिक विकास निर्देशांक, आणि दारिद्र्य निर्देशांक, तसेच लोकसंख्या लाभांश यांसारख्या विकासाच्या विविध संकल्पनांच्या पार्श्वभूमीचा आधार अभ्यासातील विविध मुद्यांचे विवेचन व विश्लेषण करण्यासाठी घेण्यात आला आहे.

जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर सन १९९१ साली भारतीय अर्थव्यवस्थेत अभूतपूर्व आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. सन १९९१ या संदर्भ वर्षात भारताची एकूण लोकसंख्या ८४.६४ कोटी इतकी होती. ही लोकसंख्या विकासाच्या वाटचालीत सन २०११ मध्ये १२१.०५ कोटी इतकी झाली. म्हणजे लोकसंख्येत २० वर्षांच्या कालावधीत जवळपास ३६ कोटींपेक्षा अधिक वाढ झाली. सन १९९१ साली २५.७ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहात होती तर यामध्ये बदल होऊन २०११ साली हे प्रमाण ३१.२ टक्के इतके झाले. सन २०११च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२३ कोटी इतकी आहे. त्यामध्ये ६.१५ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते तर ५.०८ कोटी लोकसंख्या नागरी भागात राहते. सन २००१-११ या दशकात महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येमध्ये २३.६ टक्के बदल घडून आला म्हणजे त्यामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नागरीकरणात वाढ होऊन नागरीकरणाच्या विविध समस्यांमध्ये वाढ झाली आहे. देशाच्या व राज्याच्या इतर भागांतून शिक्षणासाठी व प्रामुख्याने रोजगारासाठी झालेले स्थलांतर याचे प्रमुख कारण आहे. त्यामुळेच विकासाचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून आर्थिक विकासदरावर विकासाचे मोजमाप करणे योग्य होणार नाही तर विकासाच्या परिमाणांची व्यापकता वाढविणे आवश्यक आहे.

सन १९९१ साली भारताच्या लोकसंख्येतील दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२६ वरून २०११ साली ९४३ इतके वाढले. लोकसंख्येतील स्त्रियांचे वाढते प्रमाण हे सुखावह असले तरी त्यातून लैंगिक समानता किंवा लैंगिक निर्देशांकामधील सुधारणा प्रकट

होते, असे म्हणणे उचित होत नाही. विकासाच्या या पर्वामध्येसुद्धा भारतातील स्त्री-मर्त्यता दर विशेषत: पाच वर्षांखालील मुलींचा मर्त्यता दर हा अधिक असल्याचे आढळून येते. जून २०१८ च्या लॅन्सेट अहवालात भारतामध्ये ५ वर्षांखालील बालकांच्या मृत्यूदरात मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. तसेच, महाराष्ट्रात सन २०११च्या जनगणनेनुसार, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या विभागात ५ वर्षांखालील मुलींचा मृत्युदर अधिक असल्याचे आढळून आले आहे. भारताशेजारील काही निवडक राष्ट्रांमधील हा बालमृत्युदर भारतापेक्षाही कमी असल्याचे पुढील आकृती क्र. १ मधून आढळून येते.

**आकृती क्र. १ : भारताशेजारील निवडक देशातील पाच वर्षांखालील बालमृत्युदर (दर हजारी)**




(संदर्भ - K. Park, Essentials of Community Health Nursing, २००८, pg. २४७)

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर ६ व्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला आली असली तरी भारताशेजारील विकसनशील देशांच्या तुलनेतही भारतातील बालमृत्युदराचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येते. तसेच, भारताशेजारील श्रीलंका यासारख्या छोट्या देशातही हे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळेच आर्थिक विकासाची परिमाणे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लागू पडणारी आहेत, असे मात्र दिसून येत नाही. देशातील आर्थिक विकासाच्या वैशिष्ट्यांमध्ये आढळून येणारे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे असमतोल विकास. देशात महाराष्ट्र हे राज्य आर्थिक विकासामध्ये आघाडीवर आहे. परंतु या राज्यातही ५ वर्षांखालील बालमृत्यूचे हे प्रमाण लक्षवेधक आहे. महाराष्ट्रातील हे बालमृत्यू प्रमाण खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.१: महाराष्ट्रातील बालमृत्युदर (सन २०१६)**

| पाच वर्षांखालील बालकांचा मृत्युदर | | | |
|---|---|---|---|
| क्षेत्र | मुलगा | मुलगी | एकूण |
| ग्रामीण | २५ | २९ | २७ |
| नागरी | १३ | १५ | १४ |
| एक वर्षांखालील बालकांचा मृत्युदर | | | |
| ग्रामीण | २२ | २५ | २४ |
| नागरी | १३ | १३ | १३ |

(संदर्भ - दै. लोकसत्ता, २९ जुलै २०१८, पान ८.)

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यातही मुलांपेक्षा मुलींचा मृत्युदर हा अधिक आहे. तसेच, सन २०१३ नंतर मुलींच्या जन्मदराचे प्रमाणही कमी होत असून सन २०१६ मध्ये ते ८७६ इतके नोंदविले गेले. या संदर्भात युनिसेफच्या मुंबई विभागाचे आरोग्यतज्ज्ञ डॉ. खनिंद्र भुयान म्हणतात, मुलामुलींच्या देखभालीमध्ये विशेषत: ग्रामीण भागामध्ये फरक केला जातो. बालकांच्या वाढीसाठी पहिल्या २ वर्षांपर्यंतचा कालावधी महत्त्वाचा असतो. परंतु या कालावधीत मुलीला दिला जाणारा आहार, आजारी पडल्यानंतर दिले जाणारे उपचार, घेतली जाणारी काळजी याकडे अनेकवेळा दुर्लक्ष होते. त्यामुळे या संदर्भातील सन २०१५ सालच्या लैंगिक विकास निर्देशांकांमध्ये (GDI) भारत १२१ व्या स्थानी असल्याचे आढळून येते. बालमृत्युदराच्या संदर्भात ग्रामीण भागात हे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येत असले तरी, नागरी भागातही अर्भकमृत्युदरामधे मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून आली, असे मात्र आढळून येत नाही. महाराष्ट्र शासनाने सन २०१३ साली राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अर्भकमृत्युदर १० इतका खाली आणण्याचे उद्दिष्ट्य निश्चित केले होते. परंतु, त्यानंतरच्या ५ वर्षांच्या काळातही हे उद्दिष्ट्य सफल झाल्याचे दिसून येत नाही. हा अर्भकमृत्युदर महापालिका क्षेत्रामध्ये २४ इतका आहे. महाराष्ट्रातील महापालिका क्षेत्रात २०१५पासूनच्या तीन वर्षांत एकूण ३१,३३४ अर्भकमृत्यू झाले, त्यापैकी एकट्या मुंबई पालिकाक्षेत्रात हे प्रमाण १४,१३६ इतके आहे. याची कारणमीमांसा करता असे आढळून येते की, नवजात बालकांवरील उपचारांसाठी पुरेसे तज्ज्ञ डॉक्टर आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाहीत. महाराष्ट्रातील २७ महापालिकांपैकी बहुतेक ठिकाणी नवजात शिशुंसाठी पुरेशी आरोग्य यंत्रणाच उपलब्ध नाही.

आरोग्य पातळीवर बालमृत्युदर विशेषत: मुलींचा मृत्युदर अधिक असणाऱ्या आपल्या देशात शिक्षणामध्ये मात्र विकासाची वाटचाल वेगाने होत असल्याचे आढळून येत आहे. सन २०१०-११पासूनच्या आठ वर्षांत पदव्युत्तर शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढले असल्याचे मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उच्चशिक्षण पाहणी अहवालातून खालीलप्रमाणे दिसून येते.

**तक्ता क्र. २: भारतातील पदव्युत्तर शिक्षणाचा कल**

| वर्ष | मुलांची संख्या | मुलींची संख्या |
|---|---|---|
| २०१०-११ | २,३३,००० | १,७३,००० |
| २०११-१२ | २,०८,००० | १,५५,००० |
| २०१२-१३ | १,८२,००० | १,३८,००० |
| २०१३-१४ | २,३७,००० | १,९६,००० |
| २०१४-१५ | २,४०,००० | १,९१,००० |
| २०१५-१६ | २,०६,००० | १,९९,००० |
| २०१६-१७ | २,१७,००० | २,१६,००० |
| २०१७-१८ | २,१४,००० | २,३१,००० |

(संदर्भ - दै. लोकसत्ता, २ ऑगस्ट २०१८)

वरील संदर्भ तक्त्यानुसार, सन २०१७-१८ मध्ये पदव्युत्तर पदवी घेणाऱ्या मुलींची संख्या मुलांपेक्षा

अधिक असली तरी आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये मुलींपेक्षा मुलांचेच प्रमाण अधिक असल्याचे या अहवालात म्हटले आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात कला शाखेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यानंतर विज्ञान आणि वाणिज्य अभ्यासक्रमांचा क्रमांक लागतो.

आर्थिक प्रगतीच्या बाबतीत द्रूतगतीने वाटचाल करणाऱ्या आपल्या देशात पदव्युत्तर शिक्षणाची वाढती आकडेवारी सुखावह असली तरी या शिक्षणाच्या संदर्भानुसार किंवा पात्रतेनुसार रोजगारांच्या संधींची उपलब्धता या उत्पादक घटकासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण त्यावरच लोकसंख्या लाभांश शक्य आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या (CII) एका अहवालानुसार, भारत सन २००५ पासून दरवर्षी ४० ते ५० लाख रोजगार निर्मिती करण्यात अपयशी ठरत आहे. भारताच्या लोकसंख्येत उत्पादक वयोगटातील म्हणजे वय वर्षे १५ ते ५९ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ६२ टक्के इतके आहे. त्यामुळेच भारताच्या लोकसंख्या त्रिमितीस्तंभामधे (Population Pyramid) या वयोगटाचा आडवा स्तंभ अधिक रुंद असल्याचे आढळून येते. तर सन २०१५च्या आकडेवारीनुसार, भारतातील ७९.१ टक्के पुरुष आणि २६.८ टक्के स्त्रियांचा श्रमशक्तीत सहभाग आहे. भारतातील उच्चशिक्षणाचा वाढता दर लक्षात घेता येत्या काळात म्हणजे सन २०३० पर्यंतच्या काळात होणारी रोजगाराची मागणी ही कृषी आणि बांधकाम क्षेत्रातून होणार नसून ती त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार होणार आहे. मेक-इन-इंडिया, मुद्रा योजना यांसारख्या विविध योजनांमधून निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु, खाजगी क्षेत्रामधील नोकऱ्यांमधून मिळणारे अल्प उत्पन्न आणि कंत्राटी कामगार पद्धतीमुळे रोजगाराची असुरक्षितता यामुळे लोकसंख्येतील उच्चशिक्षित गट हा शासकीय सेवेकडे लक्ष केंद्रित करत आहे. परिणामी, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोकरी अथवा रोजगार नसला तरी चांगले वेतनमान व रोजगाराची सुरक्षितता यामुळे हा उच्चशिक्षित गट शासकीय नोकऱ्यांकडे वळत असल्याचे पुढील संदर्भातून दिसून येते.

महाराष्ट्रातील ३५० अभियांत्रिकी महाविद्यालयात १ लाख ३९ हजार ९८३ जागांपैकी ५० टक्क्यांहून अधिक जागा २०१८-१९ यावर्षी रिक्त राहणार आहेत. गतवर्षी हा आकडा ८० हजारांच्या आसपास होता. अभियांत्रिकी क्षेत्रात चांगला रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले विशेषतः मराठवाड्यातील अनेक तरुण सेवा क्षेत्राकडे वळत आहेत. बँकींग क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी औरंगाबाद येथे परीक्षा वर्ग चालविणाऱ्या संचालकांनी २००८-०९ पासून अभियांत्रिकीचे विद्यार्थी बँकेच्या परीक्षा देत असल्याचे सांगितले. या परीक्षा वर्गांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ६० टक्के विद्यार्थी अभियंते असल्याचे ते सांगतात. या विषयी कारणमीमांसा करता असे समजते की, खासगी कंपनीत १५ हजार रुपये वेतनाची नोकरी करण्यापेक्षा बँकेतील कारकुनाच्या नोकरीतही २५ हजार रुपये वेतन मिळते. फक्त अभियांत्रिकी क्षेत्रातच अशी परिस्थिती आहे असे नाही, तर शिक्षणक्षेत्रातही अनुदानित आणि विनाअनुदानित सेवकांच्या वेतनामध्ये खूप मोठी तफावत आहे. नेट-सेट-पीएच.डी. पात्रताधारक शिक्षकसुद्धा १०-१५ हजारांच्या तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. तसेच, हा रोजगार पूर्ण वर्षभर नसतो त्यामुळे पूर्ण १२ महिन्यांचे वेतन मिळत नाही. तसेच भविष्यातील रोजगाराची कुठलीही हमी नाही. त्यामुळे अशा उच्चशिक्षित वयोगटातील लोकसंख्येकडून उत्पादनातील वाढ, गुणवत्तेतील वाढ यांसारख्या लोकसंख्या लाभांशाचा

ऱ्हास होत आहे. परिणामी, उच्चशिक्षित वयोगटातील लोकसंख्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नसलेल्या रोजगाराच्या संधींकडे वळत आहे. त्यामुळे एकप्रकारे छुपी बेरोजगारी असल्याचे आढळून येत आहे. अशाप्रकारे शैक्षणिक पात्रतेनुसार नसलेल्या रोजगाराकडे वळलेल्या उत्पादक वयोगटातील एका तरुणाच्या रोजगारचे विवेचन व विश्लेषण पुढीलप्रमाणे.

### व्यष्टी अध्ययन

मराठवाड्यातील मूळचा लातूर येथील रहिवासी असलेला अजित केरूरे हा तरुण तकानिकी अभियंता (Mechanical Engineer) आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यावर त्याने नोकरीसाठी प्रयत्न केले. मात्र १०-१५ हजारांपेक्षा अधिक उत्पन्नाची नोकरी त्यास मिळाली नाही. त्यानंतर त्याने विपणन क्षेत्रात (Marketing) दोन नोकऱ्या काही काळ केल्या. परंतु त्या क्षेत्रातून बाहेर पडत त्याने स्वत:च व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. त्याने पुण्यातील सदाशिव पेठ येथील ब्राह्मण मंगल कार्यालयाजवळील जागेत चहाचा व्यवसाय सुरू केला. त्याने कडक स्पेशल चहाचे दालन सुरू केले. दूरदर्शनच्या काही वाहिन्यांवर या प्रसंगासदृश एक जाहिरात प्रसारित होत आहे. त्यामध्ये पुढील एक वाक्य आहे, 'इंजिनिअरींग छोड दे। चाय का स्टॉल खोल दे।' अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या या चहावाल्या अजितकडे बाराजण काम करतात. तसेच, राज्यभरातून आणखी २५ दालने सुरू करण्याची त्याची योजना आहे. अजित केरूरे या तरुण अभियंत्याप्रमाणेच पुण्यात व इतरत्र अनेक उच्चशिक्षित तरुण आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार मिळत नसल्यामुळे वेगवेगळ्या व्यवसायात अथवा रोजगारात आहेत. त्यामध्ये ओला व ऊबेरसारख्या प्रवासी वाहतुकीच्या व्यवसायापासून छोट्या-मोठ्या कंत्राटी कामामध्ये अशी उच्चशिक्षित वयोगटातील लोकसंख्या गुंतली आहे.

निरीक्षणामध्ये असे आढळून येते की, मराठवाडा, विदर्भ आणि महाराष्ट्रातील इतर भागांतून पुणे शहरामध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी, लाखो तरुण पुण्यात स्पर्धा परीक्षा केंद्रामधे दाखल होत आहेत. त्यासाठी मोठ्या रकमांची फीसुद्धा दिली जात आहे. त्याचप्रमाणे परीक्षांची तयारी करण्यासाठी पुण्यातील पेठांमध्ये अभ्यासाची जागा (Table Spaces) अर्थात अभ्यासिकांचा धंदासुद्धा तेजीत आहे. तसेच, या विद्यार्थ्यांची चहा, नाष्टा, जेवणाची तयारी म्हणून सेवा व्यवसायही तेजीत आहे. त्यामुळे स्थलांतरित बेरोजगारांमुळे पुण्यामध्ये रोजगाराची निर्मिती झाली आहे. परंतु स्पर्धा परीक्षांमधून प्रत्यक्षात किती रोजगार निर्मिती होते हे महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे अभियांत्रिकी पदवीधरांना योग्य त्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत त्यामुळे अभियांत्रिकी महाविद्यालयातील रिक्त जागांची संख्या वाढत आहे. तीच परिस्थिती स्पर्धा परीक्षांचीसुद्धा होण्याची शक्यता अधिक आहे व स्पर्धा परीक्षा केंद्रांमधील आणि अभ्यासिकांमधील अधिकाधिक जागा लवकरच रिक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### निष्कर्ष

आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर १९९१ पासून देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढली असली तरी, त्याप्रमाणात लोकसंख्या नियंत्रण आणि लोकसंख्येची रचना योग्य प्रमाणात राखता न आल्यामुळे लोकसंख्येतील उत्पादक लोकसंख्येकडून लोकसंख्या लाभांचा लाभ होण्याऐवजी भविष्यात लोकसंख्या लाभांचा ऱ्हास होण्याची शक्यता अधिक आहे.

आर्थिक विकासामुळे शिक्षणाच्या सुविधांमधे वृद्धी होत असली तरी त्याप्रमाणात तत्संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधींची उपलब्धता नसल्यामुळे उच्चशिक्षित

उत्पादक लोकसंख्या शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील रोजगाराकडे वळत असल्यामुळे त्या त्या क्षेत्रातील पात्रतेच्या लोकसंख्येच्या रोजगार संधींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या रोजगाराच्या संधींमध्ये शैक्षणिक पात्रतेनुसारची उत्पादकता नसल्यामुळे एकप्रकारची छुपी बेरोजगारी असल्याचे निष्कर्षास येते.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आरोग्यविषयक सुविधांमध्येही सुधारणा होत आहे. परंतु विशेषत: बाल आरोग्यविषयक सेवा-सुविधा यामध्ये काही उणिवा असल्यामुळे आणि सामाजिक, सांस्कृतिक कारणांमुळे बालमृत्यू विशेषत: मुलींच्या मृत्युदराचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास जलदगतीने होत असला तरी मानव विकासाची, लैंगिक समानतेची, आणि रोजगार निर्मितीची गती मात्र धीमी आहे.

## सूचना

देशातील जलद आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत जलदगतीने लोकसंख्या नियंत्रणाची आवश्यकता असल्याने त्यासंबंधी अधिक चांगले धोरण तयार करून त्याची उत्तमप्रकारे अंमलबजावणी करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. लोकसंख्येच्या प्रभावी नियंत्रणासाठी २०१८ मध्ये 'भारतीय संसदेच्या १२५ सदस्यांनी (खासदारांनी) लोकसंख्या नियंत्रण कायदा करण्यासंदर्भात राष्ट्रपतींकडे अर्ज केला आहे.' त्यामुळे भविष्यातील लोकसंख्येची रचना आणि आर्थिक विकासाच्या व मानव विकासाच्या संधींवरील ताण कमी करण्यास मदत होईल.

मेक-इन-इंडिया, मुद्रा योजना यांसारख्या विविध योजनांद्वारे आर्थिक, औद्योगिक, व्यावसायिक विकासाला गती देण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु, त्यातून होणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि त्यासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ यांच्यामध्ये योग्य तो समन्वय साधण्याची आवश्यकता आहे. तसेच कुशल मनुष्यबळासाठी आणि अकुशल मनुष्यबळासाठी चांगल्या वेतनमानाची हमी आणि रोजगाराची हमी आवश्यक आहे. प्रसंगी कंत्राटी कामगार कायद्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून चांगल्या वेतनाची व वेतनश्रेणीची हमी देणारी यंत्रणा निर्माण करणे योग्य होईल.

## समारोप

देशाचा आर्थिक विकास हा विकासाचा दर आणि भांडवली बाजाराचा निर्देशांक, परकीय चलन गंगाजळी यासारख्या घटकांवर जरी अवलंबून असला तरी देशातील उत्पादक लोकसंख्येला त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्यामुळे देशाचा खराखुरा आर्थिक विकास साधणे शक्य होईल. त्यामुळेच आर्थिक विकासाचे मोजमाप करणारी परिमाणे अधिकाधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये मानव विकास, लैंगिक विकास आणि दारिद्र्याचे विविध पैलू यांवर लक्ष केंद्रित करून आर्थिक विकासाबरोबरच मानव विकासाचे मापदंड निश्चित करणे, आवश्यक आहे. त्यातूनच सर्वांगीण विकासाचे वास्तव जगासमोर मांडता येईल.

## संदर्भ सूची


1. K. Park (2008), Essentials of Community Health Nursing, Published by M/s. Banarsidas Bhanot, Jabalpur.
2. Population and vital statistics Table 2015, www.ayush.gov.pdf. www.hdr.undp.org
3. Zee News Television.
4. दै. लोकसत्ता २९ जुलै व २ ऑगस्ट २०१८.


◆

# डॉ. बी.आर.आंबेडकरांचे जलधोरण

**प्रशांत हरमकर** †
सहाय्यक प्राध्यापक,
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती.

## प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर गोंधळ आणि प्रचंड अस्थिरता होती. महायुद्धानंतर सुधारणा घडवून याव्या याकरिता अनेक देशांमध्ये लढा सुरू होता. यामध्ये पुनर्बांधणीची समस्या बिकट झालेली होती. महायुद्धामुळे भौतिक सुविधा आणि प्रकल्प उद्‌ध्वस्त झालेले होते. यामध्ये मुख्यत्वे बदल घडवून आणायचा होता. या अनुषंगाने भारतामध्ये दीर्घकालीन दृष्टिकोनातून बदल घडवून आणण्याची आवश्यकता होती. ह्याचा संबंध केंद्र सरकारशी होता. इतर एशियन देशापेक्षा भारतामध्ये भिन्नता होती. आर्थिक पुनर्बांधणी करताना भारतीय नियोजन उद्दिष्ट आणि व्यापकतेर आधारलेले होते. दीर्घकालीन दृष्टिकोनातून भारताची पुन:संरचना करायची होती. याकरिता पायाभूत सुविधा आणि उद्योगांवर भर देण्यात आला. ह्याच कालावधीत युरोपमध्ये युद्धामध्ये नष्ट झालेल्या उद्योगांचे पुर्नवसन सुरू होते. भारतीय नियोजनामध्ये संरक्षण सेवाचे पुनर्वसन, युद्ध उद्योगांकडून श्रमिकाचे प्रतिस्थापन करणे, युद्धाकडून शांततेकडे जात असताना औद्योगिक विकास घडवून आणणे व पुनर्बांधणी करणे ह्याला नियोजनामध्ये केंद्रवर्ती स्थान होते. दीर्घकालीन दृष्टिकोनातून हा भारताच्या विकासाचा एक पैलू होता.

## आर्थिक नियोजन आणि पुनर्बांधणी व विकास समिती

भारताच्या आर्थिक पुनर्बांधणीसाठी शासनाच्या नियोजनाची आवश्यकता होती. याकरिता कल्पना, विचार आणि पुढाकार घेतला जात होता. विविध राजकीय पक्ष आणि गटाकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळत होता. पर्यायाने नियोजनाची तयारी म्हणून काही प्रकल्प सादर करण्यात आले. ह्यामध्ये बॉम्बे प्लॅन जे.आर.डी.टाटा आणि इतरांनी सादर केला. राष्ट्रीय नियोजनामध्ये जवाहरलाल नेहरू आणि मेघनाथ शाह यांचे अमूल्य योगदान होते. नियोजनाची उद्दिष्ट आणि व्यूहरचना प्रमाणबद्ध पद्धतीने मांडण्यात आली. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर केंद्रामध्ये अल्पावधीतच राष्ट्रीय शासन अस्तित्वात आले. ज्यामुळे भारताला संपूर्ण स्वातंत्र्य आर्थिक व्यवहाराबाबत प्राप्त झाले.

भारताच्या नियोजनाचा विचार केला तर सातत्याचा दृष्टिकोन ठेवून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुप्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ व्ही. के. व्ही. आर. राव, डी. आर. गाडगीळ, सी. एन. वकील, पी. एस. लोकनाथन यांनी केला. विशेषत्वाने यासर्वांचे सहकार्य युद्धोत्तर पुनर्बांधणी करण्याकरिता लाभले. याचा जवळचा संबंध १९५० व १९६० च्या दशकाच्या आर्थिक नियोजनाशी

† आजीव सभासद क्र. : १३७९, भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८, ई-मेल : haramkarp@yahoo.com

होता. भारताच्या आर्थिक विकासाच्या धोरणाचा विचार करीत असताना नियोजनाअंतर्गत १९४२-४६ च्या आर्थिक धोरणाने पुढाकार घेतला होता. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात जल आणि वीज धोरण हा आर्थिक नियोजनाचा मुख्य पाया होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात पुनर्बांधणी आणि बहुव्याप्ती यामध्ये आर्थिक नियोजनाला संतुलन साधायचे होते. याकरिता शासनाने चार समित्यांची नेमणूक केली होती. या समित्यांनी धोरणांची मांडणी व कृती आराखडा तयार केला होता. यामध्ये पुनर्बांधणी मंडळ मुख्य होते. तत्कालीन केंद्रीय कॅबिनेट सदस्यांची समिती ही धोरण समिती होती. या समितीमध्ये केंद्रीय, राज्य आणि प्रांतीय शासनाचे प्रतिनिधी होते. याबरोबरच व्यापार, उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रातील प्रतिनिधी यामध्ये होते. धोरणात्मक समित्या या कार्यालयीन समित्या झाल्या होत्या. त्या समित्यांचा प्रमुख त्या त्या विभागाचा सचिव होता. धोरणात्मक निर्णय दोन समित्यांकडून घेतले जात होते. या समित्या मान्यतेसाठी अहवाल Reconstruction Committee of the Council ला पाठवित होत्या. RCC ने चर्चा करून नियोजनाकरिता प्रभावी ठरेल अशा प्रांतनिहाय्य सिंचन आणि वीजशक्तीचा विचार केला होता. यावरून निश्चित असे धोरण तयार करण्यात आले. या अंतर्गत प्रामुख्याने,

१. युद्धोत्तर काळात पुनर्बांधणी आणि विकास याकरिता बहुव्याप्त धोरण तयार करण्यात आले.

२. कार्यक्षमतेवर भर देऊन विषय निहाय धोरणात्मक शिफारशी प्रांत आणि राज्यांना लागू करण्यात आल्या.

३. धोरणात्मक स्वरूपातील नियोजन केंद्र आणि राज्याच्या संदर्भात स्पष्ट करण्यात आले.

जल व वीज धोरणाचा मसुदा युद्धोत्तर पुनर्बांधणी आणि विकासाचा होता. ज्याला विभागीय सचिवांनी एकमताने तयार केले होते. यामधील जबाबदाऱ्या विभागांनी स्पष्ट केल्या होत्या आणि याला आर.सी.सी.ने मान्य केले होते.

जलधोरणाचा प्राथमिक मसुदा तयार करून अंतिमतः मंजुरीसाठी ठेवण्यात आला. याबाबतची मंत्रिस्तरीय सचिवाची बैठक जुलै, १९४३ मध्ये झाली. यामध्ये दुरुस्ती करून अंतिम प्रारूप तयार करण्यात आले. याकरिता विविध मंत्रालयाचा दृष्टिकोन लक्षात घेतला गेला होता. पुनर्बांधणी आणि विकास नियोजनाचे दुहेरी उद्दिष्ट होते. १) लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे त्याकरिता खात्रीशीर रोजगार प्राप्त होणे. २) खात्रीशीरपणे संपत्तीची निर्मिती करणे आणि समानपणे वितरण होणे. याशिवाय लोकजीवनामध्ये सुधारणा होऊ शकत नाही. लोकांची क्रयशक्ती वाढू शकत नाही. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रामधील उत्पादकता व कार्यक्षमता वाढू शकत नाही. कृषी क्षेत्र भारताचा प्राथमिक उद्योग आहे. मात्र, अर्थव्यवस्थेमधील असंतुलन दुरुस्त करून देशाच्या औद्योगिक विकासाला उत्तेजन देण्याची आवश्यकता आहे. कृषी क्षेत्रानंतर उद्योग क्षेत्र टप्याटप्प्याने विकसित करायचे आहे. नियोजनाचा खोलवर विचार करून त्याचा परिणाम संपत्तीच्या वितरणावर करायचा आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. ही दुहेरी उद्दिष्टे साध्य करण्याकरिता नियोजन अल्पकालीन आणि दीर्घकालीन होते. अल्पकालीन नियोजन पुनर्वसन आणि पुनर्बांधणीच्या अटी अंतर्गत होते. तर संयोग व संधी नियोजनाच्या दीर्घकालीन धोरणामध्ये होत्या.

## डॉ. आंबेडकरांचे योगदान

आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये डॉ.बी.आर.आंबेडकरांचे योगदान विस्तृत प्रमाणात

आहे. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय परिश्रमाची फळे सामाजिकदृष्ट्या उपेक्षित वर्गाला प्राप्त झालेली आहेत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीतून त्यांनी भारताच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वैशिष्ट्यांना निर्णायक आकार दिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या योगदानामधील कमी माहीत असलेला व चर्चेला न घेतलेला पैलू म्हणजे भारताच्या विकास धोरणाच्या निर्मितीमधील त्यांचा सहभाग होय. डॉ. आंबेडकर १९४२-१९४६ च्या दरम्यान कॅबिनेट सदस्य होते. त्यांनी साधनात्मक पुढाकार जल व वीज शक्तीच्या बांधणी व निर्मितीमध्ये घेतला. १९४० चे दशक भारताला आर्थिक नियोजन स्वीकारण्याचा व मूल्यांकनाचा निर्णायक कालावधी होता. त्यांनी याबाबत पुढाकार घेऊन सुस्पष्टपणे धोरणांना आकार व चालना दिली. यातूनच वीजशक्ती व जल विकासाचे धोरण निर्माण झाले.

भारत सरकारच्या RCC (Reconstruction Committee of the Council ) ने सल्ला दिला की, जल व वीजशक्ती धोरण भारतामध्ये चांगला परिणाम घडवून आणू शकते. सिंचन आणि वीजशक्तीचा विकास हा कृषी व उद्योगांशी संबंधित असून विकास घडवून आणण्याची ही पूर्व अट आहे. याला दीर्घकालीन नियोजनामध्ये उच्चत्तम स्थान देण्याची आवश्यकता आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. डॉ. आंबेडकर सिंचन आणि वीजशक्ती समितीचे अध्यक्ष होते. १९३५ च्या कायद्यानुसार हा विषय प्रांतीय शासनाच्या अंतर्गत आणण्यात आला. या मर्यादेचा एकूणच परिणाम पुढे घडून आला. कारण सहकार्य, सहमती, समायोजन आणि करार प्रांतीय आणि राज्य शासनाशी करावे लागले. जे करणे सोपे नव्हते. नदी खोरे निगम (River Valley Corporation) याद्वारे पर्यायी कार्यकारी वर्गाची निर्मिती केली होती. याकरिता प्रादेशिक आणि बहुउद्देशीय दृष्टिकोनाचा स्वीकार करण्यात आला. जो या धोरणाचा गाभा होता. प्रांताची स्वायत्तता अबाधित होती. अशा परिस्थितीत प्रांताची मने वळविण्यात डॉ. आंबेडकरांना यश प्राप्त झाले होते. डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण भारतामध्ये प्रमाणबद्धरित्या जलसंसाधनाच्या नियोजित विकासाकरिता सहमती घडवून आणली होती. यामुळे त्यांच्यातील उत्कृष्ट प्रतीची प्रामाणिकता व विद्वत्ता दिसून येते. प्रांताबरोबरच नद्यांच्याबाबत आंतरराज्यीय समस्या निर्माण झाल्या होत्या. जलसंसाधनाच्या विकासाचे हित हे केवळ प्रांत किंवा राज्यापुरते मर्यादित नसून संपूर्ण भारताच्या विकासासाठी आहे, हे मत पटवून देण्यात ते यशस्वी झाले.

भारताच्या जल व वीज संसाधन विकासाबाबत डॉ. आंबेडकरांचा स्वत:चा विचार होता. त्यावर आधारित धोरण होते. १९१८ मध्ये त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या मूळ समस्यांचा दृष्टिकोन स्पष्ट केला. ज्याचा संबंध आर्थिक मागासलेपणाशी होता. पूर्वीपासून भारतातील सामाजिक अर्थव्यस्थेचे चुकीचे व्यवस्थापन झालेले होते. कृषी क्षेत्रामध्ये भांडवलाची दुर्मीळता असताना उच्च श्रमशक्तीचा दबाव होता, असे अप्रमाणबद्ध सहअस्तित्व होते. म्हणून भूमी आणि श्रम उत्पादनाच्याबाबत निराशा होती असे डॉ. आंबेडकर म्हणतात. कृषी उत्पादन वाढवायचे असेल तर भांडवल गुंतवणूक करावी लागेल. बिगर शेती व्यवसायाकडे श्रमिकाचे स्थानांतरण करावे लागेल. कृषी क्षेत्रामधील श्रमिकाची कपात करून श्रमिक एका पर्याप्त स्थितीत आणावे लागतील. औद्योगिकीकरणाचे आकुंचन भूमिवरचा दबाव वाढवितो आहे. भांडवली गुंतवणूक वाढवित असताना श्रम उत्पादकता वाढवावी लागणार आहे. याकरिता नियोजित विकास कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास घडवून आणायचा आहे, असे मत डॉ. आंबेडकरांचे होते.

डॉ. आंबेडकर ओळखून होते की, पाणी राष्ट्राची संपत्ती आहे. याशिवाय कोणत्याही क्षेत्राचा विकास होऊ शकत नाही. जलसंसाधन प्रकल्पाचा विस्तार होत असताना आंतरराज्याचे मोठे क्षेत्र व्यापले जात होते. सोबत आर्थिक-सामाजिक अटी आणि आंतरराज्यामध्ये विरोध होता. याबाबत संपूर्ण दृष्टिकोन संपूर्ण देशाच्या हिताबाबत होता. आंबेडकरांना कळून चुकले होते की, जलसंसाधनाच्या पर्याप्त उपयोगासाठी अखंडत्व हा दृष्टिकोन संपादित करणे आवश्यक आहे.

आंबेडकरांनी जलसंसाधनाचा विकास व जल वितरणाचे घेतलेले काम अवघड आणि गुंतागुंतीचे होते. त्या कालावधीमध्ये १९३५ चा कायदा अस्तित्वात होता. त्यानुसार ब्रिटिश भारतामध्ये सिंचन निर्मिती करण्यात आली होती. यामध्ये केंद्र सरकारची भूमिका आंतरराज्यांमध्ये विवाद निर्माण झाल्यास मध्यस्थाची होती. १९३५ च्या कायद्यानुसार, सिंचन राज्यशासनाच्या प्रक्रियेअंतर्गत येत होते. भारत हा संघराज्यीय देश आहे. संपूर्ण देशाच्या हितासाठी समान धोरणांची मांडणी असावी, याकरिता राज्यांनी एकत्रित यावे. डॉ. आंबेडकरांना असे सुद्धा वाटत होते की, संविधानामधील वर्गीकरणात बदल करण्याची गरज पडू नये. जल संसाधनाच्या संयुक्त प्रकल्पामध्ये राज्यांनी सहकार्य करावे. त्यांनी जलव्यवस्थापनाकरिता नियोजन महत्त्वाचे मानले. याकरिता संपूर्ण भारताच्या पातळीवर बहुव्यापता असण्याची आवश्यकता होती.

## विकास व्यूहनीती

डॉ. आंबेडकरांच्या विकास व्यूहनीतीवर प्रकाश टाकला तर असे दिसून येते की, जागतिक महायुद्धानंतरच्या १९४३-४६ च्या कालावधीमध्ये नियोजनामध्ये सामाजिक प्राथमिकतेला महत्त्वाचे स्थान होते. नियोजन हे आंबेडकरांच्या विचारांचा विस्तार दर्शवित होते. भारताचे प्राथमिक क्षेत्र कृषी क्षेत्र होते. मात्र, जोपर्यंत उद्योगांना विशिष्ट पातळीपर्यंत आणले जात नाही तोपर्यंत उत्तेजनात्मक विकास घडून येणार नाही. उद्योग आणि कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता पायाभूत सुविधाच्या विकासाला उच्चतम प्राथमिकता देण्यात आली. सिंचन आणि स्वस्त व पुरेशी वीज हा आधारभूत संरचनेचा महत्त्वाचा घटक होता. केंद्र सरकारने पहिल्यांदा जल, वीज व खनिज संसाधनाबाबत बहुव्याप्त सर्वांगीण पातळीवर विचार करणारे धोरण मांडले. यामधील सिंचन आणि वीज प्रांतीय विषय होता. थोडा बहुत हा विषय केंद्रांतर्गत होता. डॉ.आंबेडकर सिंचन आणि वीजशक्ती समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी या समितीच्याद्वारे जलसंसाधनाच्या पर्याप्त विकासाकरिता धोरणांची निर्मिती व कृतिशील नियोजन घडवून आणले.

या समितीने जलधोरणांचा अवलंब करीत असताना सिंचन विकासाच्या मापकाचा समावेश केला. या धोरणांतर्गत पृष्ठभागावरील जल, भूगर्भांतर्गत जल, जलवाहतूक आणि वीजशक्तीचा विकास होता. सिंचनाचा विकास करून जलवाहतूक व जलविद्युत शक्ती निर्माण करण्याचे डॉ. आंबेडकरांचे उद्दिष्ट होते. याकरिता केंद्र सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. धोरणाच्या अनुषंगाने आवश्यक संसाधनाचा पुरवठा, तांत्रिक सहकार्य व वित्तीय साहाय्य याची तरतूद करून देण्यात आली. सोबत जलसंसाधनाच्या प्रकल्पामध्ये प्रादेशिक विकास अंतर्भूत होता. जलसंसाधन प्रकल्पाची पडताळणी व वेध घेण्याकरिता तज्ञ मंडळ असावे, याकरिता केंद्रीय तांत्रिक वीज मंडळ (Central Technical Power Board - CTPB) नोव्हेंबर, १९४४ मध्ये तर केंद्रीय जलमार्ग, सिंचन व जलवाहतूक समिती (Central Waterways Irrigation and Navigation Commission - CWINC) ५ एप्रिल, १९४५ मध्ये स्थापन करण्यात आले. यामधील CTPB

मार्फत संमक गोळा करणे, सर्वेक्षण करणे व वीज विकासाकरिता योजना तयार करून नियोजनाद्वारे धोरणांना प्रोत्साहन दिले जात होते. तर CWINC हे केंद्रीय जलमंडळ होते. यामध्ये वास्तव घटकाचे नियोजन आणि समन्वय साधला जात होता. सोबतच जलसंसाधनाची पाहणी करणे, निरीक्षण करणे व सुरक्षित नियोजन केले जात होते.

**जलसंसाधन धोरणावर आंबेडकरांचा प्रभाव**

जलसंसाधन धोरण आंबेडकरांच्या विचाराने आणि पुढाकाराने सुरू झाले. यामध्ये केंद्र सरकारचा सहभाग आणि भूमिका महत्त्वाची होती. १९३५च्या कायद्यानुसार, जलसंसाधन प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. आंबेडकरांनी भारताच्या नवीन जलधोरणाचे स्वरूप जानेवारी १९४४ मध्ये स्पष्ट केले. याबाबत त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, भारताच्या विकास धोरणाबाबत सकारात्मकता नव्हती. तत्कालीन भारत सरकारची अशी इच्छा होती की, जलसंसाधनाचा विकास करून ही सेवा इतर देशांना द्यायची होती.

जलसंसाधनाचे नियोजन आणि विकासाच्या राष्ट्रीय धोरणाचे समर्थन केले जात होते. शिवाय राज्यांच्या सचिवालयांचे धोरण देखील हेच होते. मात्र आंबेडकरांचा जागरूक विश्वास होता की, नद्यांचे पाणी राष्ट्रीय वारसा आहे म्हणून राष्ट्रीय धोरणांची आवश्यकता आहे. बहुराज्यांनी बहुउद्देशाकरिता पाण्याचा वापर करण्याची गरज आहे. यामुळे समाजाच्या मोठ्या वर्गाला सेवा प्राप्त होणार आहे. यामध्ये राज्यांना सामावून घ्यायचे आहे. जलसंसाधन प्रकल्पाचे लाभ निश्चितच तळागाळातील लोकांना मिळाले पाहिजेत. जलसंसाधनाच्या विकासामुळे खोऱ्यामध्ये संपदा निर्माण होईल, ज्याचा लाभ सर्वांना प्राप्त होईल. याकरिता प्राधिकरणाची (agency) स्थापना करण्याची आवश्यकता आहे.

१९३५च्या कायद्यानुसार, रेल्वे मार्ग केंद्राच्या अखत्यारीतील विषय होता तर नदी व जलमार्ग राज्याच्या अखत्यारीतील विषय होता. या त्रुटीमुळे तोटे प्राप्त झाले. प्रांतांना वीज आणि सिंचनाची गरज होती. याकरिता जलसंसाधनाचा उपयोग करण्याची इच्छा होती. पण त्याचा उपयोग केला जाऊ शकत नव्हता. कारण धरणे एका प्रांतात होती तर पाण्याची गरज दुसऱ्या प्रांतामध्ये होती. जलवाटपाच्या बाबतीत प्रांतामध्ये सहमती नव्हती. यातून जलसंसाधनाची सुटका होण्याची आवश्यकता होती. पाणी वाटपाच्या प्रश्नामधून दोन प्रांतामध्ये शत्रुत्व निर्माण झाले होते. न्याय मागण्यासाठी ते प्रांतीय स्वायत्तेची मागणी करू लागले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात आंबेडकरांना असे वाटले की, राष्ट्रीय जलसंसाधन धोरणामध्ये मुख्य अडथळा जलवाटपावरून प्रांतीय विवादाचा आहे. सोबतच प्रांतीय न्यायालय व न्यायालयीन अधिकार क्षेत्राचा अडथळा होता. यावर मात करण्याची आवश्यकता होती. केंद्र शासनाने संपूर्ण भारतामध्ये आंतरराज्य नदी प्रकल्प उभारलेले होते. ज्याला राज्य सरकारची सहमती आवश्यक होती. आंबेडकरांना सखोल कायद्याचे ज्ञान होते. ते संविधान तज्ञ होते. त्याच्या या कामाचा अनुभव केंद्र सरकारच्या पर्यायी मार्गांना विकसित करण्याकरिता झाला. १९३५ च्या भारतीय प्रांतीय कायद्याच्या चौकटीअंतर्गत स्वातंत्र्यानंतर संविधानामध्ये जलसंसाधनाच्या वाटपाबाबत तरतूद करण्यात आली.

जलसंसाधनाच्या वाटपाबाबत प्रांत हा अडथळा होता. या अडथळ्यावर मात करण्यासाठी स्वतंत्र अधिकार मंडळाची स्थापना आंबेडकरांच्या शिफारशीनुसार करण्यात आली. आंबेडकरांनी आंतरराज्य नदी प्रकल्प व जलसंसाधनाच्या विकासामध्ये केंद्र सरकारची मध्यवर्ती भूमिका मानली. याकरिता नदी खोऱ्याचा प्रादेशिक विकास अखंडपणे

केला जाईल. प्रादेशिक विकासाकरिता जलसंसाधनाचा बहुउद्देशीय उपयोग नदी खोऱ्यामध्ये होण्याची आवश्यकता आहे. हे आंबेडकर प्रणित जलधोरणाचे मुख्य तत्त्व होते. केंद्राने मध्यस्थी प्रादेशिक विकासाकरिता करावी. ज्यातून प्रांताचे हित जोपासले जाईल. याकरिता केंद्र सरकारचा सहभाग आधिक्याने सकारात्मक असण्याची आवश्यकता आंबेडकरांनी नमूद केलेली होती. सिंचन प्रकल्प हा राज्याचा विषय जरी असला तरी प्रादेशिक विकासाकरिता संपूर्ण नदी खोऱ्याचा विकास होण्याची आवश्यकता आहे. ज्याचा लाभ अनेक राज्यांना मिळतो. आंबेडकरांनी या सर्व बाबी लक्षात घेऊन संपूर्ण भारताकरिता जलधोरणाची मांडणी केली. या जल धोरणाचे मुख्य तीन घटक होते.

अ) आंतरराज्य नदी प्रकल्पाकरिता नियंत्रण व व्यवस्थापनासाठी नदी खोरे अधिकारी मंडळाची (River Valley Authority) स्थापना करण्यात आली.

ब) नदी खोऱ्याच्या विकासाचे उद्दिष्ट प्रादेशिक विकास आणि बहुउद्देशीय उपयोग होता.

क) केंद्र सरकारने तांत्रिक तज्ञ मंडळाची स्थापना केली होती.

आंबेडकरांना स्पष्टपणे माहिती होते की, विकास साध्य करण्याकरिता आंतरराज्य नद्यांचा विकास करणे आवश्यक आहे. याकरिता बहुव्याप्त नियोजनासह बहुउद्देशीय प्रकल्पांची मांडणी करण्यात आली. नदी खोरे अधिकारी मंडळाद्वारे नदी खोऱ्याचा विकास करण्यात आला.

संपूर्ण देशाचा विकास घडवून आणणे ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. आंतरराज्य प्रकल्पाचा विकास करणे हे केंद्र सरकारच्या जबाबदारीमध्ये अंतर्भूत आहे. आंतरराज्य सिंचन प्रकल्प होत असताना एका राज्याला लाभ होईल व दुसरे राज्य प्रभावित होणार नाही, याची काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागते. म्हणून सिंचन प्रकल्पाच्याबाबतीत राज्यामध्ये करार घडवून आणणे ही केंद्र सरकारचीच बाब आहे. स्वतंत्र अधिकारी मंडळाकडून करार योग्य प्रकारे घडवून आणले तर त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करता येईल. केंद्रीय कायदे मंडळ आणि नदीच्या संदर्भातील प्रशासन जल प्रकल्पाच्याबाबत योग्य निर्णय घेऊ शकते. आंतरराज्य जल प्रकल्पांना (सिंचन प्रकल्पांना कराराची शक्ती बहाल केलेली आहे. या कराराचा संबंध केंद्र आणि राज्याशी आहे. आंतरराज्य नदी समस्या न्यायालयीन होऊ शकतात, याची कल्पना आंबेडकरांना होती. म्हणून याला मात देण्याकरिता केंद्रीय जलमंडळ (Central Water Commission - CWC) ची निर्मिती करण्यात आली होती. जे सुरुवातीला (स्वातंत्र्यपूर्वकाळात) केंद्रीय जलमार्ग सिंचन व जलवाहतूक (Central Waterways, Irrigation and Navigation Commission - CWINC) या नावाने होते. आंतरराज्य नदी प्रकल्पामध्ये केंद्रीय जलमंडळाने स्वातंत्र्यानंतर मुख्य भूमिका पार पाडली. या अंतर्गत आंतरराज्य जलसंसाधनाच्या संदर्भातील वादप्रश्न हाताळले जातात. आंबेडकरांना जलसंसाधनाच्या प्रांतीय अडथळ्याची सखोल जाणीव होती, यावर त्यांनी मात केली. त्यांची शैली, नियोजनांमधील सहभाग व सशक्त राजकीय नेता या गुणांमुळे त्यांना अशा समस्यांवर मात करता आली.

जलसंसाधनाच्या विकासाबाबत लक्ष केंद्रीत करून अविश्रांतपणे कार्य केलेले आहे. दामोदर खोरे प्रकल्पाबाबत केंद्र सरकार आणि बिहार व पश्चिम बंगाल सरकारशी करार घडवून दामोदर खोरे प्रकल्पाची अंमलबजावणी व व्यवस्थापन करण्यात आले. याकरिता आंबेडकरांनी कायद्यावर भर दिला होता. सांविधानिक विधिमंडळाद्वारे दामोदर खोरे प्रकल्प कायदा १९४८

तयार करण्यात आला. ह्यातून पुढे जुलै, १९४८ मध्ये दामोदर खोरे प्रकल्प निगम (Damodar Valley Project Corporation) निर्माण झाले. दामोदर खोरे प्रकल्पाची प्रक्रिया गुंतागुंतीची होती पण आंबेडकरांनी ती यशस्वीपणे तडीस नेली.

## दामोदर खोरे प्रकल्प

दामोदर खोरे परियोजनेला जानेवारी १९४५ पासून सुरुवात झाली. याद्वारे डॉ. आंबेडकरांनी CIWINC ची भूमिका स्पष्ट केली. कशा प्रकारे जलसंसाधनाचे चांगल्या प्रकारे उपयोजन होऊ शकते, ते स्पष्ट केले. सिंचन, जलवाहतूक व जलविद्युत याकरिता प्रांतीय परवाना कायदा १९३५ होता. या कायद्याचा परिणाम आंतरराज्य नदी खोरे प्रकल्पावर झाला. प्रकल्पाचे नियोजन व्हावे, याकरिता आंबेडकरांनी श्रम विभागामार्फत नदी खोरे अधिकारी मंडळ (River Valley Authority) हे नवीन साधन विकसित केले. यामध्ये केंद्र, राज्य आणि प्रांताचा सहभाग समाविष्ट केला.

दामोदर खोरे निगम (Damodar Valley Corporation) हे अशा प्रकारचे अधिकारी मंडळ आहे की, जे नदीच्या पाण्याच्या विकासाकरिता पाण्याचे नियंत्रण व व्यवस्थापन करीत होते. दामोदर नदीच्या जलप्रवाहाचा संबंध हा बिहार आणि पश्चिम बंगालशी होता. दामोदर नदी आंतरराज्य असल्यामुळे पाण्याचे नियोजन व व्यवस्थापनाकरिता कृतिशील सहभाग केंद्र सरकारला घ्यावा लागला. श्रमविभागाची महत्त्वाची भूमिका जलसंसाधन विकासामध्ये होती. श्रम विभागाने स्वीकारलेला दृष्टिकोन जलसंसाधने विकसित करण्याचा होता. संपूर्ण नदी खोऱ्यामध्ये नद्यांचा बहुमुखीय विकास घडवून आणणे होता. याकरिता तीन तत्त्वे जलधोरणामध्ये स्वीकारण्यात आली.

१. पाण्याचा उपयोग बहुमुखीय म्हणजे सिंचन, जलमार्ग, उद्योग, घरगुती, उपयोग व जलविद्युतकरिता करण्यात यावा.

२. संपूर्ण नदी खोऱ्याचा विकास घडवून आणणे.

३. मुख्यत्वे ही जोडणी जलसंसाधनाच्या बहुउद्देशीय उपयोगाकरिता होती. ज्यांतर्गत सामाजिक, आर्थिक आणि परिस्थितीकीय विकास होता.

नदी खोरे अधिकारी मंडळाला याकडून सहकार्य अपेक्षित होते. याचा संबंध प्रांतीय, राज्य आणि स्थानिक शासनाशी होता. तांत्रिक मंडळे केंद्राने स्थापन केलेली होती. कार्यकारी अधिकारी (Executive Authority), संकल्पना नदी खोरे अधिकारी मंडळ आणि प्रांतीय व बहुउद्देशीय विकास हा आंतरराज्य नद्यांच्याबाबत होता. दामोदर, महानदी, सोन आणि कोसी ह्या नद्यांकरिता दामोदर खोरे प्रकल्प हा पहिला बहुद्देशीय प्रकल्प होता. हा प्रकल्प खूप परिश्रमाने तयार करण्यात आला. ज्यावर तीन आंतर प्रांतीय परिषदेअंतर्गत चर्चा घडून आली. आंबेडकरांच्या प्रोत्साहनामुळे दामोदर खोरे प्रकल्प यशस्वी झाला. ही बहुउद्देशीय विकासाची संकल्पना महानदीपर्यंत विस्तारण्यात आली. एन.एन.खोसला यांच्या अध्यक्षतेखाली हिराकुंड, निरज आणि टिखरपारा प्रकल्प बांधणीला मान्यता देण्यात आली. त्यानंतर मार्च, १९४६ मध्ये ओडिसा सरकारने पुढाकार घेऊन सोन आणि कोसी नदीवर बहुउद्देशीय प्रकल्प उभारले होते.

समांतरपणे आंबेडकरांच्या राजकीय निर्णय परिपक्वतेने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या महत्त्वाकांक्षेला जन्म घातला. ही महत्त्वाकांक्षा जल आणि वीजशक्ती धोरणामध्ये दिसून आली. सिंचन आणि वीजशक्ती धोरण युद्धोत्तर कालावधीनंतर मांडण्यात आले. श्रम विभागाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाचा हा संयुक्त परिणाम होता. आंबेडकरांनी

जल व वीज समस्या तज्ञ आणि दक्षपणे सोडविली होती. आंबेडकरांनी जल धोरणाचा वादप्रश्न सोडवत असताना प्रांत आणि राज्याशी करार करून घेतले. ज्यांतर्गत संपूर्ण भारताच्या पातळीवर सिंचन आणि वीज विकास धोरणाचा निवाडा केला. आंतरराज्यीय नदी प्रकल्प सिंचन आणि विजेचा विकास होण्याकरिता केंद्र सरकारच्या अंतर्गत असावे. केंद्राच्या कृतिशील सहभागाचे समर्थन आंबेडकरांनी केले होते. १९३ च्या प्रांतीय कायद्याद्वारे आंतरराज्य तज्ञांच्या मर्यादांचा परिणाम प्रकल्पावर घडून आला. हे लक्षात घेऊन तज्ञांच्या मार्गदर्शनाअंतर्गत जलसंसाधनाच्या विकासाचे करार करण्यात आले. जलसंसाधन विकासाच्या दृष्टिकोनातून योग्य व पर्याप्त धोरण स्वीकारण्यात आले. आंबेडकरांचा राजकीय दर्जा, प्रचंड लोक संबंध आणि विद्वत्ता यामुळे प्रांताची मने वळवून धोरणामध्ये अनुकूलता आणण्यात आली. केंद्राच्या कृतिशील सहभागामुळे नदी खोरे प्रकल्पाची साधने विकसित करण्यात आली व आंतरराज्य नदी प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यात आले.

नवीन जलधोरण विकासामध्ये आंबेडकरांचा मानवी दृष्टिकोन आणि गरीब व वंचिताशी असलेला प्रचंड संबंध दिसून आला. गरीबांसाठी वीजशक्तीचा विकास आणि सिंचन महत्त्वाचे मानून नियोजन करणे, हे दुर्मीळतेनेच आढळून येते. नियोजनामुळे जलधोरणाला योग्य दिशा देण्यात आली. ज्यामुळे या देशातील लाखो-हजारो जर्जर-दारिद्र्यात खितपत पडलेल्या लोकांच्या जीवनमानात संपन्नता आणावयाची होती. म्हणून आंबेडकर म्हणतात, निश्चित आणि खात्रीशीरपणे सिंचनाचे लाभ तळातील लोकांना मिळायला पाहिजेत. आपण प्रत्येकजण कोणत्या न कोणत्या खोऱ्यामध्ये राहतो. त्यामुळे खोरे प्रकल्प अस्तित्वात येत असताना सर्वांच्या संपन्नतेमध्ये समानता राहील, असा दावा आंबेडकर करतात. दामोदर खोरे प्रकल्पाचा विकास झाल्यानंतर बिगर-शेती करणारी कुटुंबे, विस्थापित शेतकरी यांच्या पुनर्वसनाकरिता पुनर्वसन धोरण राबविण्यात आले. तर पुनर्स्थापन धोरण २२ एप्रिल, १९४६ पासून राबविण्यात आले. आंतरप्रांतीय परिषदेमध्ये श्रम विभागाद्वारे याला मान्यता प्राप्त झाली. आंबेडकरांचा राष्ट्रीय बांधणीमध्ये मोलाचा वाटा होता. जलसंसाधनाचा विकास आधुनिक संकल्पनाद्वारे घडवून आणण्यात आला. याकडून नदी खोऱ्याच्या विकासाचे बहुव्याप्ती धोरण राबविण्यात आले.

दामोदर खोरे प्रकल्पाचा संबंध पूर थांबविणे, जमिनीची धूप, जंगले व नद्यांच्या संवर्धनाशी होता. त्याहीपेक्षा जलसिंचन आणि पूर नियंत्रणाशी होता. ज्याबाबत प्रस्तुत धोरण जागरूक होते. सोबतच जलमार्गाचा विकास करायचा होता. जलसंसाधनाच्या विकासामध्ये प्रांतीय स्वायतत्ता हा मोठा अडथळा होता. जर हा प्रांतीय अडथळा दूर झाला तर प्रगती आणि संपदा घडून येणार होती. नवीन जलधोरणांमुळे कालव्याची निर्मिती झाली. दारिद्र्यात जर्जर झालेल्या लाखो लोकांना संपन्नतेच्या स्थितीत आणण्याची ही मांडणी होती. दामोदर नदी प्रकल्पाकरिता तज्ञ व्यक्तींचे सहकार्य लाभले होते. यामध्ये बंगालमधील अभियंत्यांचे योगदान होते. ज्यामुळे बिहार आणि पश्चिम बंगालकरिता एकीकरण आराखडा प्राप्त करून देण्यात आला. पूर नियंत्रण हा या धोरणाचा भाग असल्यामुळे सुरक्षितता ही या धोरणाद्वारे प्राप्त झाली. सामूहिक जबाबदारी हा या योजनेचा दुसरा भाग होता. यामध्ये बिहार, पश्चिम बंगाल आणि ओडिसा शासनाच्या एकत्रिकरणामुळे दामोदर विकास प्रकल्प घडून आला. दुष्काळावर खात्रीशीर उपाय म्हणजे सिंचन त्यामुळे सुरक्षितता प्राप्त झाली. म्हणून या प्रकल्पाचे व धोरणांचे स्वागत झाले.

## मात करणाऱ्या तरतुदी

सिंचन हा विषय राज्याच्या अंतर्गत होता. आंतरराज्य नद्यांचा विकास व खोऱ्याचा विकास लोकहिताकरिता होणे आवश्यक होता. याकरिता विधिमंडळाद्वारे कायदे करून यावर नियंत्रण प्रस्थापित केले जात होते. अशा प्रकारचे कार्य करण्यास भारत सबळ नव्हता. मात्र, परिणामकारक पद्धतीने आंतरराज्य कायद्यामुळे विवादाला नियंत्रित करता आले. पाण्याचा उपयोग, वितरण आणि नियंत्रण यावरून आंतरराज्य विवाद उत्पन्न होतात. याकरिता कायद्याद्वारे तरतूद केलेली आहे. शिवाय सर्वोच्च न्यायालय व इतर कार्यकारी मंडळाद्वारे विवादाचे सन्मानपूर्वक निवारण केले जाते.

तरीसुद्धा आंबेडकरांना असे वाटत होते की, विवाद निवारणाकरिता यंत्रणा असावी. करार झाल्यानंतर सुद्धा विवाद हा उद्भवू शकतो. म्हणून काही पर्याप्त प्रमाणात कायदे सांसदिय विधिमंडळाद्वारे करण्यात आले. ज्यामध्ये आंतरराज्य जलविवाद कायदा १९५६ (Interstate Water Dispute Act - ISWDA, 1956) नदी मंडळ कायदा १९५६ (River Board Act - RBA, 1956) इ. कायदे करण्यात आले. सर्व न्यायालये अंतिमतः सर्वोच्च न्यायालयामध्ये समाविष्ट आहेत. निर्माण झालेले जलविवाद अंतिमतः न्यायालयाकडून सोडविले जातात. म्हणून विशेष न्यायालयाची स्थापना आंबेडकरांच्या शिफारशीनुसार करण्यात आली. जलविवादाची प्रकरणे विशेष न्यायालय (Tribunal) अंतर्गत सन्मानपूर्वक सोडवली जातात. कावेरी जलविवाद विशेष न्यायालयाद्वारे सोडविण्यात आला आहे.

आंबेडकरांनी नद्यांद्वारे मोठ्या प्रमाणात समुद्रात जाणाऱ्या पाण्यावर प्रकाश टाकला. असे बरेच पाणी निकामी जाते. हा पाण्याचा अपव्यय आहे. याकरिता त्यांनी कृष्णा, गोदावरी व तापी नदीच्या आंतरराज्य जोडणी प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. यातूनच पुढे सरदार सरोवर प्रकल्प उदयास आले. ज्याला प्रसिद्ध अभियंता के.एल.राव यांनी मूर्त स्वरूपात आणले. मोठ्या प्रकल्पामुळे कोरडवाहू क्षेत्राची पाण्याची मागणी पूर्ण केली जाऊ शकते. नदी खोऱ्याच्या कोरडवाहू प्रदेशात पाण्याची मागणी वाढत आहे. जल प्रकल्पाचा विकास करून ही तूट भरून काढली जाऊ शकते. पाण्याचे आधिक्य असणाऱ्या क्षेत्राकडून तूट असणाऱ्या क्षेत्राकडे कालव्याद्वारे पाण्याची मागणी पूर्ण केली जाऊ शकते. आंबेडकरांचा भर आधिक्य (Surplus) पाणी असणाऱ्या क्षेत्राकडून पाण्याची तूट असणाऱ्या भागाकडे पाणी परिवर्तित करण्यावर होता. म्हणून नदी जोडणी त्यांनी महत्त्वाची मानली होती. ज्याचा लाभ संपूर्ण जनसमुदायाला होईल.

दामोदर खोरे प्रकल्पामुळे ४,७००,००० एकर क्षेत्र नियंत्रित करण्यात आले. जलवाहतुकीच्या उद्दिष्टाबरोबरच ७,६०,००० एकर क्षेत्रामध्ये सिंचन घडून आले. जलविद्युत शक्तीचे उत्पादन ३,००,००० किलोवॅट झाले. यातून प्रत्यक्षात ५ दशलक्ष लोकांचे कल्याण साध्य झाले तर कित्येक दशलक्ष लोकांना अप्रत्यक्ष फायदा झाला. आंबेडकरांचा दृष्टिकोन सत्यावर आधारलेला होता. त्यामुळे दामोदर खोऱ्यामध्ये संपन्नता निर्माण झाली. ही गुंतागुंतीची प्रक्रिया आंबेडकरांनी चार वर्षांमध्ये तडीस नेली. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळेच ते शक्य झाले.

## समारोप

आंबेडकरांची निर्णयक्षमता जलद होती. नदी खोरे प्रकल्पाची स्थापना सुरक्षितता व बहुउद्देशीयता दृष्टिकोनातून केली गेली होती. नदी खोरे प्रकल्प युद्धोत्तर प्रकल्पाचा वादप्रश्न म्हणून देखील राबविण्यात आला. शांतता व रोजगार निर्माण करण्याच्या उद्देशाने व

अर्थव्यवस्थेचा गंभीर विचार करून जलधोरण राबविण्यात आले. आंबेडकरांच्या देदीप्यमान नेतृत्वामुळे दामोदर खोरे प्रकल्प अस्तित्वात आला. महानदी, कोसी सोन व भाक्रा-नांगल प्रकल्प निर्माण झाले. ज्याचा लाभ पंजाब, हरियाणा, राजस्थान, हिमाचल प्रदेश व दिल्लीला प्राप्त झाला. आंबेडकरांचे धोरण हे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात अंमलात आणले ज्यामुळे एकता, अखंडता व संघराज्यीय संरचनेची जोपासना देशामध्ये झाली.

**संदर्भ ग्रंथ यादी**


१. भोळे भा.ल. (१९७८) : आधुनिक भारतातील राजकीय विचार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. कविमंडन विजय (२०१२) : डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

3. Abraham P. (2002) : Notes on Ambedkar's Water Resource Policy, Nov. 30. Economic & Political Weekly.

4. Ambedkar B.R. (1944) : Damodar Valley Scheme, Labour Member Speech, First Calcutta speech, Jan. 3.

5. Ambedkar B.R. (1945) : Damodar Valley Scheme, Labour Member Speech, Third Calcutta speech, Feb. 1.

6. Ambedkar B.R. (1944) : Multipurpose development of Damodar Valley, Labour Member Speech, Second Calcutta speech, Aug. 22.

7. Ambedkar B.R. (1945) : Multipurpose Plan for Development of Orissa's River, Speech at Cuttak, Dec. 15.

8. Central Water Commission ( 1993) : Ambedkar's Contribution to Water Resource, Ministry of Water Resource, New Delhi.


◆

---

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी


अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु. १०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. १५००/- आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**


---

# कृषिप्रधान भारतातील शेतकरी आत्महत्या : एक शोकांतिका

**दीपक विठ्ठल भुसारे** †
सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक,
अर्थशास्त्र विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण

**प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतात ६५ टक्के लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. २०२० साली आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतात प्रचंड प्रमाणात विषमता वाढत आहे. आज १० टक्के लोकांकडे देशाची ९० टक्के संपती आहे. तर ९० टक्के लोकांकडे फक्त १० टक्के संपती आहे. गरीब व श्रीमंत यामधील अंतर सातत्याने वाढत आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे सध्या शेती व्यवसाय हा हमीभावा अभावी परवडणारा नाही. त्यामुळे भारतात शेतकरी हवालदिल झाला आहे. हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, बालमजुरी, दारिद्र्य, भ्रष्टाचार, बलात्कार, कुपोषण व शेतकरी आत्महत्या या समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. राष्ट्रीय गुन्हे निमंत्रण ब्युरो (NCRB) २०१६ च्या हंगामी/तात्पुरती (Provisional) आकडेवारीनुसार, भारतात ११३७० शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या ३६६१ महाराष्ट्रात झाल्या आहेत तर त्यानंतर कर्नाटक २०७९, मध्यप्रदेश २०१६ या राज्यांतील शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेला अशा पुरोगामी महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक ''**शेतकरी आत्महत्या**'' होणे हे अत्यंत निंदनीय आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर देखील आम्ही शेतकऱ्यांना न्याय देऊ शकलो नाही, हे महाराष्ट्रातील राजकीय पुढाऱ्यांचे व सध्याचे सरकारचे मोठे अपयश आहे.

**भारतातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव**

भारत सरकारच्या नॅशनल क्राईम रेकार्ड्स ब्युरोच्या (NCRB) अहवालानुसार, १९९५-२०१५ या २० वर्षांत देशातील ३,२१,४०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. भारताने १९९१ नंतर उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) धोरण स्वीकारल्यानंतर आपल्या अर्थव्यवस्थेत फार मोठे बदल झाले. जागतिकीकरणामुळे आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली जाऊन परकीयांसाठी आपली दारे खुली करण्यात आली. मात्र, या स्पर्धेत शेतकरी शासनाच्या ढिसाळ धोरणामुळे तग धरू शकला नाही.

स्वातंत्र्यानंतर भारताच्या सकल अंतर्गत उत्पादितामध्ये (GDP) कृषिक्षेत्राचा वाटा सातत्याने

†आजीव सभासद क्र. : १४७९, भ्रमणध्वनी : ९४०५२७६३२०, ई-मेल : dr.deepak.bhusare@gmail.com

कमी होत आहे. २०१६-१७ मध्ये कृषिक्षेत्राचा भारतात GDP मधील हिस्सा फक्त १५.११ टक्के आहे. याचा अर्थ भारतातील ६५ टक्के शेतकऱ्यांचा GDP मधील वाटा फक्त १५.८ टक्के त्यामुळे भारताला कृषिप्रधान न म्हणता भांडवल प्रधान म्हटले तर वावगे ठरणार नाही. देशातील मूठभर भांडवलदार आज देश चालवत आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारला शेतकरी आत्महत्या व त्यांच्या समस्या बघायला वेळ नाही. २००६ मध्ये डॉ.स्वामीनाथन आयोगाने केलेल्या शिफारशी आजही लागू झाल्या नाही. शेतकऱ्यांच्या नावावर फक्त आज राजकारण सुरू आहे; ही मोठी शोकांतिका आहे. २००८ मध्ये UPA सरकारने ७२००० कोटी रुपये शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले तर त्याचा एवढा उदो उदो करण्यात आला. तसेच, नुकतीच महाराष्ट्र शासनाने १,५०,००० रूपये पर्यंतचे शेतकऱ्यांची कर्जमाफी घोषणा केली असली तरी अजूनही बहुसंख्य गरजू शेतकऱ्यांच्या हातात काही नाही. नुसत्या माध्यमांच्याद्वारे सरकार वल्गाना करत आहे. संशोधकांच्या मते, सरकार शेतकरी आत्महत्या व त्यांच्या समोरील समस्या याबाबत प्रमाणिक प्रयत्न करत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफीची भीक नको आहे. मात्र त्यांच्या शेतमालाला हमी भाव हवा, कृषिक्षेत्रात शासनाने आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. मात्र हे प्रामाणिकपणे होताना दिसून येत नाही.

## शेतकऱ्यांची आंदोलने

भारतात स्वातंत्र्यानंतर देखील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आपल्या हक्कासाठी मोठी आंदोलने केली आहेत. हमीभाव असेल, दुधाचे, कापसाचे भाव यासाठी देशात शेतकऱ्यांनी अनेक वेळेस चक्काजाम आंदोलने केली आहेत. मात्र त्यांच्या मागण्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. आज देशामध्ये महाराष्ट्रात मराठा समाज, हरियाणात जाट, गुजरातमध्ये पाटीदार, राजस्थानामधील गुज्जर गेली अनेक वर्षांपासून शासनाकडे आरक्षणाची मागणी करत आहे. अनेकांनी या आंदोलनात बलिदान दिले मात्र यावर अजून मार्ग निघाला नाही. साधारणपणे मराठा, जाट, पाटीदार, गुज्जर हा समाज शेती करणारा शेतकरी आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेती व्यवसाय हा आज परवडत नाही. त्यामुळे या समाजातील लोकांना मुलामुलींचे शिक्षण, आरोग्य, लग्न यासाठी पैसा नाही. प्रामुख्याने ग्रामीण भागात हा समाज अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. या समाजातील मूठभर लोक आमदार, खासदार, मंत्री आहेत. याचा अर्थ हा समाज फार पुढारलेला आहे असे नाही. हा समाज आजही शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या देखील मागासलेला आहे आणि म्हणूनच आरक्षणाची मागणी करत आहे. पाऊस कमी, शासनाचे चुकीचे धोरण, सरकार आरक्षण देत नाही, उत्पन्न कमी यामुळे भारतातील हा शेतकरी समाज आत्महत्येसारखा मार्ग अवलंबत आहे. म्हणून शासनाने ६५ टक्के शेती करणाऱ्या शेतकरी समाजाला किमान आरक्षणाच्या माध्यमातून न्याय द्यावा. अन्यथा, एक दिवस शेतकऱ्यांनी शेती स्वतःसाठीच पिकविली तर भारतात भयानक अवस्था निर्माण होईल; म्हणून शेतकऱ्यांचा आक्रोश शासनाने ऐकावा. कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे म्हणजेच शेती व शेतकऱ्यांना प्राधान्य देणे हे क्रमप्राप्त आहे. मात्र भारतात तसे होताना दिसून येत नाही. म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहे. म्हणून आज शेतकरी समाज हा दयनीय अवस्थेत असल्यामुळे तो आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात संघर्ष करत आहे. भारतातील शेतकरी आत्महत्या राज्यनिहाय खालील तक्त्यात दर्शविली आहे.

### तक्ता क्र.१ : भारतातील शेतकरी आत्महत्या

| वर्ष | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | कर्नाटक छत्तीसगड | मध्यप्रदेश आत्महत्या | पाच राज्यांतील एकूण शेतकरी | देशातील आत्महत्या | पाच बड्या राज्यांचा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | १०८३ | १९९६ | २४९० | १२३९ | ६८०८ | १०७२० | ५६.०४ |
| १९९६ | १९८१ | १७०६ | २०११ | १८०९ | ७५०७ | १३७२९ | ५४.६८ |
| १९९७ | १९१७ | १०९७ | १८३२ | २३९० | ७२३६ | १३६२२ | ५३.१२ |
| १९९८ | २४०९ | १८१३ | १८८३ | २२७८ | ८३८३ | १६०१५ | ५२.३४ |
| १९९९ | २४२३ | १९७४ | २३७९ | २६५४ | ९४३० | १६०८२ | ५८.६४ |
| २००० | ३०२२ | १५२५ | २६३० | २६६० | ९८३७ | १६६०३ | ५९.२५ |
| २००१ | ३५३६ | १५०९ | २५०५ | २८२४ | १०३७४ | १६४१५ | ६३.२० |
| २००२ | ३६९५ | १८९६ | २३४० | २५७८ | १०५०९ | १७९७१ | ५८.४८ |
| **एकूण** | **२००६६** | **१२७१६** | **१८०७०** | **१८४३२** | **६९२८४** | **१२११५७** | **५७.१९** |
| २००३ | ३८३६ | १८०० | २६७८ | २५११ | १०८२५ | १७१६४ | ६३.०७ |
| २००४ | ४१४७ | २६६६ | १९६३ | ३०३३ | ११८०९ | १८२४१ | ६४.७४ |
| २००५ | ३९२६ | २४९० | १८८३ | २६६० | १०९५९ | १७१३१ | ६३.९७ |
| २००६ | ४४५३ | २६०७ | १७२० | २८५८ | ११६३८ | १७०६० | ६८.२२ |
| २००७ | ४२३८ | १७९७ | २१३५ | २८५६ | ११०२६ | १६६३२ | ६६.२९ |
| २००८ | ३८०२ | २१०५ | १७३७ | ३१५२ | १०७९६ | १६१९६ | ६६.६६ |
| २००९ | २८७२ | २४१४ | २२८२ | ३१९७ | १०७६५ | १७३६८ | ६१.९८ |
| २०१० | ३१४१ | २५२५ | २५८५ | २३६३ | १०६१४ | १५९६४ | ६६.४९ |
| २०११ | ३३३७ | २२०६ | २१०० | १३२६ | ८९६९ | १४०२७ | ६३.९४ |
| **एकूण** | **३३७५२** | **२०६१०** | **१९०८३** | **२३९५६** | **९७४०१** | **१४९७८३** | **६५.०३** |
| १९९५ ते २०११ | ५३८१८ | ३३३२६ | ३७१५३ | ४२३८८ | १६६६८५ | २७०९४० | ६१.५२ |

संदर्भ- पी साईनाथन 'द हिंदू' मधील लेख online paper, www.thehindu.com'

| वर्ष | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | कर्नाटक छत्तीसगड | मध्यप्रदेश आत्महत्या | पाच राज्यांतील संबंधित आत्महत्या | देशातील शेती | पाच राज्यांचा वाटा% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२ | ३७८६ | २५७२ | १८७५ | ११७८ | ९४११ | १३७२७ | ६८.५५ |
| २०१३ | ३१४६ | २०१४ | १४०३ | १०९० | ७६५३ | ११७७२ | ६५.०१ |
| २०१४ | ४००४ | ६३२ | ७६८ | १९५३ | ७३५३ | १२३६० | ५९.४९ |
| २०१५ | ४२९१ | ९१६ | १५६९ | २२४४ | ९०२० | १२६०२ | ७१.५७ |
| **एकूण** | **१५२२७** | **६१३४** | **५६१५** | **६४६५** | **३३४३७** | **५०४६१** | **६६.२६** |
| १९९५ ते २०१५ | ६९०४५ (२१.४८) | ३९४६० (१२.२७) | ४२७६८ (१३.३०) | ४८८५३ (१५.२०) | २००१२२ | ३२१४०१ | ६२.२६ |

संदर्भ- Accidental Deaths & Suicides in India, Report 2012, 2013, 2014, & 2015.
National Crime Records Bureau (NCRB) Ministry of Home Affairs.

(टीप - कंसातील टक्केवारी ही देशातील एकूण शेतकरी आत्महत्याच्या प्रमाणात दर्शविते)

उपरोक्त तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकरी आत्महत्या ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. भारतात ६५ टक्के लोक शेती व्यवसायाशी निगडित आहे. मात्र शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेती व्यवसाय हा तोट्यात सुरू आहे. १९९५ ते २०१५ या वीस वर्षांच्या कालखंडात NCRB च्या अहवालानुसार, भारतात **३,२१,४०१** शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. प्रसिद्ध पत्रकार पी.साईनाथ यांनी 'द हिन्दू' मधील लेखात भारतातील शेतकरी आत्महत्येची १९९५ ते २०११ या कालावधीमधील आकडेवारीचे विश्लेषण अत्यंत सखोल केले आहे. १९९५ ते २०१५ या वीस वर्षांत सर्वाधिक शेतकरी आत्महत्या असलेल्या पाच राज्यांतील संख्या २,००,१२२ एवढी आहे. एकूण शेतकरी आत्महत्येचे हे प्रमाण ६२.२६ टक्के एवढे आहे. याचा अर्थ भारतातील पाच राज्यांत एकूण आत्महत्येपैकी मोठ्या (६२.२६ टक्के) प्रमाणात आत्महत्या होतात. भारतात १९९५ ते २०१५ या वीस वर्षांत सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्र राज्यात झाल्या असून ही संख्या ६९०४५ एवढी आहे. भारतातील एकूण शेतकरी आत्महत्येच्या २१.४८ टक्के आत्महत्या महाराष्ट्र राज्यात होतात. त्यानंतर मध्यप्रदेश/छत्तीसगडमध्ये ४८८५३ (१५.२०टक्के), कर्नाटक ४२७६८ (१३.३० टक्के) व आंध्रप्रदेश ३९४६० (१२.२७ टक्के).

भारतासारख्या कृषिप्रधान देशात लाखो शेतकरी आत्महत्या करत असेल तर ही मोठी शोकांतिका आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाले तरीही आज शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे. दुसरीकडे भारतात गरीब व श्रीमंत यामधील दरी सातत्याने वाढत आहे. २०२० साली आर्थिक महासत्तेचे स्वप्न बघणाऱ्या कृषिप्रधान देशात मागील वीस वर्षांत **३,२१,४०१** शेतकरी आत्महत्या करत असेल तर ही मोठी गंभीर समस्या आहे.

आमच्या देशातील फक्त भांडवलदार मोठा होत आहे. अनेक भांडवलदार बँकांचे हजारो कोटी रुपये बुडवून विदेशात पळून गेले आहेत. आज लाखो-कोटी रुपये या भांडवलदारांनी बुडविल्यामुळे राष्ट्रीयकृत बँका तोट्यात आहेत. २१ राष्ट्रीयकृत बँकांपैकी १९ बँकांना ८०,२८२ कोटी रुपये तोटा झाला आहे. नुकतेच केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी जून, २०१८ मध्ये हे बुडीत कर्ज सरकार भरणार असल्याची घोषणा केली. म्हणजे भांडवलदारांनी बुडविलेले कर्ज सरकार भरणार आहे; मात्र शेतकऱ्यांचे कर्ज फेडण्यासाठी सरकारकडे पैसे नाही, ही मोठी शोकांतिका आहे. म्हणून कृषिप्रधान भारत नुसता म्हणायचा आणि सर्व खिरापत मात्र भांडवलदारांना वाटायची अशी परिस्थिती सध्या देशात सुरू आहे. National Crime Records Bureau (NCRB) ने २०१५ नंतर ADSI (Accidental Deaths & Suicides in india) अहवाल प्रकाशितच केला नाही, असे केंद्रीय कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रुपाला यांनी जून, २०१८ मध्ये लोकसभेत सांगितले आहे. याचा अर्थ सरकारला शेतकरी आत्महत्या व इतर गुन्हे भारतात किती घडले याची माहिती बाहेर येऊ द्यायची नाही का? ती बाहेर आली तर आपले अपयश उघडे पडेल का? असे प्रश्न निर्माण होतात. यामधून सरकार शेतकरी आत्महत्या संदर्भात किती संवदेनशील आहे, याची अनुभूती येते. म्हणून जोपर्यंत भारतातील धोरणे शेतकरी, शेतमजुरी व सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून तयार होणार नाही. तसेच त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही. तोपर्यंत भारतातील शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. म्हणून मायबाप सरकारने आमच्या बळीराजाचा विचार करावा. छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू व आंबेडकरांच्या देशात शेतकऱ्यांनी लाखोंच्या संख्येने आत्महत्या करणे

ही फार मोठी शोकांतिका आहे. राजकीय पक्ष, राजकीय नेते व सरकारमधील मंत्री व प्रशासनाने या संदर्भात आत्मचिंतन करावे व आमच्या शेतकऱ्यांचा बळी घेणे थांबवावे. अन्यथा, आंतरराष्ट्रीय पातळीवर **शेतकरी आत्महत्या करणारा भारत** अशी भारताची ओळख निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. हे गांभीर्य सरकारने ओळखले पाहिजे.

### महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या

NCRB च्या अहवालानुसार, भारतात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेले राज्य म्हणून महाराष्ट्राची एक नवीन ओळख निर्माण झाली आहे. एकीकडे महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या एक समृद्ध राज्य म्हणून ओळखले जाते; मात्र याच राज्यात सर्वाधिक आत्महत्या होतात ही मोठी शोकांतिका आहे. हे मायबाप सरकार आणखी किती शेतकऱ्यांचा बळी घेणार आहे. गेली ७० वर्षे या सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे काम केले आहे. आज महाराष्ट्रात मागील दोन-तीन वर्षांपासून पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. मराठवाडा, विदर्भासारख्या प्रदेशात शेतकरी आत्महत्या मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे शेतीसाठी लागणारे बी-बियाणे, खते, कीटकनाशके, वीज, शेती अवजारे, शेतमजुरी यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मात्र, त्या तुलनेत शेतीमालाला हमीभाव नसल्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढवूनदेखील उत्पन्न वाढत नाही. यामुळे महाराष्ट्रात मराठवाडा व विदर्भ या भागातील शेतकरी नैराश्यात जाऊन आपली जीवनयात्रा संपवत आहे.

महाराष्ट्रात १९९५ ते २०१५ या २० वर्षांच्या कालखंडात ६९०४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे. १९९५ ते २०१५ कालावधीतील महाराष्ट्रात होणाऱ्या शेतकरी आत्महत्येचे प्रमाण २१.४८ टक्के आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हे एक भयानक वास्तव आहे. मात्र, राज्यात कोणतेही सरकार आले तरी शेतकऱ्यांच्या समस्या मात्र सोडविल्या जात नाहीत.

खालील तक्यात महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या व सरकारी मदतीस पात्र आत्महत्या याची माहिती दर्शविली आहे.

**तक्ता क्र.२: महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या व सरकारी मदत**

| विभाग | शेतकरी आत्महत्या | सरकारी मदत |
|---|---|---|
| अमरावती | ९०७ | ३७३ |
| औरंगाबाद | ७८९ | ५७१ |
| नाशिक | ४०८ | १९१ |
| नागपूर | २२६ | ९९ |
| पुणे | ८० | ४१ |
| कोकण | ०४ | ०२ |
| **एकूण** | **२४१३** | **१२७७** |

(स्त्रोत - दै.लोकमत दि.२३/११/२०१७)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रातील विभागानिहाय शेतकरी आत्महत्यामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या या अमरावती (९०७) व त्यानंतर औरंगाबाद (७८९) विभागात झाल्या तर सर्वात कमी शेतकरी आत्महत्या या कोकण विभागात (०४) झाल्या. मात्र यामध्ये एकूण झालेल्या आत्महत्यांपैकी ५० टक्के शेतकरी आत्महत्याच सरकारी मदतीस पात्र झाल्या आहेत. म्हणजे शेतकऱ्यांच्या जिवंतपणीदेखील शासन काही तरी निकष लावतेच. मात्र मेल्यानंतर त्यांच्या आत्महत्येला सरकारी मदतीस पात्र ठरण्यासाठी निकष लावून त्या आत्म्याची क्रूरचेष्टा केली जाते. जगाच्या पाठीवर फक्त भारतातच असे घडत असेल. ही आमच्या शासनासाठी मोठी शरमेची गोष्ट आहे.

**मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या**

१९४८ मध्ये मराठवाडा हा निजाम राजवटीमधून भारतात सामील झाला. निजाम राजवटीमध्ये प्रचंड दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव या परिस्थितीत तो भारतात सामील झाला. महाराष्ट्र राज्य आस्तिवात आल्यानंतर मराठवाड्याला न्याय मिळेल असे वाटले; मात्र अनेक समित्या व आयोग स्थापन करून मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, अंमलबजावणी आणि राजकीय नेतृत्वाचा अभाव यामुळे आजही मराठवाडा आपला अनुशेष भरून काढण्यासाठी संघर्ष करत आहे. २०११ जनगणनेनुसार मराठवाड्याची एकूण लोकसंख्या १ कोटी ८७ लाख ८७२ एवढी आहे. त्यापैकी ११ लाख २५ हजार ०७७ एवढी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील आहे. सातत्याने मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. मे २०१८ मध्ये मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पामध्ये फक्त १७ टक्के पाणीसाठा होता ७४६ लघुप्रकल्पात फक्त ७ टक्के पाणीसाठा होता. मराठवाड्यातील एकूण ८६७ जल प्रकल्पात फक्त १५ टक्के जलसाठा उपलब्ध होता. दरवर्षी हजारो टँकरने या भागातील लोकांची तहान भागविली जाते. कोरडवाहू शेतीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात असून गोदावरी खोरे सोडल्यास इतर भागात बागायती जमिनीचे प्रमाण कमी आहे. जून २०१८ च्या माहितीच्या आधारे मराठवाड्याची ६७३७४ शेतकऱ्यांनी अद्यापही वीज जोडणी मिळाली नाही. म्हणजे विहीर, बोर करूनही केवळ वीजजोडणी अभावी त्यांना शेतीला पाणी देता येत नाही. या सर्व समस्या असल्यामुळे विदर्भानंतर मराठवाड्यात सर्वाधिक आत्महत्या होतांना दिसून येतात. पुढील तक्त्यात मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या दर्शविल्या आहे.

**तक्ता क्र.३ : मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या**

| वर्ष | शेतकरी आत्महत्या |
|---|---|
| २००१ | ० |
| २००२ | ०९ |
| २००३ | १४ |
| २००४ | ९४ |
| २००५ | ५८ |
| २००६ | ३७८ |
| २००७ | १८९ |
| २००८ | २८५ |
| २००९ | १२४ |
| २०१० | १९१ |
| २०११ | २ |
| २०१३ | १९५ |
| २०१४ | ५७५ |
| २०१५ | ११३३ |
| २०१६ | १०५३ |
| २०१७ | ९९१ |
| जुन २०१८ | ४३३ |
| **मराठवाडा एकूण** | **६००२** |

संदर्भ : दै.महाराष्ट्र टाइम्स, दि.२० जून २०१८

वरील तक्त्यावरून असे दिसून येते, मराठवाड्यात

मागील १७-१८ वर्षांत ६००२ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविली आहे. सातत्याने दुष्काळ, नापिकी, सावकारी, बँकांची कर्जे, हमीभावाचा अभाव, शेतीसाठी लागणारे अवजारे, बी-बियाणे, कीटकनाशके इ. चा वाढता भाव या सर्व कारणामुळे मराठवाड्यातील शेतकरी मेटाकुटीस येऊन आत्महत्या करत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये ५०-६० टक्के शेतकरी मराठा समाजाचे आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील मराठा समाजाची भागात अत्यंत दयनीय झाली आहे. दुसरीकडे हा समाज विदर्भातील कुणबी समाजाप्रमाणे ओ.बी.सी. मधून आरक्षणासाठी संघर्ष करत आहे. नुकताच मराठा क्रांती मोर्चातील मराठवाड्यातील तिघांनी आपले प्राण गमावले. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेने मराठवाडा व विदर्भातील २०१४ ते २०१६ या दोन वर्षातील ३८८१ शेतकरी आत्महत्येचा सखोल अभ्यास करून काही निष्कर्ष काढले आहेत. त्यामध्ये मराठवाड्यातील प्रामुख्याने मराठा समाजाच्या आर्थिक दुर्बलतेवर प्रकाश टाकला आहे. खालील तक्त्यात मराठवाड्यातील जातीनिहाय शेतकरी आत्महत्येची आकडेवारी दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ३ : मराठवाड्यातील जातीनिहाय शेतकरी आत्महत्या (२०१४-१६)**

| जात | शेतकरी | आत्महत्या टक्केवारी % |
|---|---|---|
| मराठा | ७३७ | ५२.८३ |
| इतर | ३६४ | २६.९ |
| धनगर | १५५ | ८.१७ |
| महार | ६३ | ४.५२ |
| बंजारा | ६१ | ४.३७ |
| माळी | ३५ | २.५१ |
| कुणबी | ०४ | ०.२९ |
| जात अज्ञानत | १७ | १.२२ |

संदर्भ - दै.दिव्य मराठी, दि.२७ जुलै २०१८

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, मराठवाड्यात २०१४-२०१६ या दरम्यान झालेल्या एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी सर्वाधिक आत्महत्या या मराठा समाजातील शेतकऱ्यांनी केल्या आहे. मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यामध्ये मराठा समाजाचे प्रमाण ५२.८३ टक्के एवढे आहे.

त्यामुळेच आज मराठा समाजातील शेतकऱ्यांना आरक्षणाच्या माध्यमातून न्याय देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्याचा अनुशेष भरून काढायचा असेल तर आपणांस कृषिक्षेत्राला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल व त्यातून या शेतकरी आत्महत्या थांबू शकतील.

**शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी उपाय**

भारतातील शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने एक ठोस कृती कार्यक्रम तयार करण्याची गरज आहे. भारतात, महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने देखील हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. सध्या महाराष्ट्रात सकल मराठा समाज आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन करत आहे. हा समाज शेतकरी असल्यामुळे यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक आहे. म्हणून शासनाने त्यादृष्टीने देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी पुढील उपाय सांगता येतील.

१. डॉ.स्वामीनाथन आयोग शासनाने लागू करावा; त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात हमीभाव मिळेल. तसेच, शेती संबंधित त्यांनी अनेक शिफारशी केल्या आहे. त्या लागू केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होऊ शकतील.

२. डॉ. विजय केळकर समिती २०१३ यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोल विकासाठी मराठवाडा व विदर्भ यांचा अभ्यास करून या समितीने अहवाल दिला आहे. त्यामध्ये मराठवाडा व विदर्भातील शेतकरी

व शेती व्यवसायाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहे. त्या जर लागू केल्यास मराठवाडा व विदर्भाच्या अनुशेष भरून निघण्यास मदत होईल व त्यामुळे शेतकरी आत्महत्या थांबण्यास मदत होईल.

३. प्रामुख्याने महाराष्ट्रात कुणबी मराठा हा समाज मराठवाडा वगळता इतर विभागात जास्त प्रमाणात आहे. मात्र, मराठवाड्यात मराठा समाज आहे कुणबी मराठा यांच्यामध्ये रोटी-बेटी व्यवहार होता. मात्र मराठवाड्यातील मराठा समाजाला आरक्षण नाही व विदर्भातील कुणबीस आरक्षण मिळते म्हणून शासनाने मराठा समाजाच्या भावना विचारात घेऊन OBC च्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता एकूण आरक्षणात वाढ करून आरक्षण दिल्यास मराठा समाजला आरक्षण मिळेल. मराठवाड्यात एकूण शेतकरी आत्महत्येपैकी ५३ टक्के आत्महत्या मराठा समाजाच्या आहेत. म्हणून मराठा आरक्षण व शेतकरी आत्महत्या यांचा सहसंबंध आहे. म्हणून मराठा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असेल तर मराठा समाजाला आरक्षण द्यावे. जेणे करून त्यांच्या मुला-मुलींना शिक्षण व नोकरीत संधी मिळेल.

थोडक्यात, भारतामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या म्हणून महाराष्ट्र राज्याची ओळख महाराष्ट्र शासनाला बदलावयाची असेल तर यासाठी कृतिबद्ध कार्यक्रम तयार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव, पीककर्ज, माफक दरात बी-बियाणे, खते, अवजारे देणे आवश्यक आहे. केवळ पक्षीय राजकारण न करता या मायबाप सरकारने आमच्या बळीराजाचा आणखी बळी घेऊ नये. अन्यथा, एक दिवस आपणांस अन्नधान्य खाण्यास मिळणार नाही. भारत कृषिप्रधान देश आहे, असे लबाड बोलण्यापेक्षा आपल्या कृतीतून कृषिप्रधान अर्थव्यवस्थेसाठी ठोस पावले उचलावी; अन्यथा एक दिवस हा बळीराजा रस्त्यावर उतरला तर शासनासमोरील समस्या वाढतील. त्यामुळे शेतकरी आत्महत्या हा विषय गांभीर्याने हाताळून त्याचे राजकारण न करता हा प्रश्न सोडविला पाहीजे.

**संदर्भ सूची**


१. भुसारे दीपक 'मराठवाड्यातील दुष्काळाचे दुसचक्र' यामधील लेख चिन्मय प्रकाश, औरंगाबाद, २०१५.

२. धारीया मोहन, शेतकऱ्यांच्या आत्महत्या माझी भूमिका, साधना, ४ ऑक्टोबर २००८.

३. ढोबळे विष्णू, 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका', सुगावा प्रकाश, पुणे.

४. जाधव नरेंद्र, 'शेतकरी आत्महत्या आणि कृषी पुढील आव्हाने' साधना साप्ताहिक, ४ ऑक्टोबर २००८.

५. केळकर विजय समितीचा अहवाल २०१३.

६. साईनाथ पी. 'द हिंदू'मधील शेतकरी आत्महत्येवरील लेख.

७. सत्यशोधक एल्गार मासिक जानेवारी २०११चा कृषी विशेषांक.

८. दै.लोकमत दि.२३/११/२०१७, २७/०५/१८ आणि ०५/०६/१८

९. दै.दिव्य मराठी दि.२७ जुलै २०१८.

१०. Accidental Deaths & Suicides in India, Report 2012, 2013, 2014, & 2015.

National Crime Records Bureau (NCRB) Ministry of Home Affairs.


◆

# महात्मा गांधींचे अर्थशास्त्र : एक अन्वयार्थ

**पुष्पा सुभाष तायडे** †
प्राचार्या
लोक महाविद्यालय, वर्धा.

**प्रस्तावना**

येत्या २ ऑक्टोबर २०१८ला महात्मा गांधीजींची १५० वी जयंती संपूर्ण भारतात साजरी झाली. त्या निमित्ताने 'महात्मा गांधींचे अर्थशास्त्र : एक अन्वयार्थ' या विषयावर हा लेख प्रस्तुत करीत आहे. महात्मा गांधींचे आर्थिक विचार आजही देशासाठी उपयुक्तच आहेत. या लेखात खादी उद्योग, उद्योगाचे विकेंद्रीकरण, यंत्राचा उपयोग, स्वयंपूर्ण किंवा आदर्श खेडी, विश्वस्ताची संकल्पना, भाकरीसाठी श्रम संकल्पना, अन्नधान्याचा प्रश्न, लोकसंख्या, दारूबंदी, श्रम कल्याण, अपरिग्रह/मर्यादित गरजा या मुद्द्यांच्या बाबतीत महात्मा गांधींचे विचार थोडक्यात स्पष्ट केले आहेत.

**१) खादी उद्योग**

प्रत्येक भारतीयाला प्रत्येक वर्षाला जवळपास १३ यार्ड म्हणजे १२ मीटर लांब कापड लागते. गांधीजी म्हणतात, 'कापड गिरण्या वाढविल्या म्हणजे कापड पुरवठ्याचा प्रश्न सुटेल असे नाही,' म्हणून त्यांनी खादी उद्योगाच्या विकासावर भर दिला. २२ सप्टें.१९२५ ला त्यांनी 'अखिल भारतीय चरखा संघाची' स्थापना केली. गांधीजी म्हणत, खादी हे एकतेचे, मानवतेचे, आर्थिक स्वातंत्र्याचे आणि समानतेचे प्रतीक आहे. खादी म्हणजे उत्पादन वितरणाचे विकेंद्रीकरण होय. गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर त्यांनी खादी चळवळ सुरू केली. त्यांना विश्वास वाटत होता की, खादी उद्योग हा भारतातील कोट्यावधी लोकांना उपासमारीपासून वाचवू शकेल आणि गरिबांना यापासून पूरक उत्पन्न मिळेल. त्यामुळेच त्यांनी चरख्यावर सूत कातण्याचा सल्ला नेहमीच दिला. एकतर चरखा खरेदी करण्याला फारच कमी पैसा लागत होता. तो वापरायला सोपा होता आणि स्थिर उत्पन्नाचा स्त्रोत होता. चरख्यावर काम करताना कोणत्याही मोसमाचा त्यावर परिणाम होत नाही. चरखा हा बेरोजगारीचा प्रश्न सोडवतो, ते अहिंसेचे प्रतिक आहे. त्या काळात गांधीजी म्हणायचे, ''लेंगे स्वराज्य लेंगे, चरखा चला चला के।''

खादी उद्योगाच्या विकासाच्या योजनेत गांधीजींना जे अभिप्रेत होते ते पुढे स्पष्ट केले आहे.

अ) सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सूत कातणे आवश्यक करणे.

ब) ज्या भागात कापूस उत्पादन केले जात नाही त्या भागात कापूस पेरावा.

† आजीव सभासद क्र. : ५७६, भ्रमणध्वनी : ९४२३११९२२१, ई-मेल : pushpa_lmv@rediffmail.com

क) कापड विणायचे काम बहुउद्देशिय सहकारी संस्थांमार्फत करावे.

ड) सर्व कामगारांनी म्हणजे शिक्षण विभाग, सहकार, नगरपालिका, जिल्हा मंडळे आणि पंचायतीमधील कर्मचाऱ्यांनी सूतकताईची परीक्षा पास केलेली असावी. अन्यथा त्यांना अपात्र ठरविण्यात यावे.

इ) हातमागावर विणलेल्या कापडाच्या किमती मिलच्या कापडापेक्षा नियंत्रित व कमी असाव्यात.

फ) ज्या भागात हातमागावर विणलेले कापड तसेच पडून राहते, त्याला मागणी नसते व मिलचे कापड खरेदी केले जाते. त्या भागात मिलच्या कापडावर बंदी आणावी.

ग) सर्व सरकारी कार्यालयात कापड आणि विणकाम उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी हातांनी विणलेल्या कापडाचा उपयोग करावा.

ह) जुन्या कापड गिरण्यांचा विस्तार करण्यास व नवीन कापड गिरण्या स्थापन करण्यास परवाने देऊ नये.

य) कापड आयातीला बंदी करावी.

या सर्व उपाययोजना केल्यास खादी उद्योगाची भरभराट होईल.

**२) विकेंद्रीकरण**

गांधीजी हे मोठ्या उद्योगाच्या बाजूचे नव्हते, तर विकेंद्रित अर्थव्यवस्थेला मान्यता देणारे होते. केंद्रित अर्थव्यवस्थेतून अनेक सामाजिक, आर्थिक विषमतेच्या घटना घडतात. मोठ्या उद्योगांमुळे एकाधिकारशाही निर्माण होते असे त्यांचे मत होते. विकेंद्रित अर्थव्यवस्थेत श्रमिकांचे शोषण होत नाही, यावर गांधींचा विश्वास होता. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला तर ही अर्थव्यवस्था श्रमसधन अर्थव्यवस्था असून त्यात भांडवलाची कमतरता आहे. तेव्हा भारतात श्रमाचा उपयोग जास्तीत जास्त होईल, अशाच तंत्रज्ञानाचा अवलंब करायला पाहिजे. म्हणूनच गांधीजींनी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा सल्ला दिला. विकेंद्रित अर्थव्यवस्था म्हणजे छोट्या प्रमाणावर उत्पादन करणारे असंख्य उद्योग सर्वत्र विखुरलेले असावेत व छोटे उद्योग स्थानियीकरणातून उभारले जावेत. ज्या भागात ज्या उद्योगासाठी कच्चा माल भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे, तेच उद्योग त्या भागात विकसित व्हावेत.

लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आणि अहिंसेचे राज्य अस्तित्वात येण्यासाठी विकेंद्रीकरण आवश्यक आहे. गांधीजींनी मोठ्या उद्योगामुळे संपत्तीचे केंद्रीकरण होत असल्यामुळे लहान उद्योगांवर भर दिला. त्यांच्या मते, उत्पादन हे खेड्यातील घराघरांमधून व्हायला पाहिजे. ग्रामीण भागात असे उद्योगधंदे विकसित झाल्यास ग्रामीण भागात रोजगार वाढेल व वस्तूचा उत्पादन खर्चसुद्धा कमी होईल. शिवाय उद्योगाच्या उभारणीसाठी वेगळी जागा लागणार नाही. कमीत कमी भांडवल व छोटी यंत्रे लागतील. माल साठविण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही व वाहतुकीचा खर्चसुद्धा कमी होईल. अति उत्पादन होणार नाही. स्पर्धादेखील निर्माण होणार नाही. हे सर्व घटक लहान प्रमाणावरील उत्पादनाने शक्य होतील. ग्रामीण व लघु उद्योगांच्या माध्यमाने उद्योग व्यवसायाचे विकेंद्रीकरण होईल. शिवाय यामुळे शेतकऱ्यांनादेखील त्यांच्या फावल्या वेळेत उत्पादन प्रक्रियेत समाविष्ट होऊन उत्पन्न वाढविता येईल. अन्यथा, त्यांची वेळ व शक्ती वाया जाईल. हे उद्योग ग्रामीण जीवनाशी निगडित असल्यामुळे ग्रामीण स्तरावरील गरजा पूर्ण करण्यासाठी नव्हे; तर दारिद्र्य आणि बेरोजगारी संपुष्टात आणण्यासाठी कार्य करू शकतात. पण त्यासाठी त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्याची गरज असते.

या उलट उत्पादनाचे केंद्रीकरण झाले तर ग्राहकांची वाढ मोठ्या प्रमाणावर होईल. रोजगार मिळविण्यासाठी

ग्रामीण भागातील लोक शहराकडे येतील. शहरांची लोकसंख्या वाढेल. त्यातून अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण होतील. लोकांना राहण्यासाठी घरे उपलब्ध होणार नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्यांची वाढ होईल. शहराची लोकसंख्या वाढेल. लोकसंख्या वाढल्याने आरोग्य, पाणी पुरवठा, शिक्षण आदी सोयीसुविधांवर मोठा ताण पडेल. शहराच्या वाढीमुळे प्रदूषण, हिंसा, अत्याचार यासारख्या अनेक समस्या मोठ्या प्रमाणात वाढतील. त्यामुळे गांधींचा मोठ्या उद्योगांना विरोध होता.

### ३) यंत्राचा उपयोग

गांधीजींच्या मते, यंत्राचा उपयोग हे मोठे दुष्कृत्य होय. आधुनिक तंत्रज्ञान हे मानवी नैराश्याचे, हिंसेचे आणि युद्धाचे कारण होय आणि त्यामुळे मानवी गरजा सतत वाढत जातात. या यंत्रांच्या उपयोगामुळे श्रीमंत लोकांचा वर्ग निर्माण होतो आणि संपत्तीचे विषम वितरण होते. गांधीजी हे यंत्राच्या विरोधात नव्हते. त्यातून निर्माण होणाऱ्या विषमतेच्या विरोधात होते. त्यांच्या मते, चरखा हे देखील एक यंत्र आहे. माणसे मोठ्या यंत्राचा उपयोग करतात तेव्हा श्रम वाचवितात. जेव्हा की भारतात असंख्य लोक बेरोजगार असून रस्त्यावर उपासमारीने तडफडत आहेत. त्यामुळे अशा विघातक यंत्राच्या ते विरुद्ध होते. परंतु, कुटीर उद्योगात वापरल्या जाणाऱ्या यंत्रामुळे जर श्रमिकांचे श्रम वाचत असतील तर अशा यंत्राचे त्यांनी स्वागतच केले आहे.

ज्या वस्तूचे उत्पादन खेड्यातील जनता कोणत्याही त्रासाशिवाय करू शकते, अशा वस्तूचे मोठ्या यंत्रांनी मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्याला गांधीजींचा विरोध होता. ते म्हणतात, ''यांत्रिकीकरण तेव्हाच चांगले असते जेव्हा काम करणारे हात खूप कमी असतील व कुटीर उद्योगातील श्रमिकांचे श्रम वाचत असतील अन्यथा यांत्रिकीकरणाचे तोटेच होतात. हरिजन साप्ताहिकात गांधीजी लिहितात,'' मी जर संपूर्ण देशाच्या गरजा ३० कोटी लोकांऐवजी ३०००० लोकांच्याद्वारे पूर्ण करू शकत असेल तर ३० कोटी लोक आळशी आणि बेरोजगार राहतील, त्याचे काहीच वाटून घेऊ नये काय?''

गांधीजी साधने आणि तंत्रज्ञान यासंबंधी जागरूक होते. त्यामुळेच त्यांनी श्रमसधन तंत्राचा वापर करण्यावर भर दिला. ही संकल्पना आजही भारताला लागू होणारी आहे.

### ४) आदर्श खेडे अथवा स्वयंपूर्ण खेडे/ग्राम सर्वोदय

गांधीजींनी ग्राम सर्वोदयाची संकल्पना मांडली. उत्पादन आणि त्यांचे वितरण व उपभोग हे चक्र अशा प्रकारे चालेल की तेथे दारिद्र्याचे दुष्टचक्र अस्तित्वातच नसेल. जे काही उत्पादित होईल, त्याचा ताबडतोब उपयोग केला जाईल आणि स्थानिक बाजारातच त्याची विक्री होईल. फार लांबच्या बाजारात नेण्याची गरज पडणार नाही. समाजाची संपूर्ण रचनाच अहिंसेच्या तत्त्वावर चालेल. गांधीजींच्या संकल्पनेमध्ये अशा ग्रामीण संरचनेचे चित्र होते की, ज्यामध्ये कृषी प्रगत झालेली असेल, उद्योगाचे विकेंद्रीकरण झालेले असेल. छोट्या प्रमाणावर सहकारी संस्था असतील. त्यांच्या मते, खरा भारत हा भारतातील खेड्यातच आढळतो. त्यांचे स्वप्न होते की, भारतातील प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण खेड्यामध्ये बदलावे. या स्वयंपूर्ण खेड्याचे वैशिष्ट्य खालीलप्रमाणे होते.

१. प्रत्येक खेड्याची सीमारेषा निश्चित असावी. खेड्यात जनतेच्या सुरक्षेसाठी संरक्षक असावा.

२. खेड्यात फळांची झाडे असावी. खेड्यात उत्पन्न देणारी पिके घेतली जावीत.

३. प्रत्येक खेड्यात धर्मशाळा आणि छोटा दवाखाना असावा.

४. खेडे हे अन्नधान्य आणि कापडाच्या बाबतीत स्वयंपूर्ण असावे.

५. रस्ते आणि गल्ल्या स्वच्छ असाव्या. वाहतूक दळणवळण साधने विकसित व्हावीत.

६. मंदिर देवस्थान सुंदर आणि स्वच्छ असावीत.

७. सांडपाण्यासाठी नाले असावेत. सांडपाण्याचा निचरा योग्य व्हावा.

८. खेडे हे जंगली श्वापदांपासून सुरक्षित असावे.

९. खेड्यात एक मोठा हॉल, शाळा आणि करमणुकीचे केंद्र असावे.

१०. खेड्यात पुरेसा आणि स्वच्छ पाणी पुरवठा असावा.

११. खेड्यात खेळासाठी मैदान व गुरांसाठी गोठा असावा.

१२. मूलभूत शिक्षण सक्तीचे केले जावे.

१३. ग्रामीण आर्थिक व्यवहार हे सहकाराच्या तत्त्वावर केले जावेत.

१४. पंचायतीच्या हाती ग्रामीण व्यवस्थापन असावे. त्यामध्ये पाच सदस्य असावे व ते ज्येष्ठ व अनुभवी असावेत. त्यांना जनतेने निवडून दिलेले असावे. ह्या पंचायतीकडे न्यायदानाचे कार्य सोपवावे व त्यांना ते अधिकार द्यावेत.

१५. जाती व्यवस्था नसावी. अशा पद्धतीने स्वयंपूर्ण खेडी असावीत. गांधीजींना वाटत होते की, अशा पद्धतीने खेडी आदर्श बनवावीत. पण त्यांना हे देखील माहिती होते की ही गोष्ट इतकी सोपी नाही. म्हणून त्यांनी ग्रामीण उद्योगावर भर दिला.

**विश्वस्ताची संकल्पना**

गांधीजींच्या मते, भांडवलदार ज्यांनी अतिरिक्त पैसा गोळा केला ते शोषक होत. एखाद्या व्यक्तीने व्यापार आणि उद्योगाच्या माध्यमाने खूप पैसा कमविला म्हणजे तो त्याचा झाला असे नव्हे. तो संपूर्ण समाजाचा पैसा होय व समाजाच्या कल्याणासाठी तो खर्च व्हायला पाहिजे. त्यांना हिंसा आणि रक्तपाताने क्रांती नको होती तर आर्थिक समतेद्वारे शाश्वत स्थैर्य पाहिजे होते. त्यांना भांडवलदार हे त्यांच्या संपत्तीचे विश्वस्त आहेत हे अपेक्षित होते. सर्व सार्वजनिक संपत्ती ही गरीब किंवा श्रीमंत सर्व लोकांसाठी आहे. भांडवलदारांनी विश्वस्त म्हणून त्यांची स्वत:ची त्यासोबत इतरांची देखील काळजी घ्यावी. कामगारांनी भांडवलदारांना आपले लाभ कर्ते या नात्याने त्यांच्यावर विश्वास ठेवावा. अशा रीतीने एकमेकांवर विश्वास ठेवल्याने याच्या माध्यमातून आदर्श आर्थिक समानता प्रस्थापित होऊ शकते. विश्वस्ताच्या संकल्पनेत खालील बाबी समाविष्ट असाव्यात.

१) विश्वस्त वर्तमान भांडवलदारांचे रूपांतर समाजाच्या गरजेनुसार साधन पुरवणाऱ्या व्यक्तींमध्ये करते. यामुळे चार भांडवलदारांचे एकीकरण न होता संपत्ती धारकांमध्ये स्वयंस्फूर्तीने सुधारणा करण्याची संधी उपलब्ध होते. हे ह्या विश्वासावर आधारित आहे की मानवी स्वभाव हा पैसे देऊन सुटका करून घेण्याच्या मन:स्थितीपासून वेगळा आहे.

२) विश्वस्ताच्या कल्पनेत खाजगी मालकीच्या संपत्तीचा अधिकार मान्य नाही. मात्र स्वत:च्या आवश्यकतेसाठी समाजाने दिलेल्या परवानगी एवढी मालमत्ता त्याला ठेवता येते.

३) विश्वस्ताची संकल्पना ही संपत्तीचा मालकी हक्क व त्याचा उपयोग यासंबधीच्या कायद्याच्या बाहेरची गोष्ट आहे.

४) अशा पद्धतीने राज्य नियंत्रित विश्वस्ताच्या संकल्पनेत वैयक्तिक संपत्ती धारण करणे व त्याचा

उपयोग स्वत:च्याच समाधानासाठी, सुखासाठी करणे किंवा समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करणे हे येत नाही.

५) यामध्ये प्रत्येकाला किमान जीवन निर्वाहाइतकी मजुरी मिळावी, त्याची मर्यादा कमीत कमी उत्पन्नाची असावी. यालाच समाज मान्यता दिली जाऊ शकते. अधिकतम उत्पन्न व किमान उत्पन्न यातील फरक हा कमीत कमी असावा व समानतेकडे नेणारा असावा. तसेच, समाजाच्या गरजेनुसार वेळोवेळी त्यात बदलाची प्रवृत्ती असावी व विषमतेची दरी कमी करणारी असावी.

६) गांधीच्या अर्थशास्त्रानुसार उत्पादनाचे प्रमाण हे समाजाच्या गरजेनुसार ठरवित जावे. वैयक्तिक निर्णयावर आधारित नसावे.

### भाकरीसाठी श्रमाची संकल्पना

शरीरश्रम हे 'ब्रेड-लेबर' या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. 'ब्रेड-लेबर' चे शब्दश: भाषांतर भाकरीसाठी मेहनत. भाकरीसाठी प्रत्येक माणसाने मेहनत केलीच पाहिजे, शरीरश्रम केले पाहिजे, असा ईश्वरी नियम आहे. या सिद्धांताचा मूळ शोध टॉलस्टॉयचा नव्हे; तर टॉलस्टॉयहून बऱ्याच अप्रसिद्ध अशा बुर्नोह नावाच्या रशियन लेखकाचा आहे. टॉलस्टॉयने त्याला प्रसिद्धी देऊन आपलासा केला. गांधीजींच्या नजरेला हाच सिद्धांत भगवद्‌गीतेच्या तिसऱ्या अध्यायात दिसून येतो. यज्ञ केल्याखेरीज जो खातो तो चोरीचे अन्न खातो, अशा तऱ्हेचा भयंकर शाप यज्ञ न करणाऱ्याला दिलेला आहे. या ठिकाणी यज्ञ याचा अर्थ शरीरश्रम किंवा भाकरीसाठी-श्रम हाच योग्य दिसतो. माझ्या मते, तर हाच एक अर्थ शक्य आहे. ते कसेही असो हाच आपल्या या व्रताचा उगम होय. बुद्धिवादानेही आपण या सिद्धांताशी येऊन पोहोचतो. मेहनत करीत नाही त्याला खाण्याचा हक्कच काय? बायबल सांगते, 'तू आपली भाकरी स्वत:च्या अंगातून घाम काढून कमव व खा.' कोट्याधीशसुद्धा जर आपल्या पलंगावर लोळतच राहिला, आणि तोंडात कोणी आणून घालील तेव्हाच खात गेला, तर त्याला फार काळ खाता यायचे नाही, त्याला अन्नाची गोडीही वाटणार नाही. म्हणून तो व्यायाम वगैरे करून भूक लागेल असे करतो; आणि खाण्यासाठी तर त्याला स्वत:चेच हात-तोंड हलवावे लागते. जर अशा तऱ्हेने या नाही तर त्या रूपाने शारीरिक व्यायाम राव व रंक सर्वांनाच करावा लागतो, तर मग भाकरी उत्पन्न करण्याचाच व्यायाम सर्वांनी का करू नये, असा प्रश्न सहजच उद्‌भवतो. हा नियम हे स्पष्ट करतो की, प्रत्येक माणसाने आपली भाकरी आपल्या श्रमातून मिळवावी. गांधीजींचा श्रमभाकरीचा नियम हा कृषिशी निगडित होता. परंतु प्रत्येकजण काही शेती करू शकत नाही. तेव्हा त्याने त्याची भाकरी काही अन्य काम करून मिळवावी. जर सर्व लोक त्यांच्या भाकरीसाठी श्रम करतील तर सर्वांसाठी पुरेसे अन्न व कापड उपलब्ध होईल. ते निरोगी व सुखी होतील आणि अन्नधान्य टंचाईचा प्रश्नच राहणार नाही. रोगराई, दारिद्र्य, दु:ख राहणार नाही. त्यांचा दृढ विश्वास होता की, शारीरिक श्रमाशिवाय कोणालाही भोजन मिळू नये. त्यांनी हा देखील सल्ला दिला की, श्रीमंत लोकांनीदेखील शारीरिक श्रम केल्याशिवाय जेवण घेऊ नये.

### अन्नधान्याचा प्रश्न

गांधीजींनी त्यांच्या जीवनात १९४३-४४ मध्ये दुष्काळाची स्थिती पाहिली. बंगाल राज्यात मोठ्या प्रमाणात धान्य टंचाई निर्माण झाली होती. त्यांच्या मते, ही धान्याची टंचाई कृत्रिमरित्या निर्माण केली होती. परंतु जेव्हा त्यांनी मद्रास, बंगाल, आसाम भागाला भेट दिली तेव्हा ते ह्या निष्कर्षावर आले की, ही अन्नधान्य टंचाई ही कृत्रिम नसून वास्तविक आहे. त्यांनी भारतातील ह्या अन्नटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी

खालील उपाययोजना सांगितल्या.

१) प्रत्येक व्यक्तीने आपली धान्याची गरज कमीत कमी करावी आणि शक्य झाल्यास धान्याचा व कडधान्याच्या डाळीचा उपयोग कमी करावा. त्याऐवजी भाजी, दूध, फळे इ.चा वापर करावा.

२) प्रत्येक फुलबागेचा उपयोग लागवडीसाठी करावा.

३) धान्य, कडधान्य आणि डाळी यांचा उपयोग सैनिकांनी स्वत: कमी करावा.

४) काळा बाजार थांबवावा.

५) शासनाने विहिरी खोदाव्यात म्हणजे ओलिताची सोय पुरविता येईल.

६) तेलबिया व तेलाचे उत्पादन साधने यांची निर्यात थांबवावी.

गांधीजी हे अन्न नियंत्रणाच्या विरोधात होते. कारण, त्यांना वाटत होते की, हे कृत्रिम टंचाईनेच ही स्थिती निर्माण झाली नसून लोकांची इतरांवर अवलंबिता वाढल्याने सुद्धा निर्माण झाली. लहान मुले जशी चमच्याने अन्न खाऊ घातले तर खातात तशी लोकांची स्थिती झाली. त्यामुळे त्यांनी नोव्हेंबर १९४७ मध्ये भारत सरकारला धान्य नियंत्रण काढून टाकण्यास सांगितले.

## लोकसंख्येविषयीचे विचार

सर्वात मोठा प्रश्न ज्याकडे गांधीजींचे लक्ष गेले ते म्हणजे झपाट्याने वाढणारी लोकसंख्या होय. गांधीजींनी गर्भनिरोधक साधनांचा उपयोग करण्यास विरोध केला. त्यांच्या मते, याचा उपयोग केल्याने भारतातील मध्यम वर्गातील पुरुष हे रचनात्मक कार्याचा दुरुपयोग करून अशक्त होतील. गांधीजी हे स्वत:वर नियंत्रण ठेवून जन्मदर नियंत्रित करण्याच्या विचाराचे होते. म्हणून त्यांनी कृत्रिम साधनाचा उपयोग करण्याऐवजी ब्रह्मचर्यावर भर दिला. त्यांनी स्वनियंत्रणला खात्रीचा श्रेष्ठ उपाय मानले. त्यांना स्त्री-पुरुषांच्या मनोविकाराचा प्रसार करण्याची गरज वाटली. त्यांनी अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी जन्मदरावर नियंत्रण ठेवण्याचा उपाय सांगणाऱ्यावर टीका केली. ते म्हणतात, माझ्या मते जर जमिनीचा कृषीसाठी चांगला उपयोग केला गेला आणि पूरक उद्योग विकसित केले तर हा देश आज जी लोकसंख्या आहे त्याच्या दुप्पट लोकसंख्येलादेखील चांगले जीवनमान देऊ शकते, अशी स्थिती आहे. गांधीजी हे स्त्रियांच्या गर्भप्रतिबंधक शस्त्रक्रियेच्या विरोधात होते. त्यांच्या मते हे अमानवीय आहे. परंतु ते पुरुष नसबंदीच्या विरोधात नव्हते. त्यांच्या मते, जे पुरुष दुर्धर रोगाने पिडीत आहेत. त्यांनी शस्त्रक्रिया करून घ्यावी कारण त्यांच्या मते पुरुष हेच अधिक आक्रमक असतात.

## दारूबंदीसंबंधी विचार

गांधीजींच्या मते चहा, कॉफी, तंबाखू व अल्कोहोल हे व्यक्तीच्या मानसिक, भौतिक आणि नैतिक विकासासाठी हानीकारक आहे. त्यांच्या मते, दारू पिणे हा एक रोग आहे. वैद्यकीय सल्ल्यानुसार दारूचा उपयोग करणाऱ्यांच्या विरोधात गांधीजी नव्हते. भारतात हजारो दारूड्या व्यक्ती असण्यापेक्षा दारिद्र्य निर्मूलन होणे याला त्यांनी पसंती दिली.

त्यांच्या एका लेखात त्यांनी लिहिले आहे की, जर त्यांना भारताचा हुकूमशहा म्हणून एका तासासाठी नियुक्त केले तर ते सर्वात पहिले काय करतील तर दारूची दुकाने कोणतेही नुकसान भरपाई न देता बंद करतील आणि मिल मालकांना उपहारगृह सुरू करण्यास सांगतील व त्यामध्ये कोणतीही हानी होणार नाही अशी द्रव्ये काम करणाऱ्या लोकांसाठी ठेवण्यास सांगतील. त्यांच्या मते, केवळ कायदे करून दारूबंदी

होऊ शकत नाही. त्यासाठी त्यांनी इतरही उपाययोजना सुचविल्या आहेत.

१) लोकांना शिक्षित करण्याची गरज आहे.

२) ज्यांनी कोणतीही हानी होत नाही अशी सौम्य द्रव्ये, सरबते असलेली उपहारगृहे सुरू करावीत.

३) अंमली पदार्थाच्या विक्रीपासून प्राप्त झालेले उत्पन्न हे लोकांचे दारूबंदीविषयी मत परिवर्तन करण्यासाठी खर्च करावे. दारूबंदीमुळे सरकारचे उत्पन्न घटेल आणि हे उत्पन्न घटल्यामुळे राष्ट्र निर्माण कार्यातील महत्त्वाच्या कारणांसाठी उदा. शिक्षणासाठी खर्च करणे अशक्य होईल. परंतु, गांधीजींना हे मान्य नव्हते. त्यांच्या मते, हा मोठा अडथळा दूर झाला तर इतर उत्पन्नाचे स्त्रोत सहज विकसित होऊ शकतील.

**श्रम कल्याण**

महात्मा गांधींनी आर्थिक समतेवर आपले विचार व्यक्त केले. श्रमिकांवर अन्याय होतो आणि त्यांना निम्न दर्जाची वागणूक दिली जाते. बालकांना कामगार म्हणून कामाला जुंपले जाते हे तर राष्ट्राचेच अध:पतन होय. त्यांना नेहमीच कामाचे तास कमी असावेत, त्यासोबतच कारखान्यात श्रमिकांच्या सुरक्षिततेची साधने असावीत, श्रमिकांच्या मजुरीचे दर योग्य असावेत, एकसारखे काम करणाऱ्या सर्व मजुरांचे मजुरीचे दर सारखे असावेत, असे विचार मांडले. ज्यातून श्रमिकांच्या कुटुंबाच्या अन्न, वस्त्र ह्या गरजा पूर्ण होतील इतके मजुरीचे दर असावे. श्रमिकांची स्थिती सुधारावी, यासाठी त्यांनी श्रमिकांच्या ४ ते ६ सदस्य असलेल्या कुटुंबाला चांगले मानवी जीवन जगता येईल इतकी मजुरी द्यावी, असे मत व्यक्त केले. ह्या मजुरीमधून त्याच्या स्वच्छ घर, स्वच्छ शरीर, स्वच्छ मन आणि स्वच्छ आत्मा ह्या गरजा पूर्ण होतील.

भांडवलदार आणि श्रमिक यांच्यातील संबंध सौहार्दपूर्ण असावेत. उच्च व नीच हा भेद करणे चुकीचे आहे. हा भेदभाव नष्ट झाला तर त्याचा जीवनावर सकारात्मक परिणाम होईल. श्रमिक व भांडवलदार यातील भेद नष्ट होईल, संघर्ष संपेल व त्यांचा सहकार्य काढून त्याचा उत्पादनावर चांगला परिणाम होईल.

त्यांच्या मते, भांडवलदारांनी श्रमिकांचे मालक न बनता नोकर बनावे. श्रमिकांनी आपल्या संघटना बनवाव्या. त्यांचे हक्क डावलण्यात आले तर ते संपावर जाऊ शकतात. परंतु हा संप सत्य आणि अहिंसा या तत्त्वावर आधारित असावा.

**मर्यादित गरजा /अपरिग्रह**

महात्मा गांधी हे अधिक गरजेच्या विरोधात होते. जगामध्ये विषमता व विषमतेपासून उद्‌भवणारी दु:खे आपल्याला अनुभवावी लागतात. धनाढ्य इसमाच्या घरी त्याला जरूर नसलेल्या वस्तू साठवलेल्या असतात, अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, कुजत असतात. दुसरीकडे लोक भुकेनी मरत असतात, थंडीने गारठत असतात. सर्वांनी आपल्यास जरूर तेवढाच संग्रह केला तर कोणालाच कमी पडणार नाही, व सर्वांनाच संतोष लाभेल. आज तरी दोघेही भीकेच्या मागे लागलेले आहे. कोट्याधीश असतो तो अब्जाधीश होऊ पाहतो, आणि तेवढ्यावरही त्याला संतोष वाटत नाही. कंगाल असतो तो कोट्याधीश होण्याची इच्छा करतो. कंगाल इसमाला पोटापुरते मिळाले तर तेवढ्याने त्याला संतोष झाला असेही दिसत नाही. अभ्यासाने मनुष्य आपल्या गरजा कमी करू शकतो; आणि जसजसा तो त्या कमी करीत जातो तसतसा तो सुखी, शांत व सर्व दृष्टींनी आरोग्यवान बनत असतो. साधी राहणी यासाठी जीवनात अनैतिकता, असत्य, राजकीय लाभ यांसारख्या इतर अनेक गोष्टींची आवश्यकता नाही. पाश्चात्य भौतिकवादामुळे व औद्योगिकरणामुळे मानवी गरजा

वाढतात. त्यांनी नेहमीच साधी राहणी पसंत केली. साधी राहणी व उच्च विचारसरणी यामुळे अशा जीवनासाठी आवश्यक गोष्टी सहजतेने उपलब्ध होऊ शकतात. महात्मा गांधींच्या मते, गरजा मर्यादित ठेवण्यात जो आनंद आहे तो गरजा वाढविण्यात नाही. त्यांच्या हे लक्षात आले होते की तुमचे स्वामित्व जितके कमी तितक्या तुमच्या गरजा कमी, तितके तुम्ही चांगले. या आयुष्यात स्वत:साठी खूप आनंद मिळविला की आयुष्य चांगले असे मानू नका. तुम्ही स्वत: इतरांना किती चांगली सेवा देता व त्यांना आनंद देता, त्यावर तुमचे शरीर, मन आणि आत्मा याचा आनंद अवलंबून आहे.

## स्वदेशी विनिमय अर्थव्यवस्था

''स्वदेशी हे एक सनातन तत्त्व होय. त्याची उपेक्षा केल्याने मानव जातीवर अगणित दु:खे आली. स्वदेशीचा अर्थ हा की आपल्या स्वत:च्या देशात वस्तू निर्माण करणे आणि त्या निर्माण झालेल्या वस्तू लोकांत वाटणे. सध्याच्या संकुचित स्वरूपामुळे त्याचा अर्थ असा झाला आहे की, शेतकऱ्यांच्या साहाय्याने दरसाल साठ कोटी रुपये वाचविणे म्हणून त्याचा अर्थ असाही झाला आहे. शे. ७२ लोकांना अत्यंत जरुरीचा जोडधंदा हा आहे. स्वदेशी हे एक विधायक कार्य आहे. उलटपक्षी बहिष्कार ही तात्पुरती योजना आहे आणि तिचा हेतू ब्रिटिश लोकांची आर्थिक हानी करण्याचा प्रयत्न जाणूनबुजून करून त्यांना अधिकार दान करण्यास भाग पाडणे हा आहे. म्हणून बहिष्कार हा आपला हेतू साध्य करण्यासाठी अप्रशस्त वजन वाढविण्याकरिता उपाय योजला जातो. तो सतत दीर्घकाळ आचरला गेला तरच देशातील उत्पन्न वाढण्यास अप्रत्यक्ष मदत करतो.'' गांधीजींची विनिमय अर्थव्यवस्था ही स्वदेशीवर आधारित आहे. प्रत्येक भारतीय खेडे हे स्वयंपूर्ण असावे. खेड्यातील गरजा खेड्यातच पूर्ण व्हाव्यात व खेड्यात काही वस्तू उपलब्ध न झाल्यास शेजारच्या खेड्यातून प्राप्त करून घेता येतील. ज्या व्यक्तीने स्वदेशी व्रत स्वीकारले असेल त्या व्यक्तीची पूर्ण मानसिकता असते. एखादी वस्तू त्याला मिळाली नाही तरी तो त्यामुळे अस्वस्थ होत नाही किंवा त्याला ते फार गैरसोयीचे वाटत नाही. त्या वस्तूशिवाय राहण्याची त्याची मानसिकताच तयार झालेली असते. ज्या त्याला पूर्वी फार आवश्यक वाटत होत्या, त्या वस्तूशिवाय त्याला जगता येऊ शकते हे हळूहळू तो शिकतो.

महात्मा गांधी म्हणतात, लोकांनी अशा वस्तू मिळत नाही म्हणून त्याची काळजी करू नये. कारण त्या वस्तू भारतात तयार झालेल्या नाहीत. ज्या वस्तुंची देशाच्या विकासात खरोखरच आवश्यकता आहे, त्या वस्तू इतर देशांतून खरेदी कराव्यात. उदा. परदेशातून लागणारी यंत्रे, अवजारे. परंतु, त्याची इंग्लंड आणि जपानमधून वेगळ्या प्रकारचा सुंदर कापूस घेण्याची तयारी नसावी. कारण कापडाची आयात केल्यास देशी उद्योग उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. शिवाय या उद्योगात गुंतलेल्या कोटी लोकांना त्यामुळे झटका बसेल. ज्या वस्तूची आयात केल्याने देशी उद्योगाचे नुकसान होते, अशा वस्तू त्याने आयात करू नयेत. महात्मा गांधी हे पैशाला विनिमयाचे माध्यम अशा स्वरूपात ओळखत होते. त्यांच्या कल्पनेतील ही गोष्ट १९०६ मधील आहे. तेव्हा अर्थव्यवस्थेत वस्तूचा विनिमय वस्तूद्वारे व्हायला पाहिजे. पैशाचा उपयोग हा नगण्य राहील. ते समाजातील सशक्त लोकांकडून अशक्त लोकांचे शोषण कराण्याचे साधन बनले. त्यांच्या मते, पैसा हे श्रमाइतकाच महत्त्वाचा आहे.

**संदर्भ सूची**

१) गांधी मो.क., माझ्या स्वप्नांचा भारत, अनुवाद-कानेटकर मा.ज., परंधाम प्रकाशन, २९ जानेवारी १९४८.

२) गांधी मो.क., हिंद स्वराज्य, यंत्रे, परंधाम प्रकाशन, जाने. १९९८, पृष्ठ ९७ ते १०१.

३) गांधी मो.क., मंगल प्रभात, ११ वी आवृत्ती, प्रकाशक - रणजित देसाई, ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन, पो. पवनार (वर्धा), २००४, पृ. क्र. ३१-३३.

४) जोशी यशवंत, गांधीगीता, गांधीजींचा आध्यात्मिक दृष्टिकोन, गांधीप्रणित नियोजन, मैत्रेय प्रकाशन, जून २००९, पृष्ठ क्र.६२ते ६६.

५) म. गांधीचे संकलित वाङ्मय खंड १६, प्रकाशक - संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई २६ जाने. १९६८ पृ. क्र. ५४६.

६) मंगल प्रभात, ११ वी आवृत्ती, प्रकाशक - रणजित देसाई, ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन, पो. पवनार (वर्धा), २००४, पृ. क्र. ११-१४, १९-२१, ५०-५१.

७) मुजुमदार धी., बापु की खादी, सेवाग्राम अखिल भारत चरखा संघ, १९५०.

८) ऊर्मिला शर्मा/एस.के.शर्मा, भारतीय राजनैतिक चिंतन, एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, प्रथम संस्करण, १९९७, पृष्ठ क्र.३५२.

९) विश्वप्रकाश गुप्त/मोहिनी गुप्त, महात्मा गांधी व्यक्ती और विचार, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, व्दितीय संस्करण, २००१, पृष्ठ क्र.१७७.

१०) Mandal Ravi C. The Moral And Political writings of Mahatma Gandhi, Mangalam Publications,Delhi-110053 (India).

११) www.economicsdiscussion.net/articles/economic-ideas of mahatma-gandhi/21133.

◆

जीवन विरोधाभासमुक्त कधीही नसते.

---

मी जेव्हा परदेशी चलन राखून ठेवले होते, तेव्हा एक बिलियन डॉलर्सपेक्षा जास्त नव्हते; म्हणजे दोन आठवडे आयात करता येईल एवढेच.

**- मनमोहन सिंग**

# मानव विकास निर्देशांक : कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा एक अभ्यास

**चंद्रकांत रामचंद्र जाधव** †
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

## १. प्रस्तावना

भारतीय बांधकाम उद्योग हा शेतीनंतर सर्वाधिक रोजगार पुरविणारा उद्योग आहे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात बांधकाम उद्योगाचा हिस्सा ११ टक्के आहे. मेकॅनिक ग्लोबल इन्स्टिटयूटच्या एका अहवालाप्रमाणे, पुढील दहा वर्षांत भारतीय बांधकाम क्षेत्रात ५० दशलक्ष इतका रोजगार निर्माण होण्याची क्षमता आहे. एन.एस.एस.ओ.ने २००५ मध्ये घेतलेल्या नमुना पाहणीनुसार २.५७ कोटी बांधकाम कामगार बांधकाम उद्योगात गुंतले होते. परंतु सध्या ३५० दशलक्ष पेक्षाही अधिक बांधकाम कामगार या क्षेत्रात गुंतले आहेत. सर्वसाधारणपणे अर्थशास्त्रात श्रम म्हणजे कोणतेही शारीरिक अगर बौद्धिक काम होय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात प्रगती होऊनसुद्धा श्रमिकांसाठी एक उत्तम पर्याय शोधणे, आजही शक्य झाले नाही. त्यामुळे कोणत्याही उत्पादन क्षेत्रात श्रम हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. भारतातील बहुसंख्य कामगार हे असंघटित क्षेत्रात असून शेती क्षेत्राचा त्यामध्ये प्रथम क्रमांक असून बांधकाम क्षेत्राचा त्यानंतर क्रमांक लागतो. बांधकाम क्षेत्रात गुंतलेल्या बहुसंख्य कामगारांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अकुशल कामगार हे आहे. आर्थिक मागासलेपणा तसेच आर्थिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या मागासलेले जिल्हे यामुळे अनेक बांधकाम कामगार गावांकडून शहरांकडे स्थलांतरण करीत आहेत. जिल्ह्यातील आर्थिक आपत्तींमुळे अनेक कामगार जिल्हा सोडून इतर ठिकाणी कामाच्या शोधात जात आहेत. अशा बांधकाम कामगारांना काही कौशल्य प्राप्त करून घेण्याइतपत सुद्धा त्यांची आर्थिक स्थिती नसते. बांधकाम कामगारांचे व उद्योगांचे व असंघटित स्वरूप आणि कामगारांमधील संघटनेचा अभाव असल्याचे दिसून येते. बांधकाम कामगारांच्या कामाची सतत बदलती ठिकाणे त्यामुळे त्यांच्यातील संघटितपणाचा अभाव असलेला दिसून येतो.

सध्या रस्ते आणि इमारत बांधकाम उद्योगात ३५ लाखांपेक्षाही जास्त कामगार काम करीत आहेत. सर्वसाधारणपणे बांधकाम उद्योग अनेक उद्योगांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात साहाय्य करीत असतो. उदा. सिमेंट उद्योग, स्टील उद्योग, इलेक्ट्रिकल वस्तू उद्योग, फर्निचर उद्योग, वीज निर्मिती उद्योग, पेंट उद्योग, इंटेरियर डिझायनिंग उद्योग, वाहतूक साधने इत्यादी. अलीकडे ऊर्जा आणि बांधकाम क्षेत्राला चालना देण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेचा (शहरी भागासाठी)

† आजीव सभासद क्र. : १७०९, भ्रमणध्वनी : ९८६०६६२२९०, ई-मेल : jadhavcryc@gmail.com

प्रामुख्याने समावेश होतो. या योजनेचा उद्देश शहरी भागातील २० लाख नवीन घरबांधणीसाठी आर्थिक मदत तसेच अनुदान देण्याचा आहे. तसेच मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी जाहीर केले आहे की, २०२२ पर्यंत सर्वांना घरे उपलब्ध होतील. मार्च २०१७ मध्ये 'रेरा' कायद्याची अंमलबजावणी झाल्याने अनेक लहान व मोठ्या शहरांमधील बांधकाम क्षेत्रात वेगाने वाढ होत आहे. परिणामी, वाढत्या बांधकाम उद्योगाला अधिकाधिक कामगारांची गरज निर्माण होत आहे. अवर्षण प्रवण क्षेत्र आणि दुष्काळ, नापिकी इत्यादींमुळे शेती क्षेत्रातील अनेक कामगार बांधकाम क्षेत्राकडे वळत आहेत. बांधकाम क्षेत्रात कुशल कामगारापेक्षा अकुशल कामगारांची संख्या जास्त आहे.

## २. समस्या विधान:

ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक जास्तीत जास्त काम मिळेल, या शोधात शहरीभागाकडे स्थलांतरित झाले आहेत. यामध्ये ३० टक्के भूमिहीन तर ७० टक्क्यांपेक्षा जास्त सीमांत किंवा अतिलहान शेतकरी आहेत. ५५ टक्केपेक्षा जास्त लोक अधिक आर्थिक कारणास्तव (ग्रामीण भागातील कमी उत्पन्न) आणि नैसर्गिक घटक (दुष्काळी क्षेत्र) यामुळे आपल्या निवासस्थानापासून स्थलांतर करतात. देशातील ६७ टक्के लोक गरीब आणि अशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या मूळ गावी रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. परिणामी ते शहरी भागाकडे स्थलांतर करतात. कोल्हापूर शहरातील रस्ते आणि इमारत बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. बांधकाम उद्योगात काम करणाऱ्या बहुसंख्य कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्थिरता असलेली दिसून येते. बांधकाम उद्योगाचा असंघटितपणा कामगारांच्यामधील संघटनेचा अभाव यामुळे बांधकाम कामगारांचे शोषण होते. बांधकाम क्षेत्रातील असंघटितपणा यामुळे कोणतेही निश्चित वेतनदर, असुरक्षित बांधकामाची ठिकाणे, आरोग्याच्या समस्या तसेच अनेक सरकारी योजना नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी उपलब्ध आहेत. परंतु, त्याबद्दल बांधकाम कामगार अनभिज्ञ आहेत. परिणामी, बांधकाम कामगारांना समाजात कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा मिळत नाही. म्हणूनच, कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक अभ्यासण्याची गरज आहे.

## ३. अभ्यासाचे उद्देश

सदरच्या शोधनिबंधाचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे,

१. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या आरोग्य निर्देशांकाचा अभ्यास करणे.
२. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या शिक्षण निर्देशांकाचा अभ्यास करणे.
३. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या राहणीमान निर्देशांकाचा अभ्यास करणे.
४. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक अभ्यासणे.

## ४. गृहीतक

सदरच्या शोधनिबंधासाठी खालील गृहीतक घेण्यात आले.

१. कोल्हापुरात शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक कमी झाला आहे.

## ५. संशोधन पद्धती

सदरचा शोधनिबंध वर्णनात्मक विश्लेषण अभ्यास आहे. तसेच यामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक स्त्रोतांच्या माध्यमातून अभ्यास केला गेला आहे.

## ५.१ प्राथमिक साधनसामुग्री

सदरच्या शोधनिबंधासाठी हेतुपूर्वक प्रश्नावलीच्या माध्यमातून उत्तरदायी बांधकाम कामगारांकडून प्राथमिक माहिती गोळा केली आहे. सूक्ष्म अभ्यास विश्लेषणासाठी प्राथमिक माहिती हेतूभिमुख वैयक्तिकरित्या विविध ठिकाणांना भेटी देऊन घेण्यात आली आहे. प्राथमिक माहिती संकलनाच्या कालावधीची मर्यादा २०१५-२०१६ अशी आहे.

## ५.२ दुय्यम साधनसामग्री

सदरच्या शोधनिबंधासाठी विविध प्रकारची दुय्यम साधनसामग्री विचारात घेण्यात आली आहे. त्यामध्ये विविध पुस्तके, विविध मासिके, सेमिनार आणि परिषदा मध्ये प्रकाशित झालेले शोधनिबंध त्याचबरोबर वर्तमानपत्रातील लेख, विविध सरकारी अहवाल, जनगणना अहवाल, विविध वेबसाईट्स इत्यादींचा समावेश होतो. सन २००१ ते २०१६ या कालावधीतील दुय्यम साधनसामग्री गोळा केलेली आहे.

## ५.३ नमुना निवड

सदरच्या शोधनिबंधात कोल्हापूर शहरातील इमारत व रस्ते कामगारांचा अभ्यास केला आहे. सदरच्या शोधनिबंधात बांधकाम कामगारांची हेतुपूर्वक नमुना निवड केली आहे. कारण कोल्हापूर शहरातील एकूण बांधकाम कामगारांची संख्या अचूकरित्या माहिती नसल्यामुळे हेतुभिमुख नमुना निवड केली आहे. खालील तक्त्यात संशोधन अभ्यासाच्या नमुना आकाराची निवड दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. १ : बांधकाम कामगारांच्या नमुना निवडीचा आकार**

| अ. क्र. | कामगारांचा प्रकार | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | गवंडी | १०० |
| २. | सेंट्रिंग कामगार | १०० |
| ३. | प्लंबर | १०० |
| ४. | फरशी बसविणार | १०० |
| ५. | सुतार | १०० |
| ६. | फॅब्रिकेटर (वेल्डींगचे काम करणारा कामगार) | १०० |
| ७. | वीजतंत्री | १०० |
| ८. | इंटेरियर डिझायनर कामगार | १०० |
| ९. | रंगकाम करणारा कामगार (पेंटर) | १०० |
| १०. | बिगारी / मदतनीस | १०० |
| | एकूण | १००० |

उपरोक्त सारणीमध्ये दहा प्रकारचे बांधकाम कामगार असतात. जे इमारत व रस्ते बांधकामात आपली महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

## ५.४ माहितीचे विश्लेषण

संकलित केलेली सांख्यिकीय माहिती, विविध तक्त्यांमध्ये सादर केली आहे. वर्णनात्मक सांख्यिकीय विश्लेषणामध्ये, सरासरी, किमान आणि कमाल मूल्ये, मध्य, मध्यमा यासारख्या घटकांचे विश्लेषण एस. पी. एस. एस. व एम. एस. एक्सेल या संगणकीय प्रणालीच्यामार्फत केले गेले आहे. सदरच्या संशोधन अभ्यासाच्या गृहितकांच्या चाचणीसाठी समान किंवा प्रमाण चाचणीचा वापर करण्यात आला आहे. आर्थिक स्थिती आरोग्याची स्थिती, शिक्षणाची स्थिती आणि सुधारित मानव विकास निर्देशांकांचे विश्लेषण यासारख्या संशोधनातील पैलूंशी संबंधित माहिती, विविध तक्ते व नकाशे यांच्या स्वरूपात सादर केली आहे. उत्पन्नाच्या स्थितीची गणना करण्याच्या हेतूने रुपयांमध्ये अमेरिकन डॉलरचा विनिमय दर मार्च, २०१६ पर्यंत मानला आहे.

## ६. अभ्यासाची व्याप्ती

सदरच्या शोधनिबंधाच्या अभ्यास विषयाची व्याप्ती ही कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगार आणि त्यांच्या आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती, आरोग्याची स्थिती, शिक्षणाची स्थिती आणि सुधारित मानव विकास निर्देशांकाच्या विश्लेषणा इतकी आहे.

## ७. अभ्यासाच्या मर्यादा

कोल्हापूर शहरात इमारत आणि रस्ते बांधकाम क्षेत्रात असंख्य कामगार काम करीत आहेत. सर्व प्रकारच्या बांधकाम कामगारांचा अभ्यास करणे अजिबात शक्य नाही. त्यामुळे फक्त दहा प्रकारच्या प्रातिनिधिक बांधकाम कामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक तयार करीत असताना सुधारित मानव विकास निर्देशांकांचा वापर केला आहे. तसेच, हा अभ्यास फक्त महाराष्ट्रातील कोल्हापूर शहरापुरताच मर्यादित आहे. त्याबरोबरच अभ्यासाची कालमर्यादा जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१६ या दोन वर्षांसाठीची आहे.

## ८. मानव विकास निर्देशांकाचे विश्लेषण

मानव विकास निर्देशांकामध्ये देशातील लोकांच्या कल्याणाचा स्तर मोजण्यासाठी विकासाच्या तीन निर्देशांकाचा समावेश होतो. मानव विकास निर्देशांकात आयुर्मान, शिक्षण आणि दरडोई उत्पन्नाच्या निर्देशांकाचे एक संमिश्रण आहे. ज्याचा वापर मानवी विकासाच्या चार स्तरांमध्ये जे वर्गीकरण केले जाते त्याच्या मापनासाठी होतो. ज्यामुळे मानव विकास किती झाला, याचे मापन करून स्पष्टीकरण करता येते. मानव विकास निर्देशांकात आर्थिक विकासापेक्षा सामाजिक न्याय विकास अधिक महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे विविध सामाजिक समुदायामध्ये भेदभाव कमी करता येतो. मानव विकास हा मानव विकास निर्देशांकाच्या मूल्याच्या चार भागांत वर्गीकरण केलेल्या कट ऑफ पॉईंट (Cut of Point) वर आधारित आहे. जर मानव विकास निर्देशांकाचे मूल्य ०.५५० पेक्षा कमी असेल तर कमी मानवी विकास ०.५५० ते ०.६९९ असेल तर मध्यम मानवी विकास ०.७०० ते ०.७९९ असेल तर उच्च मानवी विकास आणि ०.८०० किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर जास्त उच्च मानवी विकास असे म्हटले जाते.

## ८.१ मानव विकास निर्देशांकाचे मापन करण्याचे टप्पे -

मानव विकास निर्देशांकाचे मापन करण्यासाठी दोन टप्पे पडतात ते पुढीलप्रमाणे-

**टप्पा क्र. १ - परिमाण निर्देशांक तयार करण्याची पद्धत व समीकरण-**

$$\text{परिमाण निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

**टप्पा क्र. २ मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी परिमाण निर्देशांक एकत्रित करणे**

मानव विकास निर्देशांक = (आरोग्य निर्देशांक + शिक्षण निर्देशांक + राहणीमान निर्देशांक )$^{१/३}$

## ८.२ कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या मानव विकास निर्देशांकाचे मोजमाप करणे

### १. आरोग्य निर्देशांक

अपेक्षित आयुर्मानाच्या साहाय्याने आरोग्याचा निर्देशांक तयार केला आहे. जन्मानंतरच्या आयुष्यातील अपेक्षित कमीत कमी वर्षाचा आणि जास्तीत जास्त वर्षाचा वापर करून निर्देशांक तयार केला आहे.

$$\text{आरोग्य निर्देशांक} = \frac{३९.१-१८}{५७-१८}$$

$$= \frac{२१.१}{३९}$$

$$= ०.५४१$$

### २. शिक्षण निर्देशांक-

शालेय शिक्षणाच्या सरासरी वर्षापासून आणि शालेय शिक्षणाच्या अपेक्षित वर्षाच्या तुलनेत शिक्षण निर्देशांक मोजला जातो.

शिक्षण निर्देशांक खालील प्रमाणे मोजला जातो.

$$\text{शिक्षण निर्देशांक} = \frac{\text{शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे + शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे}}{२}$$

**अ) शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे -**

शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे म्हणजे २५ वर्षे व त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांच्या शिक्षणाच्या पूर्ण वर्षाची सरासरी संख्या.

$$\text{शालेय शिक्षणाची सरासरी वर्ष} = \frac{५-०}{९-०}$$

$$= \frac{५}{९}$$

$$= ०.५५६$$

### ब) शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे

शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे म्हणजे अशी संख्या ज्यामध्ये बालवयात शाळेत प्रवेश करणाऱ्या मुलाला शाळेच्या नोंदणीदराच्या आधारावर त्यांच्या जीवन चक्राच्या दरम्यान पूर्णवेळ आणि अर्धवेळ शालेय शिक्षणात खर्च करणे अपेक्षित असते.

$$\text{शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे} = \frac{७ - ०}{११.७ - ०}$$

$$= \frac{७}{११.७}$$

$$= ०.५९८$$

$$\text{शिक्षण निर्देशांक} = \frac{०.५५६ + ०.५९८}{२}$$

$$= \frac{१.१५४}{२}$$

$$= ०.५७७$$

### ३) राहणीमान निर्देशांक

दरडोई सकल उत्पन्न (PPP 2016$) मार्च २०१६ च्या विनिमय दरानुसार मोजले आहे.

$$\text{राहणीमान निर्देशांक} = \frac{९४९.७९ - ८८९.४९}{२३३६.८० - ८८९.४९}$$

$$= \frac{६०.३०}{१४४७.३१}$$

$$= ०.०४२$$

मानव विकास निर्देशांक हा तीन परिमाण निर्देशांकाची भौमितीक सरासरी आहे.

$$\text{मानव विकास निर्देशांक} = (०.५४१ + ०.५७७ + ०.०४२)१/३$$

**कोष्टक क्र. २**

**कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक**

| अ. क्र. | परिमाण | निर्देशक | किमान मूल्य | कमाल मूल्य | प्रत्यक्ष मूल्य | निर्देशांक | मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य | जन्मापासूनचे अपेक्षित आर्युमान (वर्षे) | १८ | ५७ | ३९.१ | ०.५४१ | |
| २. | शिक्षण | शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे | ० | ९ | ५ | ०.५५६ | |
| | | शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे | ० | ११.७ | ७ | ०.५९८ | ०.३८७ |
| | | | | | शिक्षण निर्देशांक | ०.५७७ | |
| | राहणीमान | दरडोई सकल उत्पन्न (PPP 2016) | ५९००० | १५५००० | ६३००० | ०.०४२ | |
| अमेरिकन डॉलरमधील रुपयाचे मूल्य | | | ८८९.४९$ | २३३६.८०$ | ९४९.७९$ | | |

उपरोक्त कोष्टक क्र. २ मध्ये, कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक दर्शविला आहे. उपरोक्त सारणीत जन्मापासूनचे अपेक्षित आयुर्मानाच्या साहाय्याने मोजलेला आरोग्य निर्देशांक ०.५४१ इतका आहे. आरोग्य निर्देशांक ०.५४१ हा ०.५५० पेक्षा कमी आहे. म्हणजेच असा निष्कर्ष काढता येतो की, बांधकाम कामगारांचा आरोग्य निर्देशांक कमी आहे. शिक्षण निर्देशांकाच्या संदर्भात असे आढळून येते की, जो ०.५७७ हा ०.५५० पेक्षा जास्त व ०.६९९ पेक्षा कमी आहे. त्यामुळे असा निष्कर्ष काढला जातो की, बांधकाम कामगारांचा निर्देशांक मध्यम आहे. राहणीमान निर्देशांक हा ०.०४२ आहे. जो ०.५५० पेक्षा कमी आहे, म्हणून राहणीमान निर्देशांक कमी आहे. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा एकूण मानव विकास निर्देशांक ०.३८७ हा ०.५५० पेक्षा कमी आहे. म्हणून कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा निर्देशांक कमी आहे.

**८.४ विविध प्रकारच्या बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक व्यापक विश्लेषण**

कोल्हापूर शहरातील बांधकाम क्षेत्रात दहा प्रकारचे बांधकाम कामगार काम करीत आहेत. अशा दहा प्रकारच्या बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक खालील कोष्टकात सविस्तरपणे दिलेला आहे.

**कोष्टक क्र. ३**

**कोल्हापूर शहरातील दहा प्रकारच्या बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक**

| कामगारांचा प्रकार | जन्मापासूनचे अपेक्षित आयुर्मान(वर्षे) | शालेय शिक्षणाचा सरासरी वर्षे | शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे | दरडोई सकल उत्पन्न (PPP 2016$) | मानव विकास निर्देशांक | रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| गवंडी | ०.५७६ | ०.५५६ | ०.५१३ | ०.९१७ | ०.६६७ | १ |
| फॅब्रिकेटर | ०.६६७ | ०.६५६ | ०.५९८ | ०.६८८ | ०.६६० | २ |
| वीजतंत्री | ०.६४८ | ०.६६७ | ०.५९८ | ०.५२६ | ०.६०२ | ३ |
| प्लंबर | ०.६५८ | ०.६४४ | ०.५६४ | ०.४५७ | ०.५७३ | ४ |
| फरशी बसविणारा | ०.६०० | ०.६११ | ०.३६८ | ०.५०३ | ०.५३१ | ५ |
| सुतार | ०.५८७ | ०.६११ | ०.५४७ | ०.३७७ | ०.५१४ | ६ |
| सेंट्रिंग कामगार | ०.५०१ | ०.५०० | ०.५१३ | ०.५२६ | ०.५११ | ७ |
| पेंटर | ०.५७६ | ०.४७८ | ०.४३६ | ०.३१३ | ०.४४८ | ८ |
| इंटेरिअर डिझायनर कामगार | ०.५७१ | ०.५६७ | ०.५९० | ०.१४६ | ०.४३२ | ९ |
| बिगारी/ मदतनीस | ०.५८८ | ०.४६७ | ०.४७० | ०.१८८ | ०.४१५ | १० |
| सरासरी मानव विकास निर्देशांक | | | | | ०५३६ | |

(स्त्रोत - संशोधकांनी संकलित केलेली माहिती)

उपरोक्त कोष्टक क्र. ३ मध्ये, कोल्हापूर शहरातील बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या विविध प्रकारच्या कामगारांचा मानव विकास निर्देशांक दर्शविला आहे. मानव विकास निर्देशांकात दहा प्रकारचे बांधकाम कामगार आहेत. गवंडी, फॅब्रिकेटर, वीजतंत्री आणि प्लंबर यांचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.६७६, ०.६६०, ०.६०२ आणि ०.५७३ इतका आहे. हा मानव विकास निर्देशांक ०.५५० पेक्षा जास्त तर ०.६९९ पेक्षा कमी आहे. म्हणून असा निष्कर्ष काढता येतो की, गवंडी, फॅब्रिकेटर, वीजतंत्री आणि प्लंबर यांचा मानव विकास निर्देशांक मध्यम आहे. फरशी बसविणार, सुतार, सेंट्रिंग कामगार, पेंटर, इंटेरियर डिझायनर कामगार आणि मदतनीस किंवा बिगारी यांचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.५३१, ०.५१४, ०.४४८, ०.४३२ आणि ०.४१५ इतके आहेत. हे निर्देशांक ०.५५० पेक्षा कमी आहेत. त्यामुळे यांचा मानव विकास निर्देशांक कमी आहे असे म्हटले जाते. जर एकूण सरासरी जरी पाहिली तरी ही मानव विकास निर्देशांकाचा सर्व दहा प्रकारच्या कामगारांचा कमीच असलेला दिसून येतो.

## ९. गृहीतकाची पडताळणी

कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास निर्देशांक कमी आहे.

कोष्टक क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, एकूण मानव विकास निर्देशांक ०.३८७ इतका आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या मानव विकास अहवालातील कट ऑफ पॉईंटनुसार कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांच्या मानव विकास निर्देशांकाचे मूल्य ०.५५० पेक्षा कमी आहे. त्यामुळे वरील नल गृहीतक हे स्वीकार्य आहे.

## १०. निष्कर्ष

कोल्हापूर शहरातील रस्ते आणि इमारत बांधकाम क्षेत्रात बांधकाम कामगार महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या शोधनिबंधात बांधकाम कामगारांची आर्थिक स्थिती, आरोग्य स्थिती, शिक्षणाची स्थिती आणि सुधारित मानव विकास निर्देशांक अशा विविध पैलूंचा अभ्यास केला आहे. बांधकाम कामगारांची आर्थिक परिस्थिती खूपच खराब आहे. बांधकाम कामगारांना आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. बांधकाम कामगारांचे योग्य आर्थिक व्यवस्थापन नाही म्हणून बांधकाम कामगारांची कमाई (उत्पन्न) त्यांच्या खर्चाची पूर्तता करीत नाही. बांधकाम कामगारांसाठी विविध योजना उपलब्ध आहेत. परंतु त्यांना या सरकारी योजनांची माहिती नाही. कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा एकूण मानव विकास निर्देशांक ०.३८७ इतका आहे. ०.५५० पेक्षा निर्देशांक मूल्य कमी असल्यामुळे कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा मानव विकास कमी आहे, असे निदर्शनास येते.

## ११. संदर्भ सूची

1. Banerjee Arpita and Pravat Kumar Kuri (2015), Development Disparities in India (India Studies in Business and Economics) Springer (India) Private Ltd. New Delhi.

2. Chatterji Gautam (MahaRera Reguletor), (2017), RERA Act Will brings transparency in real estate sector, The Economics Times, 27th April, 2017.

http://economictimes.indiatimes.com/articleshow/58398235.

3. Government of India, Ministry of Housing & Urban Poverty Alleviation (March, 2016) Pradhan Mantri AwasYojana, Housing for All (Urban) Scheme Guidelines.

http://mhupa.gov.in/writereaddata/HFA_guidelines_March2016-English.pdf

4. Gupta Prashant, Giupta Rajat and Netzer Thomas (2009), Building India Accelerating Infrastructure Projects McKinsey India, July 2009.

http:// www.mckinsey.com

5. Human Development Report 2016, Human Development Everyone, Published by United Nations Development Programme.

6. National Skill Development Corporation (2009), Human Resource and Skill Requirement in the Construction Material and Building Hardware Sector (2022)- A Report, New Delhi.

https://www.nsdcindia.org/sites/default/files/files/construction-matl-bldg-hardware-2009.pdf

7. Wresearch or Bg 5 Construct India (2017). Indian Construction Industry Dynamics and Growth Prospects- 2017-2018.

8. http://hdr.undp.org/sites/default/files/hdr2016_technical_notes.pdf

9. http://hdr.undp.org/en/countries/profiles/IND

◆

# ‘अ वर्ल्ड ऑफ थ्री झीरोज’

**मंजुषा मुसमाडे** †
अर्थशास्त्र विभागप्रमुख
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.

पुस्तकाचे नाव- ‘**अ वर्ल्ड ऑफ थ्री झीरोज**’
लेखक - मुहम्मद युनूस, २०१७.
हॅशेट बुक पब्लिकेशन्स इंडिया प्रा. लि. गुरगाव, भारत.
ISBN 978-93-5195-205-3. एकूण पृष्ठे - २८८

**प्रस्तावना-**

बांग्लादेशातील आपल्या ‘ग्रामीण बँक’ संकल्पनेच्या यशस्वी कार्याबद्दल २००६ मध्ये शांततेचा नोबेल पुरस्कार पटकावणाऱ्या मुहम्मद युनूस यांचे हे पुस्तक गरिबी, बेकारी आणि कार्बन उत्सर्जन या तीन महत्त्वाच्या जागतिक समस्यांचा ऊहापोह करते. युनूस यांनी हे पुस्तक नवी संस्कृती निर्माण करणाऱ्या नव्या पिढीला अर्पण केले आहे. पुस्तकात एकूण चार विभाग आहेत.

पहिला विभाग भांडवलशाहीचे अपयश आणि नव्या संस्कृतीच्या निर्माणापुढील आव्हाने आणि लेखकाच्या सामाजिक व्यवसायाचे पर्यायी अर्थशास्त्र या मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण देतो. दुसऱ्या विभागात पुस्तकाच्या शीर्षकातील तीन घटक गरिबी, बेकारी, कार्बन उत्सर्जन शून्य पातळीत आणण्याचे मार्ग; तसेच आव्हानांचे सविस्तर विश्लेषण आहे.

तिसऱ्या विभागात जगात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक महाशक्तींचे विवेचन करताना युनूस यांनी तरुण पिढी, तंत्रज्ञान आणि सुशासन व मानवी हक्क या घटकांना महत्त्व दिले आहे. चौथ्या विभागात चांगल्या भविष्यासाठी आवश्यक विधी व वित्तीय पायाभूत सुविधांची चर्चा केली आहे. अखेरीस उद्याच्या जगाचे पुनर्लेखन करण्याबाबत तपशीलवार स्पष्टीकरण आहे. पुस्तकाच्या शेवटी प्रकरणनिहाय टिपणे आणि संदर्भ आहेत.

**सविस्तर परिचय -**

युनूस यांनी आपले सर्वाधिक आयुष्य गरीबातल्या गरीब लोकांसाठी; विशेषतः स्त्रियांसाठी भरीव कार्य करण्यात व्यतीत केले आहे. १९७६ मध्ये ‘ग्रामीण बँक’ या नावीन्यपूर्ण मार्गाने त्यांनी बांग्लादेशातील गरीब स्त्रियांचे आयुष्य सुधारण्यासाठी अनोखी सुरुवात केली. त्यानंतरच्या काळात त्यांच्या ‘सूक्ष्मवित्त’ मार्गाने जगातील ३०० दशलक्षांपेक्षा जास्त गरीब लोकांच्या उद्योजकीय वृत्तीला चालना मिळाली आहे. गरिबांतील गरीब लोकांना पारंपरिक बँकिंग व्यवस्था उपयुक्त ठरू शकत नाही, त्यामुळे स्वबळावर पर्यायी व्यवस्था लोकप्रिय करण्याचे श्रेय त्यांना जाते. ते म्हणतात की, त्यांच्या जगभ्रमणात त्यांना सर्वांत श्रीमंत देशातील

† आजीव सभासद क्र. : ९३१, भ्रमणध्वनी : ९८८१३४०७२५, ई-मेल : manjushamusmade@gmail.com

अल्प उत्पन्न गटातील लोकांना याच समस्या भेडसावताना आढळल्या आहेत. त्या दृष्टीने गरीब देशातील गरीब आणि श्रीमंत देशातील गरीब यांच्या जीवनमानात फारसा फरक नसतो, असे त्यांचे म्हणणे आहे. याचे समर्थन देताना त्यांनी २०१५ चे अर्थशास्त्र नोबेल विजेते न्गस डीटन यांच्या अभिप्रायाचा उल्लेख केला आहे.

**उत्पन्नविषमता**

हा विषय ज्वलंत राजकारणाचा असल्याचे सांगून, युनूस असे नमूद करतात की, अनेक सामाजिक-राजकीय प्रयत्न होऊनही उत्पन्न विषमतेत घट झालेली नाही, तर अलीकडच्या काळात त्यात वाढच झाली आहे. त्यांच्या मते, अर्थव्यवस्थेच्या वृद्धीत वाढ होण्याबरोबरच विषमताही वाढते. सूक्ष्मवित्त चळवळीसारख्या अनेक योजनांमुळे गरिबीत घट झाली, तरी विषमता निर्मूलन घडून आलेले नाही, असेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

भांडवलशाहीमुळे विषमता वाढीला लागली आहे, या आपल्या मताच्या समर्थनार्थ ते सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांच्या 'Capital in the 21st Century' 2014 या पुस्तकाचाही हवाला देतात. मात्र, युनूस यांचे पिकेटी यांनी विषमता निर्मूलनासाठी सुचविलेल्या प्रगतशील कराच्या उपायाबाबत मतभेद आहेत. विषमता प्रणीत अर्थव्यवस्था केवळ गरिबांसाठीच नव्हे, तर श्रीमंतांसाठीही दीर्घकाळात मारक ठरते, असे त्यांचे प्रतिपादन आहे. हे टाळण्यासाठी श्रीमंत व्यक्ती/कंपन्या सामाजिक बांधिलकीच्या नावाखाली नफ्यातील काही वाटा गरिबांवर खर्च करत असल्या, तरी ते तितकेसे पुरेसे नसून, त्यासाठी व्यवस्थाबदल होणे गरजेचे असल्याचे त्यांचे ठाम मत आहे.

**वास्तव मानव** -Real Man- **संकल्पना**

युनूस म्हणतात की, अर्थशास्त्रज्ञांच्या मते, स्वार्थीपणा ही भांडवलशाही मानवाची समस्या नसून, 'गुण' आहे. भांडवलशाही मानव आणि भांडवलशाही स्त्री या दोन संकल्पनांच्या मिश्रणातून त्यांनी 'वास्तव मानव' ही संकल्पना जन्माला घातली आहे. वास्तव मानवाचे गुणधर्म पुढीलप्रमाणे - त्याला इतरांशी संबंध ठेवणे आवडते. तो कधीकधी स्वार्थी असला, तरी बहुतेक वेळा काळजी घेणारा, विश्वासू आणि नि:स्वार्थी असतो. तो केवळ आपल्या फायद्यासाठी काम करत नसून, इतरांना लाभ मिळवून देण्यासाठी, समाजाची उन्नती घडवण्यासाठी, पर्यावरण रक्षणासाठी आणि एकूणच जग अधिक आनंदी, सुंदर आणि प्रेमळ करण्यासाठी काम करतो, असे ते स्पष्ट करतात.

वास्तव मानवाच्या अस्तित्वाविषयी विश्वास प्रगट करताना युनूस असे म्हणतात की, जगात लाखो लोक अवघड कामे स्वीकारतात. उदा. - शालेय शिक्षक, समाजसेवक, नर्सेस आणि अग्निशामकदल अशा अवघड कामांचा स्वीकार करणारे लोक पर्यायी संधी नाकारून जग राहण्यायोग्य करण्यास हातभार लावतात. याचाच अर्थ असा की, नि:स्वार्थी वास्तव मानव जगात असतोच, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

याच प्रकारे बांग्लादेशातील विश्वासावर आधारित ग्रामीण बँकेचे उदाहरण त्यांनी दिले आहे. अशिक्षित, दरिद्री, अननुभवी स्त्रियांना पारंपरिक बँकेच्या दृष्टीने कर्जे देणे ही वेडगळ आणि अशक्य कल्पना होती; मात्र ग्रामीण बँकेद्वारे नऊ दशलक्ष स्त्रियांना वार्षिक २.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सची कर्जे दिली गेली आणि त्यांचा परतफेडीचा दर २०१६ मध्ये ९८.९६% आहे. याच धर्तीवर अगदी अमेरिकेतही ग्रामीण अमेरिका योजनेच्या १२ शहरांतील १९ शाखांद्वारे २०१७ मध्ये

८६,००० स्त्रियांना १००० अमेरिकन डॉलर्स आणि एकूण ६०० दशलक्ष डॉलर्सची कर्जे वितरित केली गेली असून, त्यांचा परतफेडीचा दर ९९% असल्याची रोचक माहिती त्यांनी दिली आहे. वास्तव मानवाच्या कार्याचे मोजमाप करण्यास राष्ट्रीय उत्पन्नासारखे साधन अपुरे असल्याचे सांगून, त्यासाठी नवे साधन शोधण्याची गरज ते मांडतात.

### सामाजिक व्यवसाय - Social Business - संकल्पना

प्रा. युनूस आपल्या ग्रामीण बँकेसारख्या चळवळीला सामाजिक व्यवसाय हे नाव देतात. त्यांच्या मते, 'मानवी समस्या सोडविण्यासाठी शाश्वत रीतीने कार्य करणारी बिगर-नफा संस्था' म्हणजे सामाजिक व्यवसाय होय. आर्थिक सिद्धान्तानुसार नफा आणि संपत्ती निर्माण करणाऱ्या व्यवहारालाच व्यवसाय म्हणतात; परंतु याच धर्तीवर मानवी समस्या दूर करण्याचा व्यवहार निर्मितीक्षम रीतीने केल्यास व्यवसाय होऊ शकतो, हे त्यांचे स्पष्टीकरण चिंतनीय आहे. त्यांच्या अनुकरणातून जगभरात ठिकठिकाणी आणि अगदी विद्यापीठीय पातळीवरही सामाजिक व्यवसाय संकल्पनेला मान्यता मिळाल्याबद्दल ते समाधान व्यक्त करतात.

सामाजिक व्यवसायाच्या विकासासाठी युनूस यांनी एक निधी निर्माण केला आहे आणि योग्य प्रस्ताव घेऊन येणाऱ्या तरुणांच्या प्रकल्पात ते गुंतवणूक करतात. काही कालावधीतच त्यांची गुंतवणूक परत मिळते आणि ते पुनः ती इतरत्र गुंतवतात. अशा प्रकारे युनूस हे दाखवून देतात की, सामाजिक व्यवसायात गुंतवलेला पैसा सतत कार्यरत राहतो आणि शून्य बेरोजगारीचा क्षण समीप येत जातो. पारंपरिक सिद्धान्तातील 'मानव स्वार्थी असतो' आणि 'सर्व लोक रोजगार मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतात', या दोन गृहीतकांना पर्यायी विचार मांडण्याची गरज ते विशद करतात. सामाजिक व्यवसायात गुंतवणूक केल्यामुळे इतर लोकांना आनंदी करण्याचा महाआनंद हाच नफा, असे सूत्र ते मांडतात. त्यासाठी सामाजिक व्यवसाय निधीच्या निर्मितीचा ते पुरस्कार करतात. मुंबईतील एस. के. शेलगीकर या गुंतवणूक तज्ज्ञाने प्रा. युनूस यांच्याकडून प्रेरणा घेऊन २०१० मध्ये सुरू केलेल्या 'युनूस सोशल बिझिनेस, मुंबई' या आणि भारतातील इतर अशाच उपक्रमांचीही सविस्तर माहिती त्यांनी दिलेली आहे. दुसऱ्या विभागापासून युनूस गरिबी, बेरोजगारी आणि कार्बन उत्सर्जन या तीन घटकांच्या शून्य पातळीविषयी सांगोपांग चर्चा करतात. युनूस म्हणतात की, दारिद्र्य, बेकारी आणि पर्यावरणाचा ऱ्हास या जणू काही नैसर्गिक आपत्ती असल्याप्रमाणे आपण स्वीकारल्या आहेत. परंतु, मानवी प्रयत्नांनी त्या दूर होऊ शकतात. या विवेचनात ते हरित क्रांती, अन्नधान्याच्या किमती, अर्धमुक्त व्यापार, इथेनॉलवरील अमेरिकेची अनुदाने, आधुनिक खाद्य शैलीच्या समस्या, अन्नसमस्या, कॉर्पोरेट शेती, इंधनाच्या किमती, जागतिक वित्तीय संकट इत्यादी बाबींचा आढावा घेतात.

### शून्य गरिबी

जगातील शून्य दारिद्र्यपातळी आणि आर्थिक विषमतानिर्मूलनासाठी त्यांचा भर उद्योजकता विकासावर आहे. युगांडा या पश्चिम आफ्रिकन देशाला 'सर्वाधिक उद्योजकतेचा देश' असा मान मिळाल्याची आश्चर्यकारक माहिती त्यांनी दिली आहे. उद्योजकतेसाठी कोणतीही पदवी किंवा व्यावसायिक प्रशिक्षण गरजेचे नसून, शेळीपालन, किरकोळ विक्री, हस्तकला वस्तू उत्पादन इत्यादी मार्गाने गरिबीवर मात करता येऊ शकते, हे त्यांनी केवळ सांगितलेच नाही, तर प्रत्यक्षात आणूनही दाखवले आहे.

गरिबांवर गरिबी लादली जाते आणि त्यांच्या क्षमतांना मारक ठरणारी गरिबी दूर करून त्यांना समान संधी दिली पाहिजे, असे ते म्हणतात. भावी काळात गरिबी केवळ म्युझियममध्येच अस्तित्वात असेल आणि आपली नातवंडे भूतकाळात दीर्घकाळ गरिबी टिकून राहण्याविषयी आपल्याला जाब विचारतील, असा अतिशय मार्मिक मुद्दा ते मांडतात. ज्याप्रमाणे आपण गुलामगिरी, वांशिक भेदभाव यांवर मात केली आणि मानवाने चंद्रावर जाण्यासारख्या अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी साध्य केल्या, त्याचप्रमाणे आपण निश्चय केला, तर गरिबीचेही समूळ उच्चाटन करू शकू, अशी प्रखर आशा ते प्रकट करतात.

## शून्य बेरोजगारी

रोजगार मिळवणे हेच आपल्या शिक्षणव्यवस्थेचे एकमेव उद्दिष्ट असल्याची कडाडून टीका युनुस यांनी केली आहे. आपल्या 'नोबीन उद्योक्त' कार्यक्रमाद्वारे जगाच्या पाठीवर कुठेही बेरोजगारीनिर्मूलन करता येणे शक्य असल्याचे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे. अमेरिकेसारख्या बांग्लादेशाहून पूर्णतः भिन्न स्वरूपाच्या देशात हे प्रारूप यशस्वीरीत्या राबवून त्यांनी ते सिद्धही करून दाखविलेले आहे. सार्वत्रिक उद्योजकतेचा आणखी एक फायदा युनुस असा सांगतात की, याद्वारे स्त्रियांना तंत्रज्ञान व व्यवसायाच्या वापरातून स्वेच्छापूर्वक जगणे शक्य होईल. तसेच, अखेरीस आर्थिक विकासात वाढ होईल, याचीही हमी ते देतात.

शून्य कार्बन उत्सर्जन/शाश्वततेचे अर्थशास्त्र या प्रकरणात युनुस यांनी विशेषकरून विकसित आणि विकसनशील देशांना भेडसावणाऱ्या कार्बन उत्सर्जनाच्या समस्येबाबत उहापोह केला आहे. बांग्लादेशासारख्या जगातील सर्वाधिक गरीब देशात राहून गरिबी आणि बेरोजगारीबाबत विचारमंथन करणे साहजिक आहे; परंतु कार्बन उत्सर्जनाबाबत मतप्रदर्शन करणे विसंगत वाटू शकते. युनुस यांचे यावरील स्पष्टीकरण असे आहे की, बांग्लादेशदेखील पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या दृष्टीने अतिशय धोकादायक पातळीवर आहे. त्यांच्या मते याचे कारण बांग्लादेशाची अतिरिक्त लोकसंख्या आणि सर्वाधिक लोकसंख्येची घनता हे आहे. बांग्लादेशाला भेडसावणाऱ्या प्रमुख पर्यावरणीय आपत्तीचा परामर्श घेताना युनुस यांनी हवामानबदल, नियमित पूर आणि समुद्राच्या पातळीत वाढ या बाबी उल्लेखिलेल्या आहेत. दरवर्षी पुरामुळे वाहून जाणाऱ्या पिकांमुळे शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करावी लागते आणि त्यांच्या मते, हे गरिबीचे एक प्रमुख कारण आहे.

गरीब देशांच्या विकास प्रयत्नांमुळे जागतिक प्रदुषणात वाढ होते, हा पाश्चिमात्य देशांचा समज चुकीचा आहे, असे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे. आर्थिक वृद्धी आणि पर्यावरणाचे संवर्धन हे परस्परविरोधी नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. पर्यावरण विध्वंसाची सर्वाधिक हानी गरिबांनाच पोचते, याकडेही ते आपले लक्ष वेधतात.

पारंपरिक विकासधोरणांना पर्यायी असणाऱ्या जागतिक पातळीवरील ' ब' गटाचे युनुस सदस्य आहेत. मात्र, यात कोणाही भारतीय विचारवंताचा समावेश नाही, हे कळून खेद वाटतो. हैती, युगांडा अशा आफ्रिकेतील देशांच्या पर्यावरणपूरक विकास कार्यक्रमात 'ब' गटाकडून केलेल्या प्रयत्नांची सविस्तर माहिती ते देतात.

पुढील भागात युनुस यांनी चांगल्या भविष्यासाठी सहस्रक विकास उद्दिष्टे आणि शाश्वत विकास उद्दिष्टांना पूरक मार्गदर्शक आराखडा मांडला आहे. झाडांना इजा न करता फळे खाणे आणि झाडांच्या उत्पादकतेत वाढ करून अधिकाधिक लोकांना फळे मिळणे, ही

शाश्वततेची त्यांची व्याख्या उद्‌बोधक आहे.

पुढील प्रकरणात युनूस यांनी समाजबांधणीसाठी सुशासन आणि मानवहक्कांचे महत्त्व विशद केले आहे. त्यांच्या मते, 'लोक हेच शासन आणि शासन म्हणजेच लोक', अशी आदर्श स्थिती असली पाहिजे. पायाभूत सुविधा, सार्वजनिक व खाजगी भागीदारी, नैतिक नेतृत्व, नागरी प्रकल्पांतर्गत सामाजिक व्यवसाय अशा सुशासनाच्या अनेक पैलूंची ते सविस्तर चर्चा करतात. त्यांच्या मते, वरवर पाहता हे सर्व घटक बिगर अर्थशास्त्रीय वाटत असले, तरी ते प्रत्यक्षात पूर्णतः आर्थिक स्वरूपाचे आहेत.

चौथ्या आणि अंतिम विभागात युनूस यांनी नव्या व्यवस्थेच्या निर्मितीतील उद्योजक, गृहिणी, तरुण, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते, विद्वान शिक्षक या साऱ्यांच्या भूमिकेवर जोर दिला आहे. तसेच, प्रचलित कायदेशीर आणि वित्तीय व्यवस्थेतील समस्यांचा आढावा घेऊन सुधारणाही सुचविल्या आहेत. ज्याप्रमाणे सूक्ष्मवित्त व्यवस्थेने पारंपरिक बँकिंग व्यवस्थेला नवे आव्हान दिले, त्याप्रमाणेच कायद्याच्या क्षेत्रातही नवे बदल होण्याची गरज ते विशद करतात. उदा. गरीब उद्योजकांना अडथळे आणणारे कायदे बदलणे, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रांतील नवे कायदे, व्यक्तिगत स्वातंत्र्याला प्रोत्साहक कायदे, व्हिसा, पारपत्र व्यवस्थेत सकारात्मक बदल इत्यादी.

अंतिम प्रकरणात त्यांनी ॲडम स्मिथच्या 'मॉरल सेंटीमेंट्स' पुस्तकाच्या आधारे भांडवलशाहीतील समस्यांची आणि मानवी क्षमतेची विश्लेषणात्मक चर्चा केली आहे.

**समारोप -**

डॉ. युनूस यांचा आशावाद पुस्तकात ठायी ठायी दिसून येतो. ते म्हणतात की, आपण सर्वजण आश्चर्यकारक तंत्रज्ञान, प्रचंड संपत्ती आणि अमर्यादित मानवी क्षमतांनी युक्त अशा महाशक्यतांच्या युगात जन्माला आलो असल्याने अतिशय भाग्यवान आहोत. जगातील भूक, दारिद्र्य आणि रोगराई अशा समस्यांचा अंत जवळ आला आहे, असाही दुर्दम्य आशावाद त्यांनी प्रकट केला आहे. त्यांच्या मते, मानवाचे पृथ्वी ग्रहावरील वास्तव्य केवळ जगण्यासाठीच नसून प्रतिष्ठा, सन्मान, सौंदर्य आणि आनंदासह राहण्यासाठी आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याचे कर्तव्य करण्याचा आणि लोभावर आधारित संस्कृती निर्माण करण्याऐवजी समस्त मानवी मूल्यांवर आधारित नवी संस्कृती निर्माण करण्यासाठी आजच सुरुवात करण्याचा नारा ते देतात. त्यांचा हा आशावाद वाचकांच्याही मनात उतरत जातो. तरुण विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील कार्यरत सुजाण नागरिकांच्या मनात युनूस यांचे हे लेखन आशेची नवी पहाट फुलवते, यात शंकाच नाही.

◆

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# Nudge (नज), Data Bank (डेटाबँक)

**शि. ना. माने** †
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

**नज** (Nudge)

आधुनिक मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारचा कार्यभाग विस्तारत आहे. सरकारी खर्च, उत्पन्न, वितरण व जास्त प्रगमनशील किंवा क्रमवर्धी करव्यवस्था ही या अर्थव्यवस्थेची महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये आहेत. अर्थव्यवस्था खुली असो वा मिश्र असो वा नियंत्रित, प्रत्येकीत काही क्षेत्रे अशी असतात की, तेथे सरकारला पितृत्वाची भूमिका जरूर पूर्ण करावी लागते. या पार्श्वभूमीवर हार्वर्डचे प्राध्यापक मसग्रेव्ह यांनी 'गुणवस्तू गरजा' (Merit wants) ही संज्ञा प्रथम परिचलनात आणली. गुणवस्तू या नावाने ती ओळखली जाते. पुढे मिल्टन फ्रीडमन आदी अर्थशास्त्रज्ञांनी या संज्ञेला कडवा विरोध केला. अर्थात, आज कोणत्याही अर्थव्यवस्थेत गुणवस्तू गरजांचा १०० टक्के अभाव नसतो किंवा १०० टक्के प्रभाव नसतो. परंतु, उपयोगितावादी (Utilitarianist) व पितृसदृश आर्थिक धोरण (Paternalist) यांच्यातील विरोध किंवा संघर्ष अधूनमधून उफाळून वर येतातच. जाणता किंवा अजाणता ही मतभेदाची पार्श्वभूमी लाभलेले २०१७ चे नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ रिचर्ड थेलर व अधिवक्ता केज सन्स्टीन यांचे नज : इंप्रूव्हिंग डिसिजन्स अबॉउट हेल्थ, वेल्थ अँड हॅपिनेस हे पुस्तक नुकतेच चर्चेत आले.

पुढील परिच्छेदात प्रस्तुत पुस्तकाचे सविस्तर परीक्षण करणे हा हेतू नाही; परंतु उपयोगितावाद व पितृसदृश सरकारी आर्थिक धोरण यांच्या संबंधात लेखकांच्या चिकित्सेकडे वाचकांचे लक्ष वेधून पुस्तकाच्या शीर्षकातील नज या प्रधान संज्ञेच्या मराठी पर्यायाचा शोध घेणे, एवढाच मर्यादित हेतू आहे. त्यापूर्वी एक खुलासा करणे जरुरीचे आहे. प्रस्तुत पुस्तकाचा विचार जेवढा मानवरूप वर्तनवादी आहे, तेवढाच तो धोरणाभिमुख अर्थशास्त्राच्या (Political Economy) म्हणजे सरकारी वर्तनाच्या आर्थिक धोरणाच्या कलाविषयीदेखील आहे.

प्रथम नज या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ पाहू. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशात Prod, Push gently with one's elbow, Attract attention, Make one alert and pay attention असे औपचारिक व अनौपचारिक अर्थ नोंदले आहेत. हे लोकतंत्र आहे. म्हणजे उपशीर्षकात नोंदल्याप्रमाणे लोकतंत्रात लोकांचे आरोग्य, संपत्ती व सुख यांच्या संबंधात सरकार, संस्था व संघटना यांनी सुधार करणे, लोकांना आपुलकीचा

†आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

प्रेमापोटी सुखद धक्का देणे, त्यांना सावध किंवा सजग करणे, इत्यादी. पुढील उदाहरणांच्या साहाय्याने ही संज्ञा जास्त स्पष्ट करू. ज्यांना असा धक्का द्यावयाचा, असे लोक तरी कोण आहेत? काही नमुने पुढे नोंदले आहेत. आफ्रिकेतील काही देशांत शिक्षण शुल्काविना मुले शिक्षणापासून वंचित. परंतु, वंचित मुलांचे पालक प्रतिमास शिक्षण शुल्काच्या दोनपटीपेक्षा जास्त रक्कम प्रतिमास मद्यसेवनावर खर्च करतात म्हणून मद्यपानावर; तसेच धूम्रपानावर जबर कर लावणे. अमली पदार्थ सेवन निषिद्ध ठरविणे. वैद्यकसेवा अनुदानपात्र करणे. पल्स पोलिओ इम्युनायझेशन (P.P.I.) कँपेन. भोजनापूर्वी हात स्वच्छ धुणे. बाळाला मातेचे दूध देणे. ओरल रीहायड्रेशन टॅबलेट्स (O. R. T.) देणे. हागणदारीमुक्त गाव (ग्राम स्वच्छता अभियान). भविष्यात युद्धापेक्षा मधुमेहाने होणारे मृत्यू जास्त धोकादायक असण्याची भीती जागतिक अहवालात व्यक्त होत आहे (शुगर इज मोअर डेंजरस दॅन गनपॉवडर). म्हणून साखरेच्या सेवनावर निर्बंध घालणे व साखरेला चांगला पर्याय देणे. थोडक्यात, निवडक व्यक्तींवर सक्ती करून त्यांना स्वतंत्र करण्याच्या (Men must be forced to be free) रूसोवियन पितृतुल्य धोरणाचे पुनरुज्जीवन करणे. दुसऱ्या शब्दांत, वैयक्तिक उपयोगिता निवडीची पितृसदृश आर्थिक धोरणाशी (समष्टी आर्थिक विकास धोरणाशी) तडजोड करणे.

मागे आपण नज शब्दाचा शब्दकोशातील अर्थ पाहिला. पुष्कळदा तो एकसाची असा होता. परिभाषेच्या 'अर्थवत्ता'च्या निकषाशी तो जुळत नाही. आजच्या अर्थशास्त्राचे व्यामिश्र, संग्राहक (Eclectic) व धूसर (Nebulous) स्वरूप; तसेच नज शब्दाच्या शब्दकोशातील अर्थाऐवजी त्या शब्दातील ध्वनित अर्थ ध्यानात घेऊन (उपयोगिता व पितृत्व यांचे) पुनर्मेळ धोरण (Reconciliation) असा मराठी पर्याय सुचविला आहे.

मागे आपण लोकतंत्र व्यवस्थेचा उल्लेख केला. तो ध्यानात घेतला, तर या पर्यायाच्या यशावर एक मर्यादा पडू शकते. ती म्हणजे ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोक नेहमी बरोबर असतात, हा लोकतंत्राचा अधूनमधून प्रकट होणारा कमकुवतपणाच म्हटला पाहिजे. अशा परिस्थितीत न्यायिक क्रियावादाचा (Judicial activism) एक पर्याय म्हणून जास्त क्रियावादी (More activist) सरकारचा कार्यभाग अधोरेखित होतो.

**डेटाबँक** (Databank)

आजच्या संख्यांकनीय (Digital) जगात सर्वाधिक मूल्यांकित (Valued) साधनसामग्री कोणती असेल, तर ती आहे डेटा. १८ व्या शतकातील माणसाचा गूढ काळा पेटारा (Black box) २१ व्या शतकातील शास्त्रज्ञांनी; विशेषत: जीवशास्त्रज्ञांनी सताड उघडा पाडला. आज टोयोटा खरेदी करावयाची किंवा मर्सिडीज याचा निर्णय एकटा, स्वत: ग्राहक करू शकत नाही. केला तर तो परिपूर्ण निर्णय असत नाही. त्यासाठी ग्राहकाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी गाडीशी संबंधित DNA घेण्यास समर्थ आहे. अर्थपरायण मानवाची (स्व, स्वयम व जीवात्मा) जागा जीन व संप्रेरकांनी घेतली आहे. प्रतिजैविकांना माणसासारखे/ग्राहकासारखे स्वत:चे मन नसते, स्वत:चे मत नसते. जंतुसंसर्ग बरा करणे हाच त्यांचा धर्म. हेच त्यांचे काम. भविष्यात 'goods' पेक्षा 'genes' ची स्पर्धा वाढण्याचे संकेत आहेत. डेटाइझम हा आजचा सर्वशक्तिमान धर्म संबोधला जातो. उलट, मुक्त डेटाप्रवाहाला बांध घालणे हे महापातक समजले जाते. कारण, त्यामुळे माहितीचे स्वातंत्र्य (Freedom of information) या नव्या अधिकाराला बाधा येतो,

असा डेटावाद्यांचा (Dataists) दृढ विश्वास आहे.

इतक्या प्रास्ताविकानंतर डेटाबँक संज्ञेचा अर्थ पाहू. ऑक्सफर्ड डिक्शनरी (२००२) मध्ये नोंदलेला अर्थ पुढीलप्रमाणे : A large store of data in a computer. त्याचा मराठीत अर्थ आहे : संगणित्रातील आधारसामग्रीची विशाल साठवण. या अर्थाचा अन्वयार्थ पाहण्यापूर्वी परिभाषासंबंधी दोन महत्त्वाचे निकष ध्यानात घेणे जरूर आहे.

(१) परिभाषेचा विचार करताना संबंधित शब्दांच्या पलीकडील (केवळ शब्दांतील नव्हे) त्या शब्दांची व्याप्ती ध्यानात घ्यावी लागते. ज्ञानदेवांच्या शब्दांत ''..... शब्दाची व्याप्ति तेणे पाडे, अनुभवावी.'' आणि

(२) डॉ. सॅम्युअल जॉन्सन त्यांच्या डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज (१७५५) मध्ये म्हणतात, त्याप्रमाणे (मराठी अनुवाद) कोणत्याही मातृभाषेचा जिवंतपणा कधीच परिपूर्ण नसतो. कारण, काही नवीन शब्दांचे अंकुर फुटतात, तर जुने शब्द वापरातून बाहेर पडतात. दुसऱ्या शब्दांत, भाषा किंवा परिभाषा जिवंत राहण्यासाठी जीर्ण वस्त्राच्या जागी नवे वस्त्र येते, त्याप्रमाणे अशा देवाणघेवाणी निरंतरपणे चालू राहतात.

भाषा किंवा परिभाषेसंबंधी वर नोंदलेले दोन महत्त्वाचे निकष ध्यानात घेऊन (शब्दांच्या पलीकडील व्याप्ती व भाषेचा जिवंतपणा) डेटाबँक संज्ञेचा मराठी पर्याय निश्चित करावा लागतो. तो पर्याय निवडताना संज्ञेतील रूढार्थाने 'बँक' शब्दाऐवजी 'डेटा' शब्दाच्या बाजूने झुकते वजन टाकावे लागेल; म्हणून पुढील उतरत्या पसंतीक्रमानुसार मराठी पर्याय सुचविले आहेत:

१. आधारसामग्री स्रोत

२. आधारसामग्री साठवण व्यवस्था

३. डेटाबँक

टीप : सदरच्या संज्ञेच्या चर्चेसाठी Yuval Noah Harari यांच्या Homo Deus, Penguin Random House, U. K. २०१५ या खळबळजनक पुस्तकाची भरीव मदत झाली.

◆


# मराठी अर्थशास्त्र परिषद

## सभासद व महाविद्यालय/संस्थांना आवाहन

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि यजमान महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने परिषदेच्या विविध उपक्रमांचे आयोजन वर्षभरात केले जाते. ज्यांना अशा उपक्रमांचे आयोजन आपले महाविद्यालयात करावयाचे असेल त्यांनी कार्यवाह यांचेकडे प्रस्ताव किंवा मागणी अर्ज पाठवावेत. ही परिषद आपल्या अर्थशास्त्र परिवाराची असल्यामुळे आपले सहकार्य अपेक्षित आहे. (सविस्तर माहितीसाठी कार्यवाह यांचेशी संपर्क (९४२३१३४६८६) करावा.)

**विविध उपक्रमाचे नाव**

- स्व.जमनालाल बजाज उपक्रम
- डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत व्याख्यान/चर्चासत्र
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला
- पत्रपंडित पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यान
- भारतीयार्जित नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद
- धुळे व्याख्यानमाला

**डॉ. आर.बी.भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

# मनी लाँड्रींग (Money Loundering), वेस्टेज (Wastage), मॅन्यूफॅक्चरिंग (Manufacturing)

**ज.फा.पाटील** †
माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त
मराठी अर्थशास्त्र परिषद.

या टिप्पणात आपण तीन महत्त्वाच्या आर्थिक - इंग्रजी शब्दासाठी मराठी शब्द देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

पहिला शब्द प्रयोग आहे -

**मनी लाँड्रींग (Money Loundering)**

गैर, बेकायदेशीर मार्गांनी मिळवलेला व ज्यांचा हिशोब ठेवला जात नाही. अशा पैशास चलनात काळा किंवा भ्रष्ट किंवा मलीन पैसा/चलन असे ओळखले जाते. मनी (Money) याला मराठीत पैसा, चलन तथा मुद्रा असे शब्दप्रयोग आहेत. लाँड्रिंगचा अर्थ नेहमीच्या संदर्भात मळलेले कपडे धुवून काढणे व इस्त्री करणे असा आहे. अशुद्धता, भ्रष्टता, मलीनता नष्ट करणे असा 'लाँडर' या क्रियापदाचा अर्थ होतो.

साहाजिकच आपणासमोर Money Loundering यासाठी पुढील मराठी पर्याय येतात.

अ) पैसा-शुद्धीकरण तथा चलनशुद्धीकरण तथा मुद्रा शुद्धीकरण

ब) पैसा निर्मलीकरण तथा चलन निर्मलीकरण तथा मुद्रा निर्मलीकरण

क) पैसा स्वच्छतीकरण तथा चलन स्वच्छतीकरण तथा मुद्रा स्वच्छतीकरण

ड) कायदेशीर संदर्भ घेता चलन वैधानिकरण, पैसा वैधानिकरण तथा मुद्रा वैधानिकरण

असेही पर्याय सुचतात. शेवटी शब्द किंवा शब्दगट लोकांना घटनेचा, वस्तुस्थितीचा अर्थ समजण्याशी असतो, असावा.

प्रस्तुत लेखकाच्या मते, गैर पैसा, भ्रष्ट पैसा, बिनहिशेबी पैसा म्हणजेच एका अर्थाने अशुद्ध, मलीन पैसा/चलन/मुद्रा मानता येईल. म्हणूनच Money Loundering या अर्थाने दोन स्पर्धक पर्याय निर्माण होतात.

अ) चलन निर्मलीकरण वा ब) चलन वैधानिकरण

प्रस्तुत लेखकाला 'चलन निर्मलीकरण' हा शब्द अधिक सहज व सर्वांना अधिक कळण्यासारखा आहे म्हणून

Money Loundering = चलन निर्मलीकरण
किंवा
= पैसा निर्मलीकरण
किंवा
= मुद्रा निर्मलीकरण

सामान्य वाचकासाठी 'चलन निर्मलीकरण' हा

† आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

शब्द अधिक सोपा व म्हणून योग्य वाटतो.

दुसरा शब्द आहे - **वेस्टेज (Wastage)**

मूळ शब्द/ क्रियापद- नाम या अर्थाने - घट होणे, मोडतोड, झीज, सदोष, घसारा, उत्पादन, भंगार, निर्योगी वाफ, मानवी उत्सर्ग, कचरा, इ. हे अर्थ प्राप्त होतात. सर्वच उत्पादन प्रक्रियेत वरीलपैकी एक किंवा अनेक गोष्टी स्वतंत्र वा एकत्र पद्धतीने घडत असतात. तांत्रिक कार्याने उत्पादन प्रक्रियेत, कोणत्याही आर्थिक व्यवहारात साधन सामग्रीची होणारी झीज, घट, वाया जाणे म्हणजेज वेस्टेज Wastage असा अर्थ घेता येतो. ह्या गोष्टी लक्षात घेता उत्पादन प्रक्रियेत व आर्थिक व्यवहारात साधन सामग्रीची होणारी नासधूस म्हणजेच वेस्टेज. म्हणून,

Wastage = साधनसामग्री मूल्यघट किंवा साधनसामग्री घसारा किंवा साधनसामग्री झीज असे पर्यायी शब्द मिळतात.

त्यापैकी 'साधन सामग्रीचा घसारा' असा वेस्टेजचा पर्यायी शब्द योग्य वाटतो.

तिसरा शब्द आहे- **मॅन्यूफॅक्चरिंग (Manufacturing)**

सर्वसाधारणपणे Manufacturing म्हणजे कारखानी किंवा कारखानदारी. काही वेळेस 'वस्तू निर्माण' असाही शब्द वापरला जातो. यामध्ये प्रत्यक्ष वस्तुस्वरूप मूर्त असे काहीतरी निर्माण होते. म्हणून Manufacturing यासाठी कारखानी/ कारखानदारी/ वस्तुनिर्माणी असो, मराठी शब्द योग्य वाटतात. सामान्य वाचकांसाठी परिचय व वापर सातत्य या दृष्टीने 'कारखानदारी' हा शब्द योग्य वाटतो.

◆

---

भारत अत्यंत गरीब लोकांमध्ये रहात असलेला श्रीमंत देश.

**- मनमोहन सिंग**

---

होय, मला वाटते की भारतीय अर्थव्यवस्था एक मिश्र अर्थव्यवस्था आहे आणि पाश्चात्य मानदंडानुसार आमची सार्वजनिक अर्थव्यवस्था ही बाजार अर्थव्यवस्थेपेक्षा जास्त आहे.

**- मनमोहन सिंग**

---

अर्थशास्त्र सर्वत्र आहे आणि अर्थशास्त्र समजावून घेतल्याने आपल्याला चांगले निर्णय घेण्यास आणि आनंदी जीवन जगण्यास मदत होऊ शकते.

**- मनमोहन सिंग**

---

# प्रतिक्रिया

**संतोष दास्ताने** †
माजी अध्यक्ष आणि माजी विश्वस्त
मराठी अर्थशास्त्र परिषद

महोदय,

अर्थसंवादचा एप्रिल-जून २०१८ हा अंक मिळाला. परिषदेचे विद्यमान तसेच माजी अध्यक्ष यांचे नवे लेखन आपण प्रकाशित केले हा आगळावेगळा उपक्रम आहे. लेखकांनी निरनिराळे विषय हाताळले आहेत व त्यांचा व्यासंग आणि अनुभव लेखांमध्ये प्रतीत होत आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन!

या अंकात आ. गो. पुजारी यांनी आपल्या लेखात अर्थशास्त्रात सध्या केल्या जाणाऱ्या संशोधनाबद्दल काही मते/निरीक्षणे विस्तृतपणे मांडली आहेत. नव्याने संशोधन करू पाहाणाऱ्या संशोधक उमेदवारांना त्यांनी अनेक मार्गदर्शक सूचनाही केल्या आहेत. लेखात पान ८४ वर त्यांनी ''संशोधकाने उपाय (शिफारशी) सुचवू नये'' असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. ते मात्र पटण्यासारखे नाही. त्यांच्या सूचनेने धोरणात्मक संशोधन (Normative Research) ही शाखा पूर्णपणे बाजूला सारली जाते. ते सुचवतात त्याप्रमाणे कोणतेही संशोधन वस्तुनिष्ठ, समतोल व तटस्थ असावे. पण असा अभ्यास केल्यानंतर जर त्यातून काही धोरणात्मक सूचना अथवा शिफारशी सुचत असतील आणि त्या जर समर्पक, पूर्वग्रहविरहित आणि सुसंगत असतील तर त्या मांडण्यात काहीच चूक नाही. जर एखाद्या जिल्ह्यात, प्राथमिक सांख्यिकी माहिती संकलित करून अभ्यासकाने म. गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे विश्लेषण केले व जर त्या अभ्यासाशेवटी काही सुसंगत अशा शिफारशी/सूचना केल्या तर त्याने त्या योजनेची परिणामकारकता वाढेल, योजना अधिक प्रभावी व कार्यक्षम होईल. या सूचना जिल्हाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, लोक प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांना उपयोगी पडतील असे नाही का? किंवा एखाद्या अभ्यासकाने भारत आणि आग्नेय आशियातील देशांशी असणारा विदेशी व्यापार यांचे स्वरूप, आकार, कल, दिशा, समस्या यांचा संशोधन अभ्यास केला व त्यानुसार काही शिफारशी/सूचना केल्या त्या व्यापार वृद्धीसाठी उपयोगी पडतील असे नाही का? पुजारी म्हणतात, त्याप्रमाणे संशोधन पूर्ण केल्यानंतरची पुढची तर्कशुद्ध पायरी म्हणजे सूचना/शिफारशी हे ओळखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अडचण अशी आहे की, (काही अपवाद वगळता) सध्या पाहण्यात येणाऱ्या प्रबंधांमध्ये शेवटी केलेल्या सूचना आणि मूळ संशोधन अभ्यास यांची संगती किंवा

†आजीव सभासद क्र. : ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

मेळ आढळतच नाही. त्या सूचनांचे समर्थन देण्याचे फारसे कष्टही सध्याचे संशोधन उमेदवार घेत नाहीत. अशा सूचना सरधोपट, मोघम, संदिग्ध आणि पूर्वग्रहदूषित असलेल्या आढळतात. त्याबद्दल काळजी घेतली गेली पाहिजे.

त्यांच्या लेखात त्यांनी नव्या संशोधक उमेदवारांना ज्या बहुमोल सूचना केल्या आहेत त्यात ''वाङ्मयचौर्यापासून दूर राहण्याबद्दलची जाणीव'' या सूचनेचा समावेश अत्यावश्यक होता. सध्या वेगाने पसरत गेलेल्या या रोगाची लागण लेखन-संशोधन-प्रकाशन क्षेत्रात सर्वत्र झालेली आहे. इंटरनेट, संकेतस्थळे, कट-पेस्ट तंत्रज्ञान यामुळे ही गोष्ट अगदी सोपी झाली आहे. अभ्यासकाने या अपप्रवृत्तीपासून कटाक्षाने दूर राहिले पाहिजे. असो.

पुजारी, इतर सर्व लेखक व संपादक यांचे पुन्हा अभिनंदन.

◆

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व अध्यक्षीय भाषणे

| अधिवेशन | वर्ष | अध्यक्ष | अध्यक्षीय भाषण |
|---|---|---|---|
| पहिले | १९७७-७८ | नी. वि. सोवनी | मराठीतील अर्थशास्त्रीय वाङ्मय इतिहास, परंपरा, समस्या भावी वाटचाल |
| दुसरे | १९७८-७९ | विनायक महादेव दांडेकर | भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद |
| तिसरे | १९७९-८० | श्रीधर आत्माराम देशपांडे | ग्रामीण विकासाच्या समस्या |
| चौथे | १९८०-८१ | विष्णू विनायक बोरकर | महाराष्ट्रातील आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय |
| पाचवे | १९८१-८२ | या. शि. महाजन | भारतातील सरकारी क्षेत्र : काही समस्या |
| सहावे | १९८२-८३ | आनंद नाडकर्णी | भारतीय कर व्यवस्था |
| सातवे | १९८३-८४ | स. ह. देशपांडे | मार्क्सवादी आणि सामाजिक न्याय |
| आठवे | १९८४-८५ | विठ्ठलराव बापूराव घुगे | भारतातील भाव-फुगवटा |
| नववे | १९८५-८६ | हरि कृष्ण परांजपे | भारतीय तनयोजनातील दिशा बदल इष्ट आहे का? |
| दहावे | १९८६-८७ | रवीन्द्र सदाशिव सबनीस | भारतातील पैसाविषयीचे धोरण |
| अकरावे | १९८७-८८ | गिरधर सोनाजी कल्याणकर | भारताचा परकीय व्यापार व व्यापारविषयक धोरण |
| बारावे | १९८८-८९ | नलिनी पंडित | स्त्रिया आणि आर्थिक विकास |
| तेरावे | १९८९-९० | रवीन्द्र राजाराम दोशी | महाराष्ट्रातील कृषी विपणन व्यवस्था |
| चौदावे | १९९०-९१ | श्रीनिवास विष्णू खांदेवाले | जर्मनीचे एकीकरण १९९०: युरोपचा एकच बाजार - १९९२ (२१ व्या शतकातील जागतिक आर्थिक संबंधाच्या साम्राज्यवादी पुनर्रचनेची नांदी) |
| पंधरावे | १९९१-९२ | जयकुमार फाजगौंडा पाटील | तुटीचे (अन्) अर्थकारण: भारताच्या राजकोषीय व्यवहारांचे एक विश्लेषण |
| सोळावे | १९९२-९३ | शशिकांत कृष्णराव गंधे | लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी |
| सतरावे | १९९३-९४ | व्यंकटेश सुब्रमन्य पाटणकर | भारतातील परिवहन विकास आणि धोरण |
| आठरावे | १९९४-९५ | खानसाहेब घुडूलाल पठाण | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारतीय कृषी अर्थव्यवस्था संरक्षणनीतीपासून ते उदारीकरणापर्यंत वाटचाल |
| एकोणिसावे | १९९५-९६ | शिवराम नारायण माने | भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किमतीमध्ये धोरणाभिमुख अर्थशास्त्र) |
| विसावे | १९९६-९७ | भगवान गजानन बापट | आंतरराष्ट्रीय पैसा काल, आज आणि उद्या |
| एकविसावे | १९९७-९८ | दिगंबर व्यंकटेश जहागीरदार | जागतिकीकरण, उदारीकरण आणि राज्यांची भूमिका - एक विवेचन |

| | | | |
|---|---|---|---|
| बाविसावे | १९९८-९९ | रत्नाकर पुरूषोत्तम कुरूलकर | महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल: समस्या आणि उपाय (१९७२-९३) |
| तेविसावे | १९९९-२००० | सुखदेव दामोदर तुपे | महाराष्ट्रातील साखर उद्योग : स्थिती आणि समस्या |
| चोविसावे | २०००-०१ | भालचंद्र मुणगेकर | स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र |
| पंचविसावे | २००१-०२ | अनिल रामचंद्र पडोशी | नवीन आर्थिक धोरण यशस्वी होण्यासाठी प्रथम दारिद्र्य निवारण करणे आवश्यक |
| सव्विसावे | २००२-०३ | संतोष रामचंद्र दास्ताने | उच्चशिक्षणाचे अर्थशास्त्र |
| सत्ताविसावे | २००३-०४ | सूर्यकांत हरिश्चंद्रराव जगदाळे | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र |
| अठ्ठाविसावे | २००४-०५ | मधुकर नारायणराव शिंदे | मूल्यवर्धित करप्रणाली आणि भारतीय अर्थव्यवस्था |
| एकोणतिसावे | २००५-०६ | सर्जेराव आसाराम ठोंबरे | ग्रामीण विकास: मानवी व नैसर्गिक संसाधनाधिष्ठित विकास प्रतिमान |
| तिसावे | २००६-०७ | दिलीप कदम | जागतिकीकरण व भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाणे |
| एकतिसावे | २००७-०८ | प्रकाश बळवंत कुलकर्णी | विशेष आर्थिक परिक्षेत्र (सेझ) |
| बत्तिसावे | २००८-०९ | विनायक भगवानराव भिसे | हवामान बदलाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम |
| तेहतिसावे | २००९-१० | विनायक श्रीधर देशपांडे | जागतिक वित्तीय अरिष्ठ:सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन |
| चौतिसावे | २०१०-११ | मुक्ता दिगंबर जहागीरदार | परामर्श विकासाचा: परिप्रेक्ष्य अपवर्जय व समावेशनाचा |
| पस्तिसावे | २०११-१२ | आप्पासाहेब गोविंद पुजारी | महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी पाण्याचा इष्टतम वापर |
| छत्तिसावे | २०१२-१३ | कैलास काशिनाथ पाटील | भारतीय बँकिंग : एक दृष्टिक्षेप |
| सदतिसावे | २०१३-१४ | जगन्नाथ शामराव पाटील | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : एक चिकित्सा |
| अडतिसावे | २०१४-१५ | श्रीराम जोशी | भारतातील आर्थिक विषमता आणि दारिद्र्य-राज्यस्तरीय विश्लेषण |
| एकोणचाळिसावे | २०१५-१६ | सुहास धोंडिबा आव्हाड | स्वातंत्र्योत्तर भागातील विदेशी गुंतवणूक |
| चाळिसावे | २०१६-१७ | शिवाजी मुरलीधर भोसले | महाराष्ट्रातील जलसिंचन : एक चिंतन |
| एकेचाळीसावे | २०१७-१८ | रामचंद्र रसाळ | महाराष्ट्रातील शेती - एक दृष्टीक्षेप |

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध उपक्रम २०१७-१८

**१) पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती उपक्रम**

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि अर्थशास्त्र विभाग, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी ११.३० वा. पदव्युत्तर अध्ययन व संशोधन विभागाचे सभागृह येथे 'वस्तू व सेवा कर (GST) संकल्पना, समस्या व आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रमुख वक्ते म्हणून भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीचे मानद संचालक व अर्थबोध पत्रिकेचे संपादक मा. अभय टिळक उपस्थित होते. त्यांनी भाषणाच्या सुरुवातीस पक्षपंडित पां. वा. गाडगीळ यांची आर्थिक बाजूने पत्रकारितेतील भूमिका स्पष्ट केली आणि भारतीय संधीच वित्त पद्धतीचे महत्त्व, भारतीय अर्थव्यवस्थेच्या चौकटीत जीएसटीची पार्श्वभूमी, जीएसटी अंमलबजावणीनंतर निर्माण झालेल्या व निर्माण होणाऱ्या समस्या, ग्रामीण व शेतीक्षेत्रावर जीएसटीचे झालेले व होणारे परिणाम, जीएसटी स्थिरीकरण, भारतासमोरील आव्हान, जीएसटीमुळे राज्याच्या वित्तीय सार्वभौमत्वाचा झालेला संकोच आणि राज्यापुढील आव्हाने तसेच जीएसटीचे महागाई, आंतरराष्ट्रीय व्यापार, प्रादेशिक विकास, वैयक्तिक उत्पन्न व उपभोग इत्यादींवरील परिणाम आणि जीएसटीचे भवितव्य याविषयी प्रबोधन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रामचंद्र रसाळ (अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद) होते. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. सुभाष पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. लता धेंडे यांनी केले. कार्यक्रमाला श्री. किशोर शिंदे वित्त व लेखा अधिकारी, एस. एन. डी. टी. विद्यापीठ मुंबई, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. संतोष दास्ताने, डॉ. आ. गो. पुजारी, डॉ. सुहास आव्हाड, प्रा. डॉ. मेघा देशपांडे, डॉ. कैलास बवले, प्राचार्य आनंद जुमळे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि अर्थतज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. सुभाष पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

**२) मा. जमनालाल बजाज स्मृती उपक्रम**

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि सातपुडा शिक्षण संस्था, जळगाव (जामोद) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य जे. एस. चौधरी व डॉ. संतोष ताडे उपस्थित होते. या चर्चासत्रामध्ये प्रमुख वक्ते डॉ. उमेश घोडेस्वार व डॉ. प्राजक्ता पोहरे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था व देशाचा विकास, दरडोई उत्पन्न व राहणीमान ग्रामीण विकासाच्या योजना यावर मार्गदर्शन केले. ग्रामीण विकासात हरितक्रांतीचे महत्त्व तसेच ग्रामीण विकासाच्या आड येणारी महत्त्वाची बाब असंतुलित विकास आहे, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करावयाची असेल तर ग्रामीण भागामध्ये कृषिआधारित प्रक्रिया उद्योगाची स्थापना महत्त्वाची आहे, इत्यादी मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी डॉ. संतोष ताडे यांच्या 'केळी एक रोख पीक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष गुर्जर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कल्पना इंगळे आणि आभार प्रदर्शन

प्रा. निशिगंध सातव यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापकासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### ३) डॉ. शंकर मोडक पुरस्कृत व्याख्यान

पी. एस. जी. व्ही. मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयक्त विद्यमाने दिनांक २० मार्च, २०१८ रोजी महात्मा गांधी सभागृहात डॉ. शंकर मोडक पुरस्कृत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून नंदूरबार येथील प्रा. डॉ. डी. जी. पाटील, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले हे होते. 'भारतातील कृषी उत्पादनाच्या आधारभूत किमती' या विषयावर प्रमुख वक्ते डॉ. श्रीराम जोशी, जळगांव यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. त्यांनी पिकांची लागवड करण्यापूर्वी शेतमालाच्या आधारभूत किमती सरकारकडून जाहीर केल्या जातात. उत्पादन खर्च आणि मूल्य आयोगामार्फत हमीभाव ठरविले जातात. परंतु, उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतमालाच्या हमीभावात वेळोवेळी वाढ झालेली नाही इत्यादी विचार व्यक्त केले. डॉ. डी. जी. पाटील यांनी शेती क्षेत्रातील विक्री व्यवस्थेचे महत्त्व विशद केले तर परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्य व भूमिका विशद केली. डॉ. आर. एस. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सहकारमहर्षी स्व. आण्णासाहेब पी. के. पाटील यांनी जलसिंचन व शेती आधारित उद्योगाबाबत केलेले कार्य स्मरणीय आहेत, असे विचार व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एम. के. पटेल, उपप्राचार्य डॉ. एस. डी. सिंदखेडकर, संयोजक डॉ. अविनाश निकम, डॉ. ए. एच. जोबनपुत्रा, डॉ. मनोज गायकवाड, प्रा. गोसावी, प्रा. एस. एल. भालेराव, प्रा. एस. एस. पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपप्रज्वलनानंतर डॉ. अविनाश निकम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अपर्णा जोबनपुत्रा, पाहुण्यांचा परिचय प्रा. एस. एल. भालेराव तर आभार प्रदर्शन प्रा. एस. एस. पवार यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ४) धुळे व्याख्यानमाला

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील कला व मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक १६ मार्च २०१८ रोजी 'धुळे व्याख्यानमाला' उपक्रमांतर्गत व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बापूसाहेब डॉ. मनोहर पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. राजू शिंदे, संयोजक प्रा. मोहन पावरा उपस्थित होते. प्रमुख वक्ते सीए. मधुर के नाबरिया यांनी 'वस्तू व सेवाकर : एक दृष्टिक्षेप' या विषयावर व्याख्यान देताना एक देश, एक बाजार, एक करप्रणालीमुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत त्यांचा नवउद्योजकांनी लाभ घ्यावा. तसेच केंद्रीय वस्तू सेवा कर, राज्य वस्तू सेवा कर या दोन प्रकारच्या कराबाबत सविस्तर माहिती दिली. कार्याध्यक्ष प्र. चारुदत्त गोखले यांनी परिषदेच्या कार्याबाबत भूमिका विशद केली. प्रा. मोहन पावरा यांनी व्याख्यानाच्या आयोजनाबाबत प्रास्ताविकातून भूमिका मांडली. प्रा. डॉ. जितेंद्र तलवारे यांनी सूत्रसंचालन तर आभार प्रा. सदाशिव सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. जगदीश कुवर, प्रा. अश्विनी पाटील, प्रा. गायत्री पाटील व महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आर. बी. भांडवलकर
कार्यवाह - खजिनदार

◆

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला
अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in
संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in

**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) - स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) - स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अ‍ॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३
२३६३०६९५, २३६३११४८,
२३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक,
पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक,
शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ,
औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३१९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क,
कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५
२६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# जाहीर निमंत्रण

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४२ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, चंद्रपूर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन **सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (विदर्भ) येथे दिनांक १७, १८ व १९ नोव्हेंबर २०१८ रोजी आयोजित केले आहे.** अधिवेशनाचे अध्यक्षस्थान प्रा. चारुदत्त गोखले, जळगांव (खान्देश) हे भूषविणार आहेत. अधिवेशनातील चर्चा सत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) कार्ल मार्क्स : काल, आज आणि उद्या

२) कृषिमूल्य व व्यय आयोग - एक चिकित्सक अध्ययन

३) महाराष्ट्रातील सामाजिक संरचना : सद्य:स्थिती व आव्हाने

४) ऐनवेळचा विषय - अर्थशास्त्राचे मराठीकरण व सद्य:स्थिती आणि आव्हाने

सदर अधिवेशनाकरिता उद्‌घाटक म्हणून **मा. ना. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार** (अर्थ, नियोजन व वनमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा) हे लाभलेले आहेत. शिवाय **मा. हंसराजजी अहीर** (केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार), **मा. नानाभाऊ श्यामकुळे** (आमदार, चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्र), **मा. एन. व्ही. कल्याणकर** (कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली), **डॉ. अभय बंग** (शोधग्राम, गडचिरोली) इ. चे सहकार्य व शुभेच्छा आहेत.

सदर अधिवेशनासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांनी तसेच संशोधकांनी, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे, ही विनंती.

**प्रा. चारुदत्त गोखले**
अध्यक्ष

**डॉ. के.के.पाटील**
कार्याध्यक्ष

**डॉ. आर.बी.भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार

**डॉ. राहुल शं. म्हाेपरे**
प्रमुख संपादक, अर्थसंवाद

**प्राचार्य डॉ. आर.पी. इंगोले**
स्थानिक कार्याध्यक्ष

**डॉ. शरयू मनिष पोतनुरवार**
स्थानिक कार्यवाह

BHARATI MUDRANALAY, KOP I 0231-2654329